फेब्रुवारी २०१४ ● मूल्य १० रुपये

# शब्द रुची



## माणसाचं गाणं गाणारा युगकवी

हितवर्धिनी सभा आणि स्वा. सावरकर वाचनालयाचे पदाधिकारी.
उजवीकडे 'ग्रंथाली'चे श्रीधर गांगल




सहभागी प्रत्येक विद्यार्थ्यास
'ग्रंथाली' पुस्तक भेट









इंदिरा संतांची कविता सादर करताना




अरे संसार संसार या गीताचा हृद्य आविष्कार





महिन्याभरात दुसरी आवृत्ती!

''मे आय कम इन...?''

("MAY I COME IN...?")

कु. तन्वी दिनेश डोके

अपंगत्वावर मात करणाऱ्या एका मुलीचे अनुभवकथन

मूल्य १२५ रु. ● सवलतीत ८०

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

फेब्रुवारी २०१४, वर्ष १
अंक नववा, मूल्य १० रु.

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **प्रदीप म्हापसेकर**
आतील मांडणी : **योगिता मोरे**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे**
granthaliruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**शब्द रुची/पुस्तक वितरण – महेश गोरेगांवकर**
granthalisales@gmail.com

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी १०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ.'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६
☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthali01@gmail.com
granthali02@gmail.com
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठा–समान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

गेल्या डिसेंबर महिन्यात नेल्सन मंडेला आणि या जानेवारीत नामदेव ढसाळ असे दोन 'पँथर' लागोपाठच्या महिन्यांत काळाच्या पडद्याआड गेले. वर्णनिर्मूलन आणि जातिनिर्मूलन यावर त्यांनी आपापल्या पद्धतीनं जे लढे दिले त्याला जगानं दाद दिली. नामदेव ढसाळ यांच्या आक्रमकतेला माणूसपणाची जी जोड होती, तीच मंडेलांच्या लढ्यातही होती. इंदिरा गांधींशी झालेल्या भेटीनंतर राजकीय लाभ पदरात पाडून घेता आला असता, पण ते नामदेव ढसाळांनी केलं नाही. दावणीला बांधता येणारा तो वाघ नव्हता. 'माणसानं माणसाचं गाणं गावं' हे सांगणारा हा कवी भ्रामक उदात्तता जपणाराही नव्हता. बाबासाहेब आंबेडकरांचा खरा अनुयायी होते नामदेव ढसाळ. जगणं बेदरकार असलं तरी वैचारिक खोली बाबासाहेबांचा वारसा सांगणारी होती.

अमेरिकेत ब्लॅक पँथर १९६६ साली, बाबासाहेबांच्या परिनिर्वाणानंतर दहा वर्षांनी उदयाला आला. त्याची संगतसोबत दलित पँथरला असली तरी प्रत्यक्षात महाराष्ट्रामध्ये अमानुष उत्तरपेशवाईच्या पतनानंतर तीन तपांनी महात्मा फुले यांनी पाखंडांवर कोरडे ओढायला सुरुवात केली होती. त्यांच्याही पूर्वी, शिवकालात, तुकाराम महाराजांनी बंडखोरी केली. तिला त्या काळच्या पाखंडी समाजानं चातुर्यानं सात्त्विकतेच्या आणि भक्तिभावाच्या कोंदणात कोंडलं. ज्योतिबांचे आसूड मात्र थेट होते. पुढे, बाबासाहेब आंबेडकरांच्या रूपानं समाजातल्या पाखंडांना आपल्या विद्वत्तेनं भाजून काढलं. या सर्व महाराष्ट्रीय महापुरुषांनी देखील संघर्ष करताना माणूसपणाचं गाणं गायलं; आणि तेच नामदेव ढसाळांनी जोपासलं.

नामदेव ढसाळ या व्यक्तिमत्त्वाचा विविध अंगांनी विचार करणारे लेख या अंकात आहेत. त्यांच्या चळवळीबद्दल अरुण खोरे, त्यांच्यातील अस्सल माणसाबद्दल प्रदीप म्हापसेकर लिहीत आहेत, तर 'युगकवी' म्हणून श्रीपाद भालचंद्र जोशी ढसाळांच्या एकूणच व्यक्तित्वाचा मागोवा घेत आहेत.

स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातला हा युगकवी काळाच्या पडद्याआड गेला आहे. त्याला मन:पूर्वक जयभीम!

**– अरुण जोशी**

# जहाल, मर्मभेदी नामदेव ढसाळ आणि दलित पँथर

## अरुण खोरे

नामदेव ढसाळ यांच्या मृत्यूनंतर त्याच्या साहित्याच्या आणि चळवळीच्या मूल्यमापनाचे जणू एक सत्र सुरू झाले आहे. पासष्टीत असलेल्या या महान लेखकाचे आणि बंडखोर नेत्याचे नसणे ही एक विलक्षण वेदनादायी अशी गोष्ट आहे. म्हणूनच त्यांच्या कविता वाचताना दलित पँथरची चळवळ आठवते आणि त्या चळवळीचे सिंहावलोकन करताना त्याच्या कविता समोर येऊन उभ्या राहतात. इतके अद्वैत फार क्वचित सापडते.

ढसाळांना एकेरी म्हटले काय आणि आदरार्थी म्हटले काय, त्याच्याबद्दलची नितांत आपुलकी कधीच संपणारी नाही. कारण तो स्वत:च या आपुलकीने आणि मूर्तिमंत माणुसकीने जगत होता, हे नातेही जोडत होता. आमच्या पिढीच्या विद्यार्थिदशेत नामदेवच्या कवितांऐवजी पहिल्यांदा त्याच्या पँथरची आक्रमकता पाहायला मिळाली. त्याच्या कविता समजण्याची क्षमता असलेली पिढी अजून पुढे होती. महाविद्यालयीन जीवनातील पहिल्या वर्षीच नामदेवच्या संघटनेचे नाव वीज चमकल्यासारखे आमच्यासमोर आले आणि त्याच्या मुद्यांना दाद द्यावी लागली. ते मुद्दे आम्हा सर्वांना आत्मपरीक्षण करायला भाग पाडणारे होते.

भारतीय स्वातंत्र्याचा रौप्यमहोत्सव १९७२ साली साजरा होत होता. महाविद्यालयात जाणाऱ्या पहिल्या वर्षाचे आम्ही विद्यार्थी हरखून गेलो होतो. साधारणत: महिन्याभरात दलित पँथरचे एक संस्थापक-सदस्य राजा ढाले यांच्या प्रक्षोभक लेखाने काही हिंदुत्ववादी (आणि म्हणूनच राष्ट्रप्रेमीही असलेल्या) संघटनांचे तरुण चिडले आणि त्यांनी महाविद्यालय बंदची हाक दिली. एखाद्या दलित स्त्रीला विवस्त्र करून तिची विटंबना करणाऱ्याला कमी शिक्षा आणि राष्ट्रध्वजासारख्या प्रतिकाचा अपमान करणाऱ्याला जास्त शिक्षा, हे चुकीचे असल्याचे प्रतिपादन त्या लेखात ढाले यांनी केले होते आणि त्यासंदर्भातच काही टिपणी केली होती, ती या सर्वांना झोंबली होती. महाविद्यालय बंदची हाक देणारे कार्यकर्ते आम्हालाही दमात घेत होते, पण त्या लेखातील मुद्दा आपल्याला विचार करायला लावणारा आहे, असे माझ्यासारखे अनेकजण लक्षात आणून देत होते. महाविद्यालय बंदचा फज्जा उडाला, हा भाग वेगळा, मात्र यामुळे महाराष्ट्रातील धगधगत्या सामाजिक वास्तवाचे चित्र आमच्यासमोर येऊ लागले.

या लेखाच्या संदर्भातच पुढे नामदेव ढसाळ हे नाव सातत्याने समोर येऊ लागले. दलित पँथरची स्थापना महाराष्ट्रातील व देशातील सामाजिक वास्तव बदलण्याचा निर्धार करूनच झाली होती. ही भूमिका सहजासहजी पचनी पडण्यासारखी नव्हती. तथापि, नामदेवच्या कवितांचे जहालपण, त्यातील शब्दांचे अंगारे आणि पाठोपाठ उभी राहणारी तरुणांची चळवळ असा एक कॅन्व्हास आम्हाला दिसत होता. त्याच्या 'गोलपिठा' या पहिल्यावहिल्या काव्यसंग्रहातून आपल्याला थेट भिडणारे आणि अंगावर येणारे अनेक शब्दप्रयोग हे मराठी साहित्यातच एकूण नवीन होते आणि



**बॉम्बे हॉस्पिटलमध्ये लिखाणात मग्न नामदेव ढसाळ व त्यांची पुस्तके बघताना अरुण खोरे**

त्याचा परिणामही विलक्षण होता.

विसाव्या शतकातील मानवमुक्ती लढ्याचे उद्‌गाते असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणाला दहा-पंधरा वर्षे उलटून गेली होती. त्यांच्यानंतरची रिपब्लिकन पक्ष व शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची नेते मंडळी निष्प्रभ झाली होती. काही नेत्यांनी तर काँग्रेसची वाट धरली होती. अशा वेळी बंडखोर होण्याचा पुकारा देत दलित कविता व कथा पुढे येत होती आणि त्यातून तरुणांचे मानस जळजळीतपणे व्यक्त होऊ लागले होते. औरंगाबादमधून प्रसिद्ध होणाऱ्या 'अस्मितादर्श' नियतकालिकातून दलित मनाचे धुमसलेपण व असंतोष साहित्याच्या माध्यमातून व्यक्त होऊ लागला होता. बाबूराव बागूल, नारायण सुर्वे, अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात या लेखकांचे साहित्य ही अस्वस्थता व्यक्त करू लागले होते. जातिव्यवस्थेतील अन्याय वाढत होते आणि दलितांना अपमानित करण्याचे प्रकारही कमी होत नव्हते. त्याचा पहिला स्फोट कवितेच्या माध्यमातून होत होता आणि ढसाळांसारखे कवी या आघाडीवर अग्रभागी होते.

बाबासाहेबांच्या प्रेरणेला जागवत आणि साद घालत नामदेवने चळवळीची पार्श्वभूमी आपल्या कवितेतून उभी केली, हे आवर्जून येथे सांगितले पाहिजे. बाबासाहेबांवर 'गोलपिठा'मधील त्याने लिहिलेली कविता ही आजही आपल्याला अंतर्मुख करते. यात तो म्हणतो :

''जो नाकारतो रयतेची चाकरी नि
येसकरपणाची भाकरी
जो आणतो जनशक्तीच्या किमयेला गाज
जो केकीच्या नि रमच्या चिखलात
रुजत नाही
जो पायपुसण्यावर बसत नाही
जो नूतन वर्षाच्या फुलपाखरासारखा उडतो
नि प्रकाश पसरवितो
जो युनिव्हर्सिट्यांचे चिरेबंद ढिले करतो
जो स्वतंत्रतेकडून स्वतंत्रतेकडेच जातो
असा तू एकुलता एक आमच्या
रथाचा सारथी''

याच कवितासंग्रहातील 'रक्तात पेटलेल्या अगणित सूर्यांनो' ही त्याची कविता बंडखोर आत्म्याचे दर्शन घडवणारी आहे.

हे सगळे नमूद करण्याचे कारण दलित पँथर ही नामदेवने स्थापन केलेली संघटना आणि चळवळ याचे संदर्भचित्र समोर ठेवणे हे होते. आज नामदेव नसला तरी जी काही संघटना महाराष्ट्रात अस्तित्वात आहे, ती पुढे नेण्याची धुरा नामदेवच्या पत्नी मल्लिका अमर शेख यांनी उचलली आहे. जवळपास ४२ वर्षे वयाची ही संघटना गेली अनेक वर्षे निष्क्रिय व निष्प्रभ होती, हे वास्तवही विसरून चालणार नाही. या संघटनेचे संस्थापक कोण इथपासून आज पँथरचे किती तुकडे झाले आहेत आणि कोणती पँथर खरी, असे अनेक प्रश्न उत्तराविना समोर उभे आहेत. याचे कारण ज्यांना ज्यांना शक्य झाले, त्यांनी याबाबत लिहून त्यातली स्वत:ची भूमिका अधिक प्रमाणात अधोरेखित केली. एक मुद्दा मात्र येथे सांगायला हवा आणि तो म्हणजे पँथर स्थापनेची कल्पना आणि त्याचा जनक नामदेव ढसाळच होता, ही गोष्ट लक्षात घेऊन श्रेय त्याला दिले पाहिजे. त्याच्या बरोबरीने अनेकजण त्यात होते, ही गोष्ट खरी असली तरी त्यामागचा ड्रायव्हिंग फोर्स नामदेवच होता, हे निश्चित.

दलित पँथरच्या स्थापनेमागे व संकल्पनेमागे अमेरिकेतील ब्लॅक पँथरची चळवळ हा एक प्रेरक व पूरक घटक होता, याची नोंद केली पाहिजे. अमेरिकेतील ब्लॅक पँथर पार्टीची स्थापना ह्यू पी न्यूटन व बॉबी सिएल या नेत्यांनी १९६६ साली केली. कॅलिफोर्नियातील ऑक्लंडमध्ये स्थापन झालेल्या, मुख्यत: कृष्णवर्णीयांना न्याय देण्यासाठी पुढे आलेल्या या संघटनेचे जाळे नंतर अमेरिकेत अनेक शहरांत पसरले. या चळवळीने १९६७ साली 'ब्लॅक पँथर' हे आपले वृत्तपत्र सुरू केले आणि अमेरिकेतील अनेक शहरांत त्याचा खपही वाढला. साधारणत: अडीच लाखापर्यंत या वृत्तपत्राचा खप होता. कृष्णवर्णीयांची राजकीय शक्ती गळचेपी करत असून त्यांना सन्मानाने जगू दिले जात नाही, हा विचार घेऊन ही संघटना व चळवळ स्थापन झाली होती.

या संघटनेची विचारप्रणाली ही कृष्णवर्णीय-राष्ट्रवाद, भांडवलशाहीविरोधी, फॅसिझमविरोधी, वंशवादविरोधी आणि मार्क्सवाद-लेनिनवाद-माओवाद व समाजवाद स्वीकारणारी अशी होती. या संघटनेने दहा कलमी कार्यक्रम जाहीर करून सरकारला आवाहन केले होते. त्यात राजकीय दडपशाही नको, अमेरिकेतील तुरुंगात असलेल्या कृष्णवर्णीयांची सुटका करावी, नोकरी, जमीन, अन्न, निवारा, वस्त्र, शिक्षण हे अधिकार न्यायाने मिळावेत, अशा मागण्यांचा समावेश होता. यातून निर्माण झालेल्या असंतोषाने अमेरिकेत पेट घेतला. काही हिंसक वळण या चळवळीला लागले, काही पोलीस अधिकाऱ्यांचे खून झाले. त्यामुळे एफबीआयच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या संघटनेच्या अनेक सदस्यांना अटक केली आणि त्यांना मोठ्या जाचाला तोंड द्यावे लागले. ब्लॅक पँथरचे अनेक कार्यकर्ते गुन्हेगार आहेत आणि गुन्हेगारी जगताशी संबंधित आहेत, असे तपशील सरकारकडे आले. याच्या जोडीला या संघटनेत वैचारिक वादही सुरू झाले आणि साधारणत: १९८२ ला या ब्लॅक पँथरला घरघर लागली. इथे नोंदवण्यासारखी गोष्ट म्हणजे या संघटनेने महाराष्ट्रातील दलित पँथरला जाहीर पाठिंबा दिला होता.

या ब्लॅक पँथरच्या ध्वजातील उडी घेणाऱ्या काळ्या पँथरचे चित्र दलित पँथरच्या ध्वजासाठी नामदेवने जसेच्या तसे घेतले आणि एक आव्हान देणारा असा बंडखोर उच्चार त्याद्वारे त्याने केला. ब्लॅक पँथरची स्थापना १९६६ ची आणि दलित पँथरची

१९७२ ची. ब्लॅक पँथर जेव्हा निष्प्रभ झाली, त्यावेळी म्हणजे १९८२ साली दलित पँथरही त्याच अवस्थेत आली होती.

दलित कविता आणि कथांचा संदर्भ घेत, निग्रो साहित्यातील आत्मसन्मानाच्या प्रेरणा घेत दलित तरुणांची चळवळ पँथरच्या माध्यमातून पुढे आली आणि तिला ब्लॅक पँथरची जागतिक ओळखही मिळाली. नामदेवबरोबर या एकूण चळवळीत राजा ढाले, सुनील दिघे, अर्जुन डांगळे, ज.वि.पवार, उमाकांत रणधीर, भाई संगारे, लतिफ खाटिक, प्रल्हाद चेंदवणकर, जयदेव गायकवाड, रामदास सोरटे हे कवी व कार्यकर्ते होते, हे सर्व व्यापक अर्थाने पँथरचे संस्थापक सदस्य म्हटले पाहिजेत. विशेष म्हणजे पँथरच्या शाखांना छावणी असे या संघटनेच्या घटनेत म्हटले आहे. याचाच अर्थ लढाऊ संघटना म्हणूनच उभी राहण्याची भूमिका या सर्व नेत्यांनी घेतली होती. या घटनेत दलित पँथरने उद्दिष्टे आणि कार्यक्रमही तपशीलवार नोंदला होता. ब्लॅक पँथरप्रमाणेच या घटनेत त्यांनी आमचे आजचे मुख्य प्रश्न अन्न, पाणी, वस्त्र, निवारा, नोकरी, जमीन, शिक्षण, अस्पृश्यता, सामाजिक व शारीरिक अन्याय हे आहेत, असे नोंदवले होते. हे प्रश्न सोडवण्यासाठी दूरगामी आणि ताबडतोबीचे असे दोन कार्यक्रम पँथरने घटनेत सुचवले होते. त्यानुसार दलित व श्रमिकवर्गातील तरुणांना नोकऱ्या द्या, अन्यथा बेकारीभत्ता द्या, शेतमजुरांना किमान पाच रुपये वेतन मिळाले पाहिजे, सर्व शिक्षण मोफत द्यावे, दलित वस्त्यांमध्ये सार्वजनिक विहिरी खोदा, धार्मिक व जातीय संस्थांना देण्यात येणारे सरकारी अनुदान बंद करा, दलित श्रमिकांसाठी मोफत औषधोपचाराची व्यवस्था हवी, दर माणशी १५ किलो धान्य मिळाले पाहिजे, अशा मागण्या होत्या.

इथे हेही सांगितले पाहिजे की, देशी व विदेशी भांडवलदारांकडून होणारी पिळवणूक बंद करण्यासाठी त्यांच्या मालकीची उत्पादनसाधने सामाजिक मालकीची करावी व त्यावर दलित श्रमिकांची सत्ता स्थापन करावी, असा दूरगामी कार्यक्रमही या घटनेने दिला होता. अर्थात सर्वंकष अशा मुक्तिलढ्याची भूमिका पँथरने यात घेतली होती. दुर्दैवाने मतभेद, गटबाजी विकोपाला गेल्याने यातल्या बऱ्याच गोष्टी कागदावरच राहिल्या.



**नामदेव ढसाळ त्यांचा कवितासंग्रह भेट देताना – अरुण खोरे आणि विजय जाधव**

या सगळ्या गोष्टी घडत असताना महाराष्ट्रातील ग्रामीण भागात दलितांवरील अत्याचार वाढत असल्याच्या बातम्यांनी पश्चिम महाराष्ट्रातील दलित तरुणांचा मोठा वर्ग संतप्त झाला होता. पुणे जिल्ह्यातील बावडा या गावी दलितांवर बहिष्कार टाकण्यात आला होता. मराठवाड्यातील एका गावात दलित स्त्रीची नग्न धिंड काढण्यात आली होती. नागपूरच्या एरणगावी एका नवबौद्ध तरुणाचा नरबळी देण्यात आला होता. या घटनांमुळे संतप्त झालेल्या या तरुणाईचे मानस व्यक्त करणारा जाहीरनामा दलित पँथरने प्रसिद्ध केला होता. ब्लॅक पँथरप्रमाणेच त्यांचा हा जाहीरनामा सरकारवर कठोर टीका करणारा होता, याखेरीज डावे आणि उजवे पक्ष यांच्यावरही या जाहीरनाम्यात कठोर टीका होती. या पक्षांनी दलितांच्या प्रश्नांना सोडवण्याची भूमिका घेतली नाही, उलट त्यांचे शोषणच होईल, अशा व्यवस्थेत हे सगळे पक्ष सामील झाले आहेत, असेही त्यात म्हटले आहे. रिपब्लिकन पक्षाचे आणि दलित पँथरचे नाते याबाबतही पँथरने कठोर टीका केली आणि आमचे व रिपब्लिकन पक्षाचे रक्ताचे नाते नाही, असे माना खाली घालून जाहीर करत आहोत, असे जाहीरनाम्यात म्हटले आहे. याखेरीज विविध स्वरूपाच्या अनेक मागण्यांची एक सनदही या जाहीरनाम्यात त्यांनी दिली आहे.

महाराष्ट्रात १९६६ साली स्थापन झालेली शिवसेना आणि १९७२ साली उदयाला आलेली दलित पँथर यांच्या राजकीय भूमिकेत पुढे खूप बदल आणि साम्य असणारी नीती निर्माण झाली, तरी आरंभीच्या दोन-पाच वर्षांत या दोन्ही संघटनांचे वैर मात्र फार कठोर स्वरूपात महाराष्ट्राने बघितले. मुंबईतल्या वरळी येथील बीडीडी चाळीमधील दंगली हे त्याचे भीषण उदाहरण आहे. अर्थात यानंतरच दलित पँथरचा दबदबा वाढला आणि शिवसेनेलाही गती मिळाली. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील दलितांवरील अन्याय,अत्याचाराच्या प्रकरणांना पँथरने तोंड फोडले.

पुण्याजवळच्या एका गावी सवर्ण तरुणाने दलित मुलीवर बलात्कार केला होता. तो गावच पेटवण्याची घोषणा देत कार्यकर्ते घेऊन ढसाळ तेथे गेले होते. तथापि, त्यांचे सहकारी ॲड. जयदेव गायकवाड यांनी कायद्याची बूज राखण्याचा सल्ला दिला आणि

मग सगळे पोलिसांचे सहकार्य घ्यायला निघाले. दलितांच्या इनामी जमिनीचे वाटपही अन्यायकारक रीतीने झाले होते. त्याबाबतही एक मोठा मोर्चा पुणे जिल्ह्यातील अशा भूमीहीन दलित बांधवांनी काढला होता. त्याची दखल घेऊन तत्कालीन मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण व राज्यमंत्री शरद पवार यांनी पुणे जिल्ह्यातील खेड येथे या प्रश्नांसाठी परिषद घेतली होती. त्यावेळी हजारो भूमीहीन दलित बांधवांची प्रकरणे सरकारकडे सोपवण्यात आली होती. हे सर्व काम सुरू असतानाच निवडणुकीच्या राजकारणाने दलित पँथरची शक्ती नव्याने समोर आली आणि त्यानंतरच्या राजकारणात तरुणांच्या या संघटनेला निष्प्रभ करण्याचे जणू कारस्थानच सुरू झाले. एका बाजूने कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ ... ही परिस्थिती तर दुसऱ्या बाजूने प्रस्थापित राजकीय घटकांचे दबाव अशा कोंडीत पँथर सापडली आणि मग जे व्हायचे, ते टळले नाही !

मुंबईतील निवडणुकीच्या राजकारणाने काही काळ दलित पँथरला नवी चेतना दिली. मुंबईतल्या लोकसभेच्या मध्य मुंबई मतदार संघात १९७४ साली झालेल्या पोटनिवडणुकीने हे चित्र समोर आले. दलितांवरील अन्यायाबाबत काँग्रेसला जबाबदार धरण्याची भूमिका घेऊन पँथरने तसा प्रचार चालवला होता. यातच गिरणी कामकारांचा संपही लांबला होता. या लोकसभा मतदारसंघात दलित मतदारांची संख्या लक्षणीय होती. त्यामुळे काँग्रेसला दलितवर्गाला दुखावणे किंवा नाराज करणे अवघड जाणार होते. या निवडणुकीसाठी काँग्रेसने दलित पँथरच्या पाठिंब्याची अपेक्षा केली होती. प्रत्यक्षात वरळीच्या जाहीर सभेत याबाबत भूमिका जाहीर करण्याची तयारी पँथरने केली होती. मात्र त्या प्रचंड मोठ्या सभेत गोंधळ होऊन आगळिक सुरू झाली आणि वर उल्लेखलेली वरळीची दंगल झाली. यानंतर ढसाळ, ज.वि. पवार, लतिफ खाटिक, भाई संगारे आणि चेंदवणकर आदी सर्वांनी भूमिका घेऊन पोटनिवडणुकीवर मतदानाच्या दिवशी बहिष्कार घातला. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बॅ. रामराव आदिक पराभूत झाले आणि कम्युनिस्ट पक्षाच्या रोझा देशपांडे निवडून आल्या. यानंतर मात्र ढसाळ आणि पँथर या दोघांनाही ते कम्युनिस्टधार्जिणे असल्याची टीका पुढे सतत सहन करावी लागली. ढसाळांच्या भाषणाची विपर्यस्त वार्तांकनेही वृत्तपत्रांनी केली होती, असे प्रल्हाद चेंदवणकर यांनी साधार नोंदविले आहे. (दलित पँथर – संपादन शरणकुमार लिंबाळे, पृष्ठ ४८).

अर्थात यानंतरच्या काळातील मतभेद व वैचारिक भूमिका यांमुळे ढसाळ आणि ढाले यांचे मार्ग विभिन्न झाले. आणीबाणीला पाठिंबा देण्याची भूमिका नामदेवने घेतली आणि त्याचा प्रतिवाद करत १९७७ साली दलित पँथर बरखास्त करण्याची घोषणा ढाले यांनी केली. त्याचवेळी त्यांनी मास मूव्हमेन्ट सुरू करत असल्याची घोषणा केली. यावेळी त्यांच्याबरोबर ज.वि. पवार, गंगाधर गाडे, दयानंद मस्के, रामदास आठवले, विठ्ठलराव साठे आदी सहकारी गेले. काँग्रेसला विरोध करण्याची भूमिका घेऊन मास मूव्हमेन्टने आपले काम सुरु केले. अर्थात नामदेवच्या पँथरनेही आपले सामाजिक काम सुरू ठेवले होते. राजकारणात प्रवेश करायचा की नाही याबाबत त्यांच्याबरोबरच्या कार्यकर्त्यांमध्ये एकमत होत नव्हते. विशेषत: पँथरला दहा वर्षे पूर्ण झाल्यावर जयदेव गायकवाड यांनी राजकारणात प्रवेश करण्यापूर्वी पँथरने पूर्वतयारी करावी व संघटनात्मक बांधणी करावी, अशी भूमिका मांडली होती. तथापि, नामदेवच्या एकूण कार्यशैलीमुळे अनेक सहकारी बाहेर पडले आणि त्यांनी संसदीय राजकारणात प्रवेश केला.

दलित पँथरमधून बळ घेऊन अनेक नेते व कार्यकर्ते बाहेर पडले. प्रा. अरुण कांबळे यांनी भारतीय दलित पँथरची स्थापना केली. काहींनी रिपब्लिकन दलित पँथर असा पक्ष स्थापन केला. रिपब्लिकन पक्षाच्या गटांप्रमाणेच पँथरच्याही अनेक छावण्या निर्माण झाल्या. पँथरचे अनेक नेते अॅड. प्रकाश आंबेडकर व रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखालील रिपब्लिकन गटांमध्ये दाखल झाले. या दोन्ही नेत्यांना जे बळ मिळाले, ते मुख्यत: पँथरमधील नामदेवच्या पूर्वाश्रमीच्या सहकाऱ्यांमुळे, हे विसरून चालणार नाही आणि त्याची नोंदही त्यांनी कृतज्ञतेने घेतली पाहिजे. एकूणच सामाजिक व राजकीय दस्तावेजाच्या बाबत आपल्याकडची दुरावस्था लक्षात घेता, आजमितीला फुटलेल्या पँथरचे किती गट आहेत, याची माहिती सहजासहजी उपलब्ध नाही. याबरोबरच दलित पँथरच्या स्थापनेबाबत व भूमिकेबाबतचे अनेक तपशील वृत्तपत्रांतील बातम्यांच्या आधारे काही प्रमाणात निश्‍चित करावे लागतात.

नामदेवनंतरची धुरा त्याची पत्नी मल्लिका अमर शेख यांनी स्वीकारल्याच्या बातम्या येत आहेत. दलित तरुणांचे जग आता बदलले आहे. ते मनसे, शिवसेना किंवा भाजपाकडेही झुकू शकते. नामदेवने पँथरच्या स्थापनेतून आणि आपल्या कवितेमधून जो अंगार निर्माण केला होता, त्याची धग अजूनही जाणवते आहे. प्रश्न मात्र असा आहे की आज हे आवाहन या तडफेने आजच्या तरुणांना करणारे नेते पँथरमध्ये किंवा रिपब्लिकन पक्षात किती उरले आहेत? नामदेव तर अखेरपर्यंत पँथरचीच भाषा बोलत होता आणि त्याचे शब्द त्याच ज्वाला पसरवत होते. पँथरच्या इतिहासाचे एक महान पर्व नामदेवच्या जाण्याने संपले आहे आणि आगामी काळात पँथरच्या पानांवर काय असेल, हे प्रश्नचिन्ह मात्र धूसर झालेले नाही!

**– अरुण खोरे**
तेजलकुंज सी–१४
जी.ए. कुलकर्णी मार्ग,
करिश्मा सोसायटीसमोर,
कोथरूड, पुणे ४११०३८
भ्रमणध्वनी : ९६०४००१८००
arunkhore@hotmail.com

# अस्सल माणूस!

## प्रदीप म्हापसेकर

नामदेव ढसाळ!... काय लिहावं या माणसाबद्दल आणि किती लिहावं हा एक मोठाच प्रश्न आहे. डिझाइनच्या कामानिमित्त अचानक या पहाडी माणसाच्या सहवासात आलो. त्या आधी ढसाळांबद्दल मला फार काही ठाऊक नव्हतं. हे दलितांचे नेते वगैरे काही आहेत इतकंच कानावर होतं. कामानिमित्त ओळख झाली अन् धक्क्यावर धक्के बसत गेले ते अगदी शेवटपर्यंत. ढसाळांच्या कवितेबद्दल, लिखाणाबद्दल अथवा त्यांच्या पँथर या संघटनेबद्दल मी काही आज इथे चर्चाबिर्चा करणार नाही. माझा तो प्रांत नाही. मी कलाकार माणूस अन् त्या अंगानंच मी ढसाळांना पाहत गेलो, एखाद्या सिनेमासारखा.

बऱ्याच जणांना ढसाळ महान कवी वाटले. कुणाला सभा गाजवणारे वाटले. कुणाला आणखी काही, अन् ते तसे होतेही. पण मला मात्र हा माणूस युरोपातल्या एखाद्या महान चित्रकारासारखा वाटला. कदाचित काहींना हे कळणार नाही. पण मला तसा तो वाटला हे मात्र मनापासून सांगतोय. अगदी पिकासो, दलीसारखा महान चित्रकारच वाटला. भले त्यांनी चित्रं काढली नसतील पण ढसाळ या प्रख्यात चित्रकारांसारखेच जगले, बिनधास्त, बेफाम... भन्नाट!

जे.जे.मध्ये शिकत असताना मी जगभरातल्या चित्रकारांचा अभ्यास करत होतो. त्यावेळी मला त्या चित्रकारांबद्दल नवल वाटायचं. त्यांची लाइफस्टाईल, त्यांचं काम, त्यांचं बोलणं, फिरणं सगळं काही जबरदस्त भन्नाट होतं. वाटलं असा माणूस आपल्याला या जन्मी पाहायला मिळणार नाही. मात्र ढसाळांच्या सहवासात आलो नि पहिल्या भेटीपासूनच हा माणूस माझ्या मनाच्या कॅनव्हासवर व्यापून गेला, दिपून गेला.

१९९०च्या आसपासची गोष्ट असावी. अनिकेत जोशी या माझ्या पत्रकार मित्रानं मला एकदा फोन केला. म्हणाला उद्या आपण भेटू. थोडं काम आहे. त्यावेळी दादरचे साळगावकर 'सत्यता' नावाचं साप्ताहिक चालवत होते. ते आता ढसाळांनी चालवायला घेतलं होतं. त्यांना लेआउटसाठी कुणी हवा होता. मीसुद्धा त्यावेळी डझनभर साप्ताहिक, मासिकांचं काम करत होतो. नुकताच जे.जे.तून बाहेर पडलो होतो. कामाची खुमखुमी फार होती. रात्री-अपरात्रीही काम करत होतो. दुसऱ्या दिवशी मी आणि अनिकेत ढसाळांकडे त्यांच्या सातरस्त्याच्या घरी भेटायचं ठरलं होतं. मी जवळच लोअर परेलला राहत होतो. त्यामुळे मी थोडा आधीच ढसाळांच्या घरी पोचलो. त्यांना पहिल्यांदाच पाहिलं तेव्हा माझे डोळेच बाहेर येणार होते, इतका उडलो मी. ढसाळ उघडबंब आपल्या टेबलासमोर बसले होते नि समोर डझनभर माणसं! मला कळेना, हा माणूस आपल्या ऑफिसात चक्क उघडा? वाटलं, काही खरं नाही कामाचं. मग अनिकेत आला. आमचं त्यांच्याशी बोलणं झालं. बोलताना ते वारंवार मलातरी धक्के देत होते. भयानक रफ बोलत होते. बोलण्यात तुसडेपणा नव्हता पण प्रचंड बेफिकिरी होती. मला ही भाषा एकदम नवी होती. आपण फार काळ इथं टिकणार नाही असं मी डोळ्यानंच अनिकेतला खुणावलं.

ढसाळांना त्याच दिवशी म्हणजे त्याच संध्याकाळी अंक करून हवा होता. मी म्हटलं मी दिवसा दुसरं काम करतो. रात्री बारानंतर मोकळा होतो. आज जमणार नाही. ढसाळ म्हणाले ओके. रात्री बारानंतर तुला कुठून उचलायचं ते या सलीमला सांग. सलीम त्यांचा जुना ड्रायव्हर. दिवसभर त्यांच्यासोबत असायचा. अगदी शेवटपर्यंत होता. त्यांची 'उचलण्या'ची भाषा ऐकून मी चमकून अनिकेतकडे पाहिलं. त्याला बहुधा सवय असावी त्यांच्या या बोलण्याची. तो हसत माझ्याकडे पाहत होता.

दिवसभराचं काम आटोपून मग मी फ्री प्रेसला जायचो कामाला. सलीम त्या रात्री साडेअकरा वाजता वर माझ्या डिपार्टमेंटमध्ये येऊन गेला. म्हणाला, खाली गाडी आहे. तुमचं काम संपल्यावर या खाली. बारा वाजता मी सोबतीला माझा एक सहकारी आंगणेला खाली घेऊन आलो. आम्ही बसलो त्यांच्या गाडीत. अर्ध्या तासात सातरस्त्याला त्यांच्या घरी आलो. ढसाळ आत होते. हे पुन्हा उघडबंब बाहेर आले. अंगावर एक पांढरी लुंगी होती. त्यांनी मग एका बॉक्समधून लेखांची भेंडोळी बाहेर काढली. त्यावेळी कटिंग-पेस्टिंगचा जमाना होता. आतासारखी पूर्ण पानं कॉम्प्युटर लागत नसत. त्यांनी मला कव्हरस्टोरी कुठली, त्यानंतर कुठला लेख घ्यायचा नि शेवटी काय पाहिजे हे सांगितलं नि पुन्हा

आत गेले. म्हणाले, तुझं काम आटोपलं की मला उठव. मला नवल वाटलं.

दोन-तीन अंकांनंतर आमचं जमायला लागलं. त्यावेळी मोबाइल नव्हते. मी त्यांना घरी फोन लावायचो तेव्हा ते आधी मोठ्या आवाजात म्हणायचे जय भीम! मग मी मुद्दाम त्यांना डिवचण्यासाठी जय महाराष्ट्र म्हणायचो. मग पलीकडून त्यांचा दणदणीत आवाज यायचा जय भारत!.. मग मात्र माझी बोलती बंद व्हायची. मी कामाचं बोलायचो. बऱ्याचदा मी त्यांचं काम रात्रीच करत असे. दिवसा फार क्वचित. दिवसा त्यांच्या घरी बरीच माणसं जमलेली असायची. दिवसा कधी कधी त्यांच्याकडे जावं लागायचं. मग मी तिथं जमलेल्या लोकांचं निरीक्षण करत बसायचो. त्यांचा खास दोस्त मन्या ओक तिथं बऱ्याचदा यायचा. दाराबाहेर शांत उभा असायचा. एकदा मी त्यांच्या समोरच्या कोचावर बसलो होतो. माझ्या बाजूला चार-सहा जण होते. ढसाळ त्यातल्या एकाला गाणं गायला लावतात. तो असतो मिलिंद शिंदे आणि आनंद शिंदे यांपैकी एक. नंतर त्यांनी 'जवा नवीन पोपट हा' हे गाणं गाऊन विक्रम केला होता. तर त्यातला एकजण आंबेडकरांचं एक गाणं गातो. एकदम वरच्या सुरात गातो. मोठ्यानं गातो. त्याच्या त्या आवाजानं माझ्या अंगावर काटाच येतो. जबरदस्त दर्द, कारुण्य त्याच्या आवाजात असतं.



निवडणुकीच्या काळात तर त्यांच्या ऑफिसात मोठी धामधूम असायची. मला वाटतं, पॅन्थरच्या वतीनं त्यांचे लोक उभे राहायचे. ढसाळ मग एकेक उमेदवाराची रेवडी उडवत. एखाद्याची मिशी मोठी असली की त्याला चिडवत किती दम आहे रे तुझ्या मिशीत? तुला काय वाटलं, मिशीवर मतं मिळतात? एकदा दुपारी त्यांच्या ऑफिसात माझ्या बॅगेवरून गदारोळ उडाला होता. ढसाळांना बरीच माणसं त्या दिवशी भेटायला आली होती. मी म्हटलं, तुम्ही आटपा तुमचं काम. मी जवळच १५-२० मिनिटांत जाऊन येतो. माझी बॅग मी समोरच्या कोचावर कोपऱ्यात ठेवून जातो. त्यावेळी तिथं एक इन्स्पेक्टर त्यांना सहज भेटायला आलेला असतो. तो सहज आजुबाजूच्यांना विचारतो, ही बॅग कुणाची आहे. सगळे नाही म्हणतात. तेव्हा त्याला संशय येतो. काहीजण हळूच बाहेर सटकतात. ढसाळ त्याला म्हणतात, बॅगेत बॉम्ब असू दे नाही तर आणखी काही, मी इथून हलणार नाही. त्याचवेळी मी तिथं पोचतो. मग वातावरण निवळतं. मला ढसाळांच्या धाडसाचं नवल वाटतं.

झणझणीत, चमचमीत खाणं ढसाळांची खासियत. एकदा दिवसभर काम करून मी रात्री उशिरा त्यांचं काम करायला गेलो होतो. मी त्यांना म्हटलं, ढसाळ आज जाम भूक लागलीय. ते म्हणाले, चल काम थांबव. आपण बाहेर जाऊ. मध्यरात्रीचे दीड-दोन वाजले होते. मी म्हटलं, आता बाहेर कुठे खायला मिळणार? ढसाळ म्हणाले, चल तर... आम्ही मग भेंडीबाजारातल्या कुठल्यातरी गल्लीत घुसलो. रस्त्यावर शुकशुकाट अन् या गल्लीत मात्र लखलखाट. तिथं एक पावभाजीसारखी गाडी होती. त्या गाडीचा मालक ढसाळांना पाहून लगेच आमच्याकडे धावत आला. आम्हाला बसायला मोठं लाकडी बाकडं आणलं गेलं. ढसाळ मला म्हणाले, बोल तू काय खाणार. तिथं तर सगळं नॉनव्हेज दिसत होतं. मी

गोंधळलो. म्हटलं, मी शाकाहारी आहे...! ढसाळ म्हणाले, आता काय करणार... त्यांनी त्या गाडीच्या मालकाला म्हटलं, ये व्हेज है, क्या करे? त्यानं मग आपल्या एका पोराला बाहेर पिटाळलं नि पुढल्या १० मिनिटांत एका व्हेज गरमागरम डिश माझ्या पुढ्यात आली.

ढसाळांकडे त्यावेळी एक कुत्रा नि एक कुत्री होती. कुत्र्याला ते ठोंब्या म्हणून हाक मारत नि कुत्रीला ठमी म्हणत. मी तिथे काम करताना ठमी पायाशी घुटमळत राहायची. एकदा ढसाळांना काय लहर आली कळेना. ते अचानक म्हणाले, चलो आज बाहर आईस्क्रीम खाते है. ठमीला सोबत घेऊन ते पेडर रोडच्या कुठल्या महागड्या आईस्क्रीम पार्लरमध्ये आले. आमचं आईस्क्रीम खाऊन होताच ते त्या आईस्क्रीमवाल्याला म्हणाले, एक स्ट्रॉबेरी लाव. मला वाटलं त्यांना अजून खायचं असावं. स्ट्रॉबेरी आईस्क्रीमची प्लेट आली. ढसाळांनी ती प्लेट खाली जमिनीवर ठेवायला सांगितलं. तिथं जे आठ-दहा जण आईस्क्रीम खात होते तेही चाट पडले. प्लेट जमिनीवर! मग ढसाळ ठमीला हाक मारतात. ठमी धावत येते. ते म्हणतात, खा... आईस्क्रीम खा... ठमी जरासं चाटल्यासारख करते अन् परत जाऊन त्यांच्या टोयोटा गाडीत बसते. ढसाळ मग पैसे देऊन टाकतात. निघताना मी हळूच तिथल्या लोकांकडे पाहतो. त्यांचे डोळे आईस्क्रीमसारखे गार झालेले असतात.

माणसांत रमणारा हा माणूस विलक्षण होता. त्यांना भेटायला लोक कधीही यायचे. एकदा मध्यरात्री त्यांचं काम करत असताना चार-सहा जण अचानक आत आले त्यांना भेटायला. मला नवल वाटलं. पहाटेचे दोन वाजलेत. ही काय भेटायची वेळ आहे. ते चिडले की एखाद्याला फोनवर असा काही दम द्यायचे की त्यावेळी त्यांच्यासमोर बसलेला भेदरून जायचा. मग दुसऱ्याच क्षणी हसत ते त्याच्याशी बोलायला लागत. त्यांना कळायचं नाही, आता काही क्षणांपूर्वी हा माणूस भयंकर संतापलेला नि आता हसतोय. ढसाळ कुणाची भीडभाड ठेवत नसत. चुकून कुणी त्यांच्यासमोर वैचारिक जड बोलायला लागला की त्याचा असा काही फडशा पाडत की विचारू नका. मग ढसाळ हळूच माझ्याकडे हसून पाहत. नजरेनंच सांगायचे, फाडला ना त्याला. मलाही हसू यायचं.

काम करताना कधी कधी मी वैतागायचो त्यांच्यावर. पण हे सगळं प्रेमापोटी असायचं. एकदा त्यांच्या कामामुळे मला ऑफिसला दांडी मारावी लागली. तेव्हा तर त्यांनी कमालच केली. रात्रभर मला त्यांच्या गाडीनं फिरफिर फिरवलं. म्हणाले, 'तुझी सुट्टी वाया जाणार नाही.' काम करताना माझ्या हातात कात्री नि लेख असला की त्यांची दादागिरी बंद व्हायची. मी लेखावरून सपासप कात्री चालवायतो. त्यांना वाटायचं गेला मजकूर फुकट. मग मी मुद्दाम कात्रीनं झोकदार वळण घ्यायचो. त्यांना उगाचच घाबरवायचो. गमतीनं मग हसायचो. ही एकच संधी मला होती त्यांना घाबरवायची आणि या संधीचा मी नेहमी फायदा घ्यायचो. मग काम संपलं की ते मिष्कीलपणे हसायचे. काम आटोपताच पहाटे चार-साडेचारला आम्ही वरळी नाक्यावरच्या कॅफे सिटी हॉटेलात जायचो. ढसाळांना इथले पहाटेचे गरमागरम शिगकबाब फार आवडायचे. मी मात्र त्यावेळी फक्त पानीकम चहा प्यायचो. ढसाळांबरोबर खूप फिरलो. धमाल केली आम्ही. नंतर त्यांचं सत्यताचं काम कमी झालं. १९९२च्या दंगलीनंतर ते अंधेरीला राहायला गेले नि आमच्या भेटी कमी झाल्या.

डिसेंबर २०१३ मध्ये ढसाळांची प्रकृती खूप बिघडली होती. चार महिने ते बॉम्बे हॉस्पिटलात होते. चार-सहा वेळी मी त्यांच्या पत्नी मल्लिका अमरशेख यांना भेटून आलो होतो. ११ डिसेंबरला मला वाटतं, मी त्यांना हॉस्पिटलमध्ये भेटलो. बेडवर झोपून ते बाजूच्या टेबलावरच्या कागदावर काही लिहायचा प्रयत्न करत होते. शेवटपर्यंत लिहायची जिद्द कायम होती. त्या दिवशी मी त्यांना एक अडीच पान लेख लिहून दिला. ते सांगत होते नि मी लिहीत होतो. या लेखात 'मराठी माणसाशिवाय पर्याय नाही' वगैरे उल्लेख होते. मी लिहिलेले कागद ते वाचून तपासत होते. इथं सुद्धा आमची थट्टामस्करी चालू होती. माझं अक्षर पाहून ते म्हणाले, तू तुझं अक्षर सुधारलं पाहिजे. मरणाच्या दारातही त्यांना लिखाणाशिवाय दुसरं काही दिसत नव्हतं.

ढसाळ आता माझी चौकशी करतात. म्हणतात, तुला काही इथं त्रास होत नाही ना? मी म्हणतो, 'त्रास कसला?' मग गंभीर होत म्हणतात, 'माणसाचं शरीर फार महत्त्वाचं आहे रे बाबा. त्याची काळजी घ्यायला हवी. हॉस्पिटलात बेडवर पडल्यावर आपल्याला शरीराचं महत्त्व कळलं. खरं तर आपल्याला काहीच दिसत नाही. आपण नुसते अंगावर कपडे चढवतो. या नर्स माझं २-२ तास स्पंजिंग करतात. किती बक्टेरिया जंतू असतात आपल्या शरीरावर. इथे सगळं वाईट आहे बाबा...' मध्येच बोलता बोलता कुणाचा तरी विषय निघतो. ते गृहस्थ नुकतेच ढसाळांना भेटून गेलेले असतात. मी सुद्धा त्यांना ओळखत असतो. मी म्हणतो फार विद्वान माणूस आहे तो... ढसाळ म्हणतात, 'मी त्याच्यापेक्षा विद्वान आहे. तुमच्याकडे नुसतं ज्ञान असून उपयोग नाही. ते सगळं गुगलसारखं आहे. प्रचंड अभ्यास लागतो. खूप वाचन लागतं.'

मी त्यांचा निरोप घेतो. म्हणतो, पुन्हा येईन परत. मग १६ तारखेला माझा मोबाईलवर सकाळीच सात वाजता एसएमएस येतो- ढसाळ गेले!... पाठोपाठ त्यांचा ड्रायव्हर सलीमचा फोन येतो. ढसाळ गेले यावर माझा विश्वासच बसत नाही.

जय भीम... जय महाराष्ट्र... जय भारत ही जुगलबंदी आता कायमची बंद झालीय!

**– प्रदीप म्हापसेकर**
pmpm007@gmail.com
pradeep.mha

# नामदेव ढसाळ : विद्रोही अभिव्यक्तीचे आधुनिक आद्यपीठ

**डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी**

ते वर्ष होते १९६९. मुंबईच्या ए.जी.ऑफिसमध्ये असताना पांडुरंग वाडकर नावाचा माझ्याच सेक्शनमधला एक कवीमित्र असणारा सहकारी मला सांगत असे की तुझी भेट नामदेवशी व्हायला हवी. वारंवार त्याच्या तोंडून नामदेवचे नाव ऐकून माझीही उत्सुकता वाढली होती. कविता लेखन, काव्य-साहित्य आणि संस्कृतीचे संस्थात्मक क्षेत्र यात त्या एकोणीस वर्षांच्या वयातही बऱ्यापैकी नाव आणि काम वाट्याला आलेले असल्याने आणि विदर्भ-नागपूर भागातील असूनही हा तरुण या वयात एवढे काम करतो आणि कवितेतही नाव कमावतो याचे वेगळेच आकर्षण आणि कुतूहल मुंबईकरांना वाटण्याचे ते दिवस होते. ते दलितांचे असो वा दलितेतरांचे, त्या साऱ्याच विश्वात तेव्हा बोलबाला हा मुंबई-पुण्याचाच होता. इतर भागांतील लेखक-कवी, दलित असो की दलितेतर, यांना जणू कविता, लेखन, भाषा, कथा, साहित्य, संस्कृती यातले फारसे काही समजतच नाही आणि ते याबाबत फारच काहीतरी मागासलेले असतात असेच समजणारा अहंकार मुंबई-पुणे परिसर तेव्हा पुरेपूर बाळगून होता.

वाङ्मयीन-सांस्कृतिक व्यवहाराची सारी केंद्र आणि सत्ताच तिकडे एकवटलेली होती. त्यातही ही केंद्रे आणि ही सत्ता त्या काळी प्रामुख्याने केवळ सवर्णच नव्हे तर त्यातही ब्रह्मवर्गीयांच्याच गडद प्रभावाखाली व नियंत्रणाखाली होती. त्या साऱ्यांना 'सुरुंग' लावणाऱ्या छावण्या तेव्हा निर्माण होण्याचे 'अस्वस्थ वर्तमान' आणि ते देखील केवळ अधोविश्वासारखे आतल्या आत कुठेतरी मूळ धरत होते. त्याला पुरेसे प्रभावी आणि परिणामकारक असे शब्द फुटलेले नव्हते.

साहित्य, सौंदर्य, रुची, अभिरुची, संस्कृती या क्षेत्रांमध्ये विद्रोह, परिवर्तन, सामाजिक बांधीलकी, वास्तव, जीवनवास्तव, शोषण, लढा, मुक्ती, सामाजिक मुक्ती, सामाजिक क्रांती, सामाजिक न्याय, साहित्य चळवळ, राजकारण अशा शब्दांचा वावर देखील सुरू व्हायचाच होता. थोडक्यात, 'अब्राह्मणी' सौंदर्यशास्त्राची परिणामकारक जाण येण्याची सुरुवात देखील व्हायचीच होती. पर्यायाने, साहित्य, साहित्यव्यूह, सौंदर्य, रुची, अभिरुची, साहित्याचा व संस्कृतीचा व्यवहार हा सारा आजच्या परिभाषेत 'ब्राह्मणी' सौंदर्यशास्त्राच्या संकल्पनाव्यूहाबाहेर पडलेला नव्हता. त्या परिघाबाहेरच्या लेखन, अभिव्यक्ती, साहित्य, सौंदर्य यांना कलात्मक म्हणून, लेखन, साहित्य, अभिव्यक्ती म्हणून मान्यताच नव्हती. साहित्यातील 'लोक'व्यवहार हा केवळ वरच्या सर्वोच्च स्तरापुरता, उर्ध्व लोकांतला व उर्ध्व लोकांचाच, वरच्यांचाच तेवढा शिष्टसंमत व्यवहार होता.

एकोणीसशे साठच्या दशकाने साऱ्याच वरच्यांच्या या वरवरच्या समग्र जीवनव्यवहाराचाच झाडा घेणाऱ्या उठावाचे रणशिंग जगभरच फुंकलेले होते. मात्र या देशात त्याचा क्षीण असा आवाज उमटत होता आणि त्या आवाजाचा प्रतिध्वनी ज्यातून प्रभावीपणे जाणवत होता त्याचे नाव अनियतकालिकांतील, लघु नियतकालिकांतील अभिव्यक्ती एवढे सीमित होते. मात्र त्याचाही परिचय आमच्यासारख्या मुंबई-पुण्यापासून दूरस्थ ठिकाणच्या तेव्हाच्या विशीच्या उंबरठ्यावरील लिहित्या, कर्त्या, कार्यकर्त्या तरुणांना व्हायचाच होता.

तर पांडुरंग वाडकर या माझ्या एजीतल्या त्या सहकाऱ्याने एक दिवस मला सांगितले की आज नामदेव येणार आहे आणि तुझी व त्याची भेट मी करून देणार आहे.

दुपारी अडीच-तीनच्या दरम्यान एक माझ्याच वयाचा सडपातळ तरुण सोबत दोन-चार जणांचे 'टोळके' घेऊन आमच्या त्या ऑफिसात आला. हातात काही छापील अंक होते. पांडुरंगसोबत आम्ही सारेच मग मागच्या रस्त्यावर, युसीसच्या कार्यालयासमोरील चहाच्या टपरीवर एकत्र गेलो. युसीस म्हणजे जिथे मंगेश पाडगावकर, जयवंत दळवी, रमेश मंत्री कामाला होते व ज्यायोगे त्यांच्या परिचयाचा व पुढे स्नेहाचाही लाभ झाला ते केंद्र. मग पांडुरंगने परिचय करून दिला. म्हणाला, ''शिरप्या, हाच तो नामदेव'', आणि नामदेवला माझा परिचय करून देताना पांडुरंग म्हणाला, ''याच्या 'जोशी' आडनावावर जाऊ नको. तेवढे सोडले तर बाकी तो आपल्यासारखाच आहे.'' 'विद्रोह' नावाच्या अनियतकालिकाचा नामदेव तेव्हा कर्ता-धर्ता होता. पांडुरंग वाडकरच्या परिचय करून देण्याच्या त्या पद्धतीनेच खरे तर नामदेवच्या आणि माझ्या परस्परस्नेहाचा धागा जुळला, जो शेवटपर्यंत उभयपक्षी

कायम टिकला.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या ज्या 'प्रस्थापित' व्यासपीठाला नामदेवने आयुष्यभर कटाक्षाने टाळले आणि स्वत: कधी त्या व्यासापीठावर जाऊन त्या व्यासपीठाला मान्यताच प्रदान केली नाही व तसे करणे हे ज्या नामदेवने आयुष्यभर कटाक्षाने आपल्या धोरणाचा भाग म्हणून पाळले त्या नामदेवने केवळ नागपूरच्या ८०व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात दोन तास त्याच्या त्या ऐतिहासिक मुलाखतीसाठी जे दिले तो त्याने सतीश काळसेकर आणि माझ्यासारख्या त्याच्या स्नेह्यांच्या मित्रत्वाचा केलेला गौरव होता. नागपूरचे ते संमेलनही त्याच्या त्या अपवादात्मक उपस्थितीने संमेलनांच्या इतिहासातली एक संस्मरणीय नोंद ठरली.

या देशातली जातीव्यवस्था, त्यातही पेशवाईची देणगी म्हणून महाराष्ट्राला लाभलेला कठोर अस्पृश्यतेचा शाप आणि उत्तरपेशवाईत महात्मा फुल्यांचा त्या पार्श्वभूमीवरचा उदय, त्यांनी चेतविलेले स्फुल्लिंग, शाहू महाराज किंवा सयाजीराव गायकवाडांनी त्या संकल्पनाव्यूहाला दिलेली राजकीय प्रतिष्ठा व त्याचे सामाजिक परिणाम, प्रबोधन काळातील सुधारकांचे कार्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्या संपूर्ण विचारव्यूहात घातलेली अद्वितीय अशी मोलाची लढाऊ आणि क्रांतिकारक भर, दरम्यान व नंतर या समाजावर पडलेला मार्क्सवादी, समाजवादी, समाजसत्तावादी नवमानवतावादाचा प्रभाव, स्वातंत्र्यानंतर हाती आलेली त्या साऱ्या प्रभावाचा परिपाक असणारी भारतीय राज्यघटना, आंबेडकरांची धम्मक्रांती आणि हे सारे होऊनही या समाजावरची सनातन्यांची, शोषणाची, मानवताविहीन दृष्टीने माणसांना तुच्छ लेखणाऱ्यांची जीवनावरची, धर्मावरची, संस्कृतीवरची, समाज आणि राजकारणावरची, साऱ्याच सत्ताकेंद्रांवरची मुळीच ढिली न झालेली पकड आणि त्या साऱ्यांबाबत फारसे परिणामकारक न ठरलेले समाजकारण, सत्ताकारण, साहित्यकारण आणि राजकारण, या पार्श्वभूमीवर ज्या चळवळीचा, दलित लेखनाचा आणि दलित मुक्तिलढ्याचा उदय झाला आणि जो पुढे सर्वच दबल्या, पिचल्या, शोषित, वगळल्या गेलेल्या अशा साऱ्याच प्रवाहांच्या स्वायत्त अस्तित्वभानाचा प्रेरक लढा ठरला ते सारेच्या सारे एका सूत्रात आकळल्याशिवाय नामदेव ढसाळ, त्याचे पँथरचे स्थापनाकार्य, त्याची कविता, त्या कवितेचे विद्रोही जीवनमूल्य, त्याची भाषा, शब्दकळा, शैली आणि अभिव्यक्ती या साऱ्याचे आकलन आणि समर्थन अशक्य आहे.

नामदेवचा संबंध येण्यापूर्वी व त्याचा संसर्ग होण्यापूर्वी जी मुंबई मुंबईबाहेरच्या आमच्यासारख्या, त्यातही जन्मदलित नसणाऱ्या वाचक तरुणांना ठाऊक होती ती केवळ बाबूराव अर्नाळकरांच्या झुंजार, काळापहाड, धनंजय-छोटू या पात्रांचा त्यांच्या गाजलेल्या रहस्यकथांमधला जो वावर असे त्यातून. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याच्या साहित्यापासून, मुंबईपासूनचा दूरस्थ तरुण दूरच होता. त्यामुळे अमरशेख, गवाणकर, अण्णाभाऊ साठ्यांच्या शाहिरीतून व्यक्त झालेली वर्ग-जाणिवेची मुंबई; मुंबईबाहेरील तरुणाच्या तेव्हा परिचयाचीच नव्हती. ठाऊक होती ती केवळ आकर्षण, नवलाई, चंगळीचे, मौजेचे, गुन्हेगारीचे केंद्र असणारी मुंबई.

या राज्यातला एकत्र आलेला सारा उर्ध्वलोक म्हणजे मुंबई नाही हे नामदेवच्या सर्वांगीण कार्याने प्रथमच ठसठशीतपणे सर्वदूर पसरले. वरुन वरुन, बाहेरून, काठाकाठाने, मरीन ड्राईव्ह, मलबार हिल आणि नरीमन पॉईंटपर्यंतचीच ठाऊक असणारी मुंबई वगळून नामदेवच्या कवितेने, कार्याने जो अधोलोक व त्याचे जीवन साहित्याच्या केंद्रस्थानी आणले ते सारे जीवन केवळ नामदेवच्या झालेल्या त्यावेळच्या त्या वयातल्या परिचयाने माझ्यासारख्याला तेव्हा प्रत्यक्ष बघून जाणून घेण्याची तीव्र गरज निर्माण झाली आणि ते बघण्याचा, जाणण्याचा व त्याचे जीवनानुभवात रूपांतर होण्याचा योगही त्याच्यामुळेच आला.

नामदेवच्या 'गांडू बगीचा' या शब्दप्रयोगावर आक्षेप घेणाऱ्यांपैकी कित्येकांना अद्यापही या नावाचा प्रत्यक्षात बगीचाच तिथे होता हे आजही ठाऊक नाही. त्याचा 'गोलपिठा' हे ज्या जीवनाचे प्रतीक आहे ते जीवन मुंबईत ज्या भूगोलात वसले आहे तो भूगोल व त्याचा इतिहास, तिथले जीवन, त्याची जडणघडण व त्याची कारणे जाणून घेऊन ती कविता समजून घेण्यात अद्यापही अनेकांना रुची नाही.

मला मात्र त्या वयातच तो सारा त्या काळी तथाकथित सभ्यजनांना भयभीत करणाऱ्या वस्त्यांच्या नावाचा सारा भाग नामदेवमुळे अंतर्बाह्य बघता आला, जाणता आला. त्याने काढलेल्या वेश्यांच्या त्या ऐतिहासिक 'समता मोर्चा'चा साक्षीदार होता आले, ज्याचे पडसाद पलीकडे नागपूरसारख्या दूरस्थ ठिकाणी कृष्णकुमार कुसुमसारख्या कविमित्राच्या तसल्याच कार्याच्या निमित्ताने पुढे उमटले. ग्रँट रोड, अलंकार टॉकीज चौकापासूनचा पलीकडचा सारा परिसर, नामदेवने ज्याला 'संत फॉकलंड रोड' म्हटले तो रस्ता, फोरास रोड, कामाठीपुरा, भेंडीबाजार या तत्कालीन पूर्णपणे तथाकथित बदनाम वस्त्या ज्यांना व ज्यातल्या माणसांना, स्त्रियांना, तरुणांना नामदेवच्या कवितेने व कार्याने प्रथमच मराठी साहित्य व संस्कृतीच्या उरावर ताठपणे आणि प्रतिष्ठेने आणून साहित्याच्या केंद्रस्थानी बसवले. त्या साऱ्या वस्त्या, ते सारे जीवन, त्या जीवनाचे भोग, क्लेष, यातना, दु:ख, दारिद्र्य, उपासमार, बेरोजगारी व त्या साऱ्याच्या परिणामी उद्‌भवलेली गुन्हेगारी, त्या साऱ्याने किडलेले, पोखरलेले, उद्ध्वस्त झालेले जीवनाचे ते दर्शन, ज्याला केवळ आणि केवळ नामदेवनेच समर्थ, प्रभावी, परिणामकार शब्द दिला, हे जीवन त्यांच्या वाट्याला आणणाऱ्या साऱ्यासाऱ्यांना; मग ते देव, धर्म, धर्मग्रंथ, धर्मसंस्था, पुरोहित, संस्कृती, तत्त्वज्ञाने, दर्शने, विचार, पक्ष, पंथ, व्यवस्था म्हणून जे जे काही असेल त्या समग्र व्यवस्थांना कचकचून शिव्या हासडत, भोसकत, त्यांना

घायाळ करत व त्याच्या त्या अभिव्यक्तीची 'वाहवा' करण्याची इच्छाच होणार नाही इतक्या परिणामकारकरित्या त्याने शब्द दिला.

साऱ्याच तथाकथित सभ्य, सुस्वभावी, सुसंस्कृत, सद्वर्तनी, नामवंत व्यवस्थाधीशांचे इमले त्यामुळे धडाधडा सुरुंग लागून स्फोट व्हावे असे उद्ध्वस्त झाले नसते तरच नवल. तसे ते झाले. त्यामुळे त्यांनी त्याला व त्याच्या अभिव्यक्तीला, कार्याला व कर्तृत्वाला असभ्य, असांस्कृतिक, अश्लील, अर्वाच्च्य अशा विशेषणांनी निकालात काढणे त्यांच्या गरजेचे होते. ही गरज मात्र नामदेवच्या अभिव्यक्तीने निर्माण केली आणि तेच त्याच्या त्या अभिव्यक्तीचे यशही होते.

ती मुंबई, ती माणसे, त्या वस्त्या, ते जीवन हे सारे आपण जीवनाच्या नकाशावरच कधी गृहीत धरले नव्हते. त्यामुळे साहित्याच्या नकाशावर ते सारे असण्याचा प्रश्नच नव्हता. नामदेवच्या वाङ्मयीन बंडाने ते प्रथमच साहित्याच्या आणि जीवनाच्या नकाशावर आले.

मुंबईच्या तेव्हाच्या त्या वास्तव्यात वाट्याला आलेल्यांमध्ये नामदेवसोबतच प्रल्हाद चेंदवणकर होता, सतीश काळसेकर होते, भाऊ पाध्ये होते. चंद्रकांत खोत होते. नामदेवचा 'गोलपिठा' हा संग्रह येण्याच्या अगोदरचा तो काळ होता. पँथरची स्थापना होण्याच्याही अगोदरचा तो काळ होता. या कवींची ही टोळी, अर्थात ज्यात मीही कधीकधी होतो, चर्चगेट स्टेशनसमोर, अलंकार टॉकीजसमोर, गोलपिठ्यावर, कधी स्मशानात तर कधी लोकलमध्ये कविता वाचन करणारी टोळी होती.

'दलित पँथर'च्या स्थापनेनंतर काय झाले हे जेवढे महत्त्वाचे आहे त्याहून अधिक 'दलित पँथर'ची स्थापनाच का झाली हे महत्त्वाचे आहे. दलितांवरील वाढते अन्याय, अत्याचार आणि त्याला पायबंद घालण्याची तत्कालीन राजकारणाची व समाजकारणाची अनिच्छा व सत्तारुढ राजकारण्यांच्या नादी लागलेले रिपब्लिकनांचे राजकारण ही पँथरच्या स्थापनेची कारणे होती.

पँथरचा जाहीरनामा ही घटना त्या वेळेला मार्क्सच्या व एंजल्सच्या 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो'च्या धर्तीवरच बघितली गेली होती. नामदेव हा त्या साऱ्या लढ्याचा, लढणाऱ्यांचा प्रतीक झाला होता. नामदेव सोबत अर्जुन डांगळे, ज.वि. पवार, राजा ढाले, लतिफ खाटीक ही सारी मंडळी, हा सारा समूह तत्कालीन दलित सामूहिक मनाचीच अभिव्यक्ती साहित्यात आणि साहित्याबाहेरही करत होता. ती अभिव्यक्ती त्यामुळे केवळ त्या कवींची कविता उरली नव्हती तर ती साऱ्या वंचित, शोषित, दलितांच्या मुक्तीची, परिवर्तनाची, त्यांच्या लढ्याची धारदार अशी शस्त्रसामुग्री झालेली होती.

'दलितसाहित्य की मुक्तिलढा' या आपल्या पुस्तिकेतून प्रथमच वामन इंगळे या मुंबईपासून शेकडो मैल दूरच्या काटोलच्या कवी-लेखकाने दलितसाहित्य व दलित मुक्तिलढ्याचे अभिन्नत्व आणि हे साहित्य हे दलितांच्या मुक्तिलढ्याचे हत्यार या स्वरूपात प्रतिष्ठित केले होते.

नामदेव आणि या मित्रांच्या या अभिव्यक्तीचा शरचंद्र मुक्तिबोधांनी 'मानुषतेचे तत्त्वज्ञान' म्हणून गौरव केला होता आणि बाबूराव बागुलांनी पुढे त्याचा कक्षाविस्तार केला होता.

संपूर्ण कुरूप व्यवस्था उलथवून टाकण्याच्या आणि एक तीळ सर्वांनी कुरवंडून खाण्याच्या, 'माणसाने माणसांचे गाणे गावे' या समताधिष्ठित व सामाजिक न्यायाच्या संस्काराचे जग निर्माण करण्याचे व्रत घेतलेल्या या अभिव्यक्तीने धारण केलेली उग्रता, संतप्तता व हिंसक वाटणारा चेहरा त्यावेळच्या सांस्कृतिक, सामाजिक अत्याचाराचा प्रतिकार करण्यासाठी परिणामकारक ठरलेला मुखवटा होता. नरहर कुरुंदकर तेव्हाही सांगत असत की पँथरची ही मुले व्यासपीठावरून बोलतात तेव्हा त्यांचे फक्त ऐका, सहन करा, ते खाली उतरल्यावर त्यांच्याशी बोला म्हणजे त्यांच्या बोलण्यामागे काय ठसठसते आहे ते तुम्हाला उमगेल.

शिवसेनेच्या 'अरे'ला त्याच पद्धतीने 'कारे' ने उत्तर देणारी पँथरची एकमेव शक्ती तेव्हा प्रभावी व परिणामकारक ठरली होती.

नामदेवची कविता आणि दलितमुक्तीची प्रत्यक्षातली लढाई या अविभाज्य, परस्परात मिसळलेल्या बाबी होत्या. एकीला दुसरीशिवाय अस्तित्वच नव्हते. मराठी समाजाच्या आणि वाङ्मयाच्या इतिहासातील महानुभाव चक्रधरांचे परिवर्तनाचे बंड, ज्ञानेश्वराचे प्राकृत बंड, तुकारामाचा विद्रोह, केशवसुतांची तुतारी, मर्ढेकरांची आधुनिकता आणि लेखक-कार्यकर्त्या नामदेवच्या विद्रोही अभिव्यक्तीने दिलेला विद्रोह ही वाङ्मय आणि जीवनमूल्याची दीक्षा या इतिहासातून कधीही न पुसल्या जाणाऱ्या अमीट अशा घटना आहेत.

टॅक्सी ड्रायव्हर असणाऱ्या तेव्हाच्या नामदेव ढसाळच्या कवितेचे, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयातील अनंत काणेकरांच्या अध्यक्षतेखालील कविसंमेलनातील, ते नाट्यपूर्ण ऐतिहासिक आगमन पुढे प्रवास करीत आज ते मोठे वाङ्मयीन-सामाजिक संचित झालेले आहे.

तो या प्रांतात प्रवेश करीत होता त्यावेळी ग.दि. माडगूळकर हे 'महाकवी' हे भूषण मिरवीत होते. 'रसाळ नामदेवांचा काळ संपून ढसाळ नामदेवाचा काळ आला' हे त्यांचे उद्‌गार कौतुकाचे नव्हते तर तुच्छतेचे होते. मात्र ज्याच्याबद्दल माडगूळकर ते उद्‌गारले तो पुढे केवळ महाकवीच नव्हे तर 'युगकवी' होऊन राहिला आहे.

अकरावीच्या पुढे रुढ शिक्षण नसणाऱ्या नामदेवचे वाचन, आकलन, जाण आणि भान अद्वितीय होते. पौर्वात्य आणि पाश्चात्य दर्शने, तत्त्वज्ञाने, धर्म, संस्कृती, रुढी-परंपरा, समाजव्यवस्था, कलेतले, चित्रकला-शिल्पकलेतले, जगभरातले नवनवे वाद, सिद्धांत अशा कितीतरी अंगांनी नामदेवचे वाचन, जाण आणि भान कसे समृद्ध होते याचे संदर्भ त्याच्या कवितेतून, मुलाखतीतून, लेखनातून

उपलब्ध आहेत.

दलित पँथरची चळवळ ही अल्पजीवी ठरली हे खरेच आहे. मात्र तेवढ्या काळातच या चळवळीने जो दरारा निर्माण केला त्याचा परिणाम मात्र पुढे या राज्याचे समाजकारण, राजकारण आणि संस्कृतिकारणावर खोलवर ठसा उमटवणारे आणि दलितांवरील अत्याचाराच्या मोकाट मानसिकतेला वेसण घालणारे ठरले याबद्दल कुणाचेच दुमत असणार नाही.

या चळवळीचा मूल्यात्मक परिणाम हा महाराष्ट्राच्या प्रबोधन परंपरेतले एक कायमचे संचित होऊन राहिला. या चळवळीने केवळ दलितमुक्तीच्याच अंगाने कार्य केले असे नाही तर जातिविहीन, वर्गविहीन समाजरचनेचे आंबेडकरी उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या वाटेवरचा तो प्रवास होता. माझ्यासारखे जन्मदलित नसणारे कितीतरी सवर्ण तरुण दलित पँथरचे सहप्रवासी व या दलित मुक्तीलढ्याचे जे समर्थक झाले त्याचा लाभ पुढे नामांतर चळवळीला देखील झाला. अनेक सवर्ण तरुणांना डी-कास्ट, डी-क्लास होण्याची प्रेरणा आणि उर्जा देखील या चळवळीतून मोठ्या प्रमाणावर लाभली.

साहित्य-समाज-समाजकारण- राजकारण-संस्कृतिकारण हे परस्परांपासून वेगवेगळे कप्पेबंद ठेवणाऱ्या व त्यांचा परस्परांना संसर्ग न होऊ देता आपले सांस्कृतिक वर्चस्व अबाधित राखणाऱ्या प्रस्थापित व्यवस्थेच्या पायालाच दलित साहित्य आणि पँथरच्या चळवळीने जो सुरुंग लावला आणि हे परस्परसाहचर्य ज्या समग्रतेने समाजावर, समीक्षेवर बिंबवले गेले ते पायाभूत महत्त्वाचे कार्य करणाऱ्या अभिव्यक्तीचे नायकत्वच नामदेव ढसाळकडे जाते.

नामदेवची कविता आणि कविताबाह्य एकूणच सर्वच प्रकारची पँथरसहित अभिव्यक्ती ही केवळ वाङ्मयीन घटना नव्हती तर मराठीतली, महाराष्ट्रातली या देशातली ती पहिली समग्र अशी सामाजिक-वाङ्मयीन-सांस्कृतिक-राजकीय कृती होती.

लेखक-कलावंताने समग्र शोषणाच्या व्यवस्थेविरुद्ध उभारलेला व त्या व्यवस्थेला संपूर्ण नकार देण्याचा हा सांस्कृतिक विद्रोह अभूतपूर्व होता.

शब्दांना शस्त्र करून वैचारिक -सैद्धांतिक पातळीपासून तो प्रत्यक्ष रस्त्यावरची लढाई लढणारा हा लेखक-कवींचा मेळा नामदेवच्या नायकत्वाखाली उभा झाला होता.

क्रांती, संघर्ष, लढा, परिवर्तन याबद्दलच्या सवर्ण मध्यमवर्गीयांच्या कल्पना या फार रोमँटिक असतात. त्यातल्या ऐन धुम:श्चक्रीत स्वत: मध्यभागी येऊन सहभागी न होता इतरांनी तो लढा लढावा व यांनी मात्र तो लढणाऱ्यांचे फक्त मूल्यमापन करावे, लढणाऱ्यांनी काही तडजोडी केल्या तर त्यांना धारेवर धरावे, त्यांना दोषी ठरवावे, जे तडजोडी न करता सदेह शहीद होतील त्यांचेच तेवढे गुणगान गावे व तसे ते शहीद झाले तरच त्यांच्या विचार-कृती-व्यक्तित्वाला सुसंगत ठरवावे अन्यथा त्यांना विसंगत, पराभूत म्हणून हिणवावे, पर्यायाने, पारंपरिक सनातन मूल्य व मूल्यव्यवस्थेवर हे लढे व हे संघर्ष साधा ओरखडा देखील कसा उमटवू शकले नाहीत हेच सिद्ध करण्यात या वर्गाला नेहमीच रुची असते.

राणा प्रताप, राणी लक्ष्मीबाई, भगतसिंग वा नेताजी बोस यांनाही त्यांची अंतिम उद्दिष्टे गाठता आली नाही. तरीही त्यांचे कार्य-कर्तृत्व-व्यक्तित्व हे ऐतिहासिक मोलाचेच ठरते, त्यांना आलेल्या अपयशावरून ते जोखले जात नाही तर त्यांनी चेतवलेल्या स्फुल्लिंगावरून व त्याच्या पुढील व्यापक परिणामांवरून ते जोखले जाते. तीच कसोटी नामदेव, त्याची कविता, त्याने उभारलेली पँथरची चळवळ व त्या लढ्याला लावूनच त्याचे मोल जोखावे लागेल व त्यायोगेच त्याचे, त्याच्या कवितेचे व त्याच्या संघर्षाचे जतन करावे लागेल.

गांधींनी, सावरकरांनी केलेल्या आणि खुद्द डॉ. आंबेडकरांनीही पुणे करारासारख्या केलेल्या काही तडजोडींमुळे जसा त्यांच्या कार्यकर्तृत्वाच्या गाभ्याला धक्का पोचत नाही, तीच बाब नामदेवने केलेल्या तडजोडींबाबतही लागू करावीच लागेल. आचार्य अत्र्यांचेच व्यक्तिमत्त्व केवळ अफाट होते असे नव्हे तर नामदेवचेही व्यक्तिमत्त्व अफाटच होते. भारतात जातिव्यवस्था नसती तर नामदेव नोबेल पारितोषकाचा मानकरी ठरावा एवढे त्याचे मोल निश्चितच वाढवले जाऊ शकले असते.

त्याने इंदिरा गांधींवर का लिहिले, तो शिवसेनेत का गेला, त्याने सुसंगत असे एकपक्षीय राजकारण का केले नाही आणि त्यामुळे दलितांचे नुकसानच झाले, त्याने वापरली ती व तशी भाषा न वापरताही त्याला सांगायचे ते सांगता येऊ शकले असते; असे केवळ सवर्ण, मध्यमवर्ग म्हणत नसून दलित अभ्यासक-समीक्षकच जेव्हा म्हणतात तेव्हा असे समीक्षक-अभ्यासक हे जन्मदलित असोत वा सवर्ण, त्यांनी नामदेवचे कार्य, कर्तृत्व आणि व्यक्तिमत्त्व जोखण्याच्या कसोट्याच पारंपरिक आणि सनातनी राखलेल्या असतात. त्या साऱ्याचे प्रतिवाद स्वतंत्रपणे करता येतील. त्याचे हे स्थळ नव्हे.

मराठीला आणि एकूण भारतीय साहित्यालाच जीवनसन्मुख, जीवनवास्तवाचे, सामाजिक न्यायाचे आणि समग्र शोषणमुक्तीचे भान प्रदान करण्याचे ऐतिहासिक मोलाचे कार्य करणाऱ्या विद्रोही अभिव्यक्तीचे आद्यपीठ म्हणून जसे बाबूराव बागुलांचे नाव कायम उरणार आहे तसेच नामदेव ढसाळांचेही नाव त्याच कारणांसाठी कायमचे कोरले जाणार आहे.

**– डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी**
१०५, संकल्प सहनिवास, ४०, खरे टाऊन,
धरमपेठ, नागपूर ४४००१०
भ्रमणध्वनी : ९९६०४९३६२२
shripadbhalchandra@gmail.com

## साऊथ आफ्रिकेचा राष्ट्रपिता :

# नेल्सन मंडेला

**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**

डिसेंबर ५, २०१३ रोजी दूरदर्शन बघताना एक अभद्र बातमी पटलावरून सरकली आणि सर्व जगाचे डोळे ओले झाले. दक्षिण आफिक्रेचे राष्ट्रपिता नेल्सन मंडेला यांना देवाज्ञा झाली होती. ती अनपेक्षित नव्हती. वयाची नऊ तपं ओलांडून ते शतकाकडे प्रवास करत होते. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे गेल्या ३ महिन्यात त्यांची दवाखान्यातून सारखी ये-जा सुरू होती. तरीही ही काळवेळ जेव्हा शेवटी आली तेव्हा जगानं लांब सुस्कारा सोडून मान झुकवली. मंडेला जगाला वंदनीय व विशेषत: कृष्णवर्णीय लोकांना पूजनीय वाटत. वसाहतवादाच्या बेड्या तोडून स्वातंत्र्य मिळवण्यासाठी त्यांनी गांधींचा अहिंसावाद पत्करून यश कमावलं होतं.

दक्षिण आफ्रिकेत त्यावेळी १९ दशलक्ष कृष्णवर्णीय व फक्त ४.५ लक्ष गोरे लोक होते. तरीही अल्पसंख्याक बहुसंख्याकांवर सत्ता गाजवत होते. ही वर्णाधिष्ठित जुलूमशाही जगभर अपरथाईड म्हणून ओळखली जाऊ लागली. या अमानवी राज्यपद्धतीत लोकांचं चार गटांत वर्गीकरण करण्यात आलं- गोरे, रंगीत म्हणजे संमिश्र वर्णाचे, इंडियन्स व सर्वात खालचे कृष्णवर्णीय. यात पीतवर्णीय चिनी, जपानी व दक्षिण कोरियन कुठे बसतात हा प्रश्न होता. बसमध्ये कृष्णवर्णीय व इंडियन्स मागे बसत. हे पीतवर्णीय गोऱ्यांबरोबर समोर बसत पण इतर बाबतीत तेही गोऱ्यांपुढे कमी लेखले जात.

कृष्णवर्णीयांना जी आमनवी व पशुतुल्य वागणूक मिळे ती मरणयातनांपेक्षा तुच्छ असे. पैसे असूनही गोरे दुकानदार अनेकदा त्यांना वस्तू विकण्यास तयार नसत. थोडाही आवाज उठवला तरी घोर शिक्षा होई. पुष्कळदा गोरे त्यांची तोंडं मलविसर्जनासाठी वापरत. कृष्णवर्णीयांना फक्त वर्षाला ३६० रँड एवढं उत्पन्न करमुक्त असे, पण गोऱ्यांना ७५० रँडपर्यंतही सवलत मिळे.

असा उघड पक्षपात व अमानवी वागणूक कुणाला आवडेल? त्याला विरोध करण्यासाठी कृष्णवर्णीयांनी आफ्रिकन नॅशनल काँग्रेस (ANC) नावाचा पक्ष स्थापन केला. त्यात गोऱ्यांवर गनिमी हल्ले करून सूड उगवण्याचा भाग होता. त्यात तरुण नेल्सन १९४३ मध्ये विधिज्ञ झाल्यावर सामील झाले. ते त्यावेळी दक्षिण आफ्रिकेतले पहिले काळा वकील. विधी शिक्षणानं त्यांना इंग्लंडमध्ये जाऊन वकील होणाऱ्या सावरकर, गांधी, नेहरू आदींप्रमाणे पारतंत्र्याची जाणीव झाली आणि नेल्सन यांनी सशस्त्र लढा केला. त्याच वेळी १९४४ मध्ये त्याचं एव्हलीन मेस (Evelyn Mase) नावाच्या मुलीशी लग्न झालं.

एक तरुण क्रांतिकारक म्हणून चैतन्य त्यांच्या रक्तात सळसळत होतं. ANC च्या लष्करी विभागाचा प्रमुख म्हणून नेल्सनची नियुक्ती झाली. गोऱ्यांवर छुपे हल्ले चढवून विरोध दर्शवणं हे त्या विभागाचं काम. ते किती धोक्याचं आहे हे लवकरच नेल्सनच्या लक्षात आलं. राष्ट्रद्रोहाच्या आरोपाखाली १९५६ मध्ये त्यांना अटक करण्यात आली. त्या खटल्यात ते निर्दोष ठरले व १९६१ साली त्यांची सुटका झाली. हे सर्व होत असताना १९५८ मध्ये त्यांचा घटस्फोट झाला. या लग्नापासून त्यांना काही अपत्यं झाली. त्यानंतर त्यांनी विनी मॅडिकीझेला (Winniee Madikizela) नावाच्या स्त्रीशी दुसरं लग्न केलं. परंतु गृहपाशामुळे त्यांच्यातला क्रांतिकारक मागे पडला नाही. त्यांनी स्वातंत्र्याच्या चळवळीत स्वत:ला झोकून दिलं.

मग १९६० मध्ये गोऱ्या सरकारनं आदोलकांवर गोळीबार करून ६९ लोकांची कत्तल केली. या हत्याकांडाची जगानं दखल घेतली. देशातलं वातावरण अधिकच प्रक्षोभक झालं. प्राणभयामुळे ते अज्ञातवासात गेले पण हल्ले सुरूच राहिले. अशा एका मोहिमेत ते पकडला गेले. पुन्हा कोर्टकचेऱ्या झाल्या. यावेळी त्यांना दोषी ठरवण्यात येऊन १९६४ मध्ये आजन्म जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली. केप टाऊनजवळ असलेल्या रॉबीन एका नावाच्या बेटावर त्यांची बोळवण झाली. हे समुद्रवेष्टित बेट एकेकाळी कुष्ठरोगग्रस्तांचं निवासस्थान असे.

तिथे नेल्सन एकटे नव्हते तर त्यांच्याबरोबर सुमारे ३००० इतर राजकीय कैदी होते. त्यातले काही इंडियन होते. कैदेतलं जीवन अगदी खडतर आणि कष्टिक. रोज हवालदाराच्या नजरेखाली भर उन्हात खडक फोडावे लागत. उसंत घेतली तर हवालदार चाबूक वापरण्यास कमी जास्त करत नसे. उन्हाची तीव्र किरणं खडकांवरून परावर्तित होऊन सारखी डोळ्यांत जात असल्यामुळे त्यांची दृष्टी अधू झाली. त्याचवेळी ते क्षयानं आजारी पडले, पण नशिबानं त्यातून बाहेर पडले.

राहण्याची व्यवस्था तर अगदीच अमानवी. एका लहान खोलीत ते २७ वर्षं जमिनीवर झोपले. मलविसर्जनासाठी त्यांना बादली देण्यात येई. वर्षाकाठी एक व्यक्तीच त्यांना भेटायला येऊ शकत होती. दर सहा महिन्यांतून फक्त एक पत्र त्याला मिळत असे. सुरुवातीला घड्याळ देखील नाकारण्यात आलं. याप्रमाणे बाह्य जगाशी संबंध तोडावे लागल्यामुळे एकांतवासाची शिक्षाही भोगावी लागली. त्यांचा मोठा मुलगा अपघातात गेला तेव्हा त्याच्या अंत्यविधीसाठी जाण्याची परवानगी त्यांना नाकारण्यात आली होती. त्यानंतर त्यांचा दुसरा मुलगा एड्सनं वारला.

रात्री मिळणारा एकांतवास त्यांनी कारणी लावला. तिथे चिंतन व मनन करण्यास भरपूर वेळ मिळाला. तसं करताना त्यांच्यावर गांधीवादाचा प्रभाव पडला. अमेरिकेत मार्टिन ल्यूथर किंग नावाच्या धर्मगुरूनं गांधींचं अहिंसावादी तत्त्व पाळून कृष्णवर्णीय लोकांसाठी १९६४-१९६५ साली नागरी हक्क मिळवले होते. या चळवळीचा नेल्सनवर बराच परिणाम झाला. ते एक माथेफिरू तरुण म्हणून कैदेत गेले, परंतु एक गांधीवादी सामंजस्य असलेला माणूस म्हणून बाहेर पडले.

त्या काळात त्यांच्यावर पत्र पाठवण्याची बंदी असली तरी त्यांनी भरपूर पत्रलेखन केलं. त्यांनी आपल्या दोन लहान मुलींना लिहिलेली पत्रं फार हृदयस्पर्शी होती. त्यांना भेटायला गेलेल्या एका मित्रानं ती पत्रं कैदेतून बाहेर आणली आणि प्रसिद्ध केली. त्यावेळी त्याच्या मुली अनाथ झाल्या होत्या कारण ते तुरुंगात गेल्यावर त्यांच्या बायकोनं त्यांची चळवळ सुरू ठेवली. तिला देखील लगेच पकडून कैदेतील हवा खावी लागली. त्यामुळे मुलींच्या जडणघडणीच्या वेळी कुठलाच पालक हजर नव्हता. ''आता तुम्हाला ख्रिसमससाठी भेटवस्तू देण्यास कुणी उरलं नाही. रात्री झोपवण्यापूर्वी अंगावर पांघरूण ओढून 'गोड स्वप्न बघा' यापासून तुम्ही कायमचे वंचित राहिला.'' अशा हृदयाला भिडणाऱ्या भाषेतली त्यांची पत्रं वाचून वाचकांचे डोळे ओले झाले तर नवल कसलं?

कैदेत असताना नेल्सन आफ्रिकाना ही एक नवीन भाषा शिकला. ती आफ्रिकेतल्या गोऱ्या लोकांची भाषा. पुढेमागे आपल्याला वसाहतवाद्यांशी स्वातंत्र्याच्या वाटाघाटी कराव्या लागतील हे त्यांनी अगोदरच ओळखलं होतं. त्या इंग्रजीत झाल्या तर त्यांच्या डोक्यात जातील पण त्यांच्या मातृभाषेत झाल्या तर हृदयाला भिडतील असं त्यांचं ठाम मत होतं आणि अगदी तसंच झालं. अगोदरच नेल्सनचा स्वभाव मनमिळावू आणि मोकळा. हवालदार जरी त्यांचा छळ करत तरी त्यांच्याशी ते तुच्छतेनं बोलत नसत. त्यांच्या या सभ्य वागणुकीचा सकारात्मक परिणाम झाला. इतर कैद्यांना ती पटत नसली तरी ते नेल्सनना मान देऊ लागले.

त्यावेळी बाह्य जगातही अनेक राजकीय स्थित्यंतरे होऊन वसाहतवाद कालबाह्य झाला. एकेकाळी ८५ टक्के पृथ्वीवर राज्य करणाऱ्या युरोपीय देशांनी १९६० च्या दशकात जवळजवळ सर्व



आफ्रिका खंडातल्या देशांना स्वातंत्र्य दिलं. फक्त उरला तो दक्षिण आफ्रिका. या देशावर अपरथाईडची पकड अजून कायम होती. त्याविरुद्ध नव्यानंच स्वातंत्र्य मिळालेल्या देशांनी संयुक्त राष्ट्रसंघात जोरदार आवाज उठवला. यात भारताचं योगदानही महत्त्वाचं होतं. सर्व देशांनी दक्षिण आफ्रिकेवर बहिष्कार घातला. त्या देशाच्या आयात-निर्यातीवर बंधनं लादली. त्यांचे खेळाडू ऑलिंपिक सामन्यांत भाग घेऊ शकले नाही. याप्रमाणे दक्षिण आफ्रिका अलिप्त झाला. त्या देशाचं मुख्य परदेशी चलन मिळवण्याचं साधन म्हणजे हिऱ्याची निर्यात. त्यावेळी आणि आजही त्यांची डी बेअर्स (De Beers) नावाची कंपनी जगातील हिऱ्यांची किंमत नियंत्रित करते. जसजसं जग अपरथाईडविरुद्ध जागृत झालं तसतसे या कंपनीवर शिंतोडे उडाले आणि कंपनीच्या व पर्यायाने देशाच्या उत्पन्नाला फटके बसले.

त्यावेळी देशाचे अध्यक्ष होते पी.डब्ल्यू. बोथा (P.W. Botha). ते कट्टर वंशवादी. १९८५ साली एका भाषणात ते म्हणाले की गोरे कृष्णवर्णीयांपेक्षा श्रेष्ठ असून त्यांचं वर्चस्व अबाधित राहील. आमच्या शास्त्रज्ञांनी एक रसायन शोधून काढलं असून ते कृष्णवर्णीयांना पाण्यातून किंवा कोकमधून पाजल्यानं त्यांचा हळुहळू वंशनाश करता येईल. त्यामुळे कृष्णवर्णीयांना स्वातंत्र्य देण्याचा प्रश्नच निघत नाही. पण १९८९ मध्ये त्यांची वर्णवादी कारकीर्द संपुष्टात आली आणि त्यांच्या जागेवर डी क्लर्क (De Klerk) नावाचे राजकारणी निवडून आले.

त्यांच्या पोटात बोथांसारखी वर्णद्वेषाची आग नव्हती. सर्व जगानं अपरथाईडचा निषेध केल्यामुळे व त्याचे विपरीत परिणाम देशावर झाल्यामुळे नवनिर्वाचित अध्यक्षांनी मंडेला कैदेत असतानाच त्यांच्याशी गुप्त वाटाघाटी सुरू केल्या. ब्रिटिशांनी सिमल्यात १९४५ मध्ये गांधींबरोबर केल्या तशा.

आता स्वातंत्र्य द्यावं की नाही हा प्रश्न नव्हता. ते दिलं तर त्याची परिणती कशात होईल ही समस्या मोठी होती. १९६०च्या दशकात आफ्रिकेतल्या अनेक देशांना स्वातंत्र्य मिळालं. त्या देशांनी गोऱ्यांना हाकलून दिलं. त्यांची संपत्ती लुटली. परंतु या क्षणिक

सूड उगवण्यापोटी त्या देशांवर गंडांतर ओढवलं. भांडवल व तंत्रज्ञान गोऱ्यांजवळ असल्यामुळे हे देश कोंडीत सापडले आणि जमातीय कलहात आकंठ बुडाले. याचं उत्तम उदाहरण म्हणजे झिम्बाब्वे या वसाहतीला १९६५ मध्ये स्वातंत्र्य मिळालं आणि कृष्णवर्णीयांनी गोऱ्यांचा सूड उगवला. त्यांची हकालपट्टी तर केलीच, शिवाय त्यांची संपत्ती, शेती व घरं जप्त करून ती देशी कृष्णवर्णीय लोकांना वाटून दिली. असं करताना त्यांनी सोन्याची अंडी देणारी कोंबडी कायमची कापून टाकली आणि सर्व देशावर आर्थिक अरिष्ट कोसळलं. १९८० मध्ये रॉबर्ट मुगाबे निवडून आले आणि त्यांच्या कारकिर्दीत भाववाढीनं विक्रम गाठला. नोव्हेंबर २००८ मध्ये भाववाढ ७९,८००,०००,००० टक्क्यांनी (हा मुद्रणदोष नाही) वाढली. सरकारनं १०० अब्ज झिम्बाब्वे डॉलरच्या नोटा छापण्यास सुरुवात केली. १ अमेरिकन डॉलर विकत घेण्यास २.८ अब्ज झिम्बाब्वे डॉलर लागत! एका पावासाठी ५५० दशलक्ष झिम्बाब्वे डॉलर मोजल्याशिवाय गत्यंतर नसे. या भाववाढीमुळे सर्व अधिकृत व्यवहार बंद होऊन काळाबाजार सुरू झाला. याशिवाय जमातीय द्वेषापोटी प्रचंड जीवितहानी झाली.

हे सर्व मंडेलांना स्वातंत्र्योत्तर काळात टाळायचं होतं. पण देश संक्रमणावस्थेतून जात असताना वर्णीय शांतता प्रस्थापित करणं म्हणजे एक भीमकृत्यच होतं. गोऱ्यांच्या हातून अमानवी वागणूक मिळाल्यामुळे कृष्णवर्णीय त्यांचा सूड उगवण्यास आसुसलेले होते. तसंच त्यांच्या हिंसक वृत्तीमुळे गोरे त्यांच्याकडे काविळीच्या दृष्टीनं बघत. याप्रमाणे वर्णकलह अटळ होता. गोऱ्यांनी आपल्या आयुष्याची तब्बल २७ वर्षं चोरून नेली म्हणून मंडेला जरी क्षमा करण्यास असले तरी त्यांचे अनुयायी एवढं औदार्य दाखवण्यास तयार नव्हते. त्यागामुळे प्राप्त झालेल्या नैतिक बळामुळे मंडेला विरोधकांचं मत वळवू शकले. त्यांना बंधुत्व, समानता व न्याय असलेला सर्वसमावेशक समाज स्थापन करायचा होता. त्यासाठी गोऱ्यांशी हातमिळवणी करणं अपरिहार्य होतं हे लक्षात घेऊन त्यांनी डी क्लर्कना विश्वासात घेतलं व पुढे त्यांना उपाध्यक्ष म्हणून नेमलं. त्यामुळे गोऱ्यांनाही नवीन सरकारात प्रतिनिधित्व मिळालं.

स्वातंत्र्याच्या वाटाघाटी संपायला पाच वर्षं लागली. शेवटी १९९० मध्ये वयाच्या ७१ व्या वर्षी मंडेलांची सुटका होऊन देश स्वतंत्र झाला. एकेकाळचा माथेफिरू आता गांधींचा अनुयायी झाला होता. वर्णवर्चस्वाची अंगभूत असहिष्णुता आता त्यांना मान्य नव्हती. मनात सूडाचा अग्निकुंड जरी धगधगत असला तरी बाह्यत: स्थितप्रज्ञता दाखवणं आवश्यक होतं. म्हणून त्यांनी एक अभिनव योजना अमलात आणली.

मंडेलांनी खास कोर्ट नेमलं. तिथे जनतेनं न्यायाधीशासमोर आपल्या आयुष्यातले गुन्हे उघडपणे कबूल केले. अशा लोकांना कायद्यापासून अभय देण्यात आलं. मनातलं विष याप्रमाणे ओकल्यामुळे मन हलकं होऊन द्वेष करण्यास कारण उरलं नाही. काही ठिकाणी सूडबुद्धीमुळे रक्तस्राव झाला पण रक्ताचे पाट मात्र वाहिले नाहीत हे विशेष. मंडालेंचा फॉर्म्युला याप्रमाणे यशस्वी झाला. आफ्रिका खंडात प्रमाणित समजल्या जाणाऱ्या धोपटमार्गाचा त्याग करून वर्णसौहार्द प्रस्थापित करण्यातच मंडेलांचं मोठेपण आहे. जगाच्या इतिहासातलं ते एक सोनेरी पान समजण्यात येतं.

हे ओळखून त्यांना व डी क्लर्कना १९९३ मध्ये नोबेल देण्यात आलं. यापूर्वी गांधींच्या अहिंसावादी तत्त्वज्ञानाचा अवलंब करून मार्टिन ल्यूथर किंगनं अमेरिकेतल्या कृष्णवर्णीयांसाठी नागरी हक्क मिळवले होते. त्यांनाही नोबेल पुरस्कार मिळाला होता. या तत्त्वज्ञानाचे प्रणेते– गांधी, मात्र या सन्मानापासून वंचित राहिले हे दुर्दैव.

१९९४ मध्ये स्वतंत्र दक्षिण आफ्रिकेत पहिल्या राष्ट्रीय निवडणुका झाल्या. अध्यक्षपदासाठी मंडेला उभे राहिले. वयाच्या ७५ व्या वर्षी, की जेव्हा सर्वसाधारण मनुष्य वानप्रस्थाश्रमात शिरतो. मंडेला बहुमतानं निवडून आले. प्रथमच त्या देशात खऱ्या अर्थानं लोकशाही सुरू झाली. पहिली मुदत संपल्यावर ते ८०च्या घरात गेले. दुसऱ्या मुदतीसाठी उभे राहिले असते तर ते पुन्हा निवडून येण्याची– रात्र संपल्यावर दिवस उगवतो एवढी – शाश्वती होती, पण ते सत्तालोलुप नव्हते. त्यांनी राजकारणाला रामराम ठोकला व उरलेलं आयुष्य आपल्या नातवंडांबरोबर खर्च करण्यास आपल्या ग्रामस्थळी निघून गेले.

त्यांनी राजकीय संन्यास घेऊन आज एका तपापेक्षा जास्त काळ लोटला. त्या काळात वर्णीय कलहानं फारसं डोकं वर काढलं नसलं तरी ती शांतता देशात पोषक ठरली नाही. अर्थकारणाचा वाढदर २०१३ मध्ये फक्त २ टक्के होता. तरुणपिढीत बेरोजगारीचं प्रमाण ८० टक्के आहे. त्यामुळे देशात सारखी आंदोलनं होत असतात. स्वातंत्र्य मिळवणं एक आणि प्रगती करणं दुसरं हेच खरं. त्यासाठी तपश्चर्या, अभ्यासवृत्ती आणि शिक्षण लागतं. हे गुण आत्मसात करण्यासाठी या देशाला दुसरा मंडेला शोधून काढावा लागेल.

त्यांच्या मृत्यूची बातमी जाहीर होताच देश शोककांडात बुडून न जाता मरणोत्सवात गुंतला. लोक नृत्य करू लागले. सामूहिक गाणी गाऊ लागले. त्यांच्या देशात मृताचा याप्रमाणे आनंदोत्सव करून निरोप घेतात. अश्रूंची टिपं कुठे दिसली नाहीत.

पण एक थोर मानव काळाच्या पडद्याआड झाला म्हणून जगानं मात्र डोळे पुसले.

**– डॉ. अनंत लाभसेटवार**
2 Scond Street,
Unit # 2001
Jersey City, N.J. 07302
USA
latalabh@aol.com

# इथियोपिया

## डॉ. माधवी मेहेंदळे

आफ्रिका खंडाविषयी ऐकलं होतं ते मुख्यत: जंगलसफारी करून आलेल्या लोकांकडून. 'फार' प्राणी असतात, ते 'फार' मोठमोठे असतात, ते 'फार' जवळून बघायला मिळतात, असा 'फार'चा पाढा या लोकांकडून खूप वेळा ऐकला होता. जिवाला फार कष्ट देऊन प्राणी बघणं मला स्वत:ला फारसं रोमांचकारी वाटत नव्हतं. त्यामुळे परदेशी प्रवासाच्या माझ्या इच्छा यादीत आफ्रिका मी वगळून टाकला होता. रोटरी क्लबतर्फे आफ्रिकेत शस्त्रक्रिया शिबिरं घेतली जातात व त्यासाठी भारतीय डॉक्टर जातात हे माहीत होतं. माझ्या कानावर 'इथियोपिया' अशा नावाची कुणकुण येऊ लागली. 'येणार का?' अशी विचारणा झाली. डोक्यात विचार सुरू झाले.

'इथियोपिया' नाव घेतलं की छातीचे पिंजरे झालेली हडकुळी मुलं, गेल्या जन्मापासूनच उपाशी असतील अशी- नक्की जिवंत आहेत का अशी शंका येईल अशी माणसं, अशी चित्रं टीव्हीवर, मासिकांमध्ये पाहिलेली आठवू लागली. स्वार्थी व्यावसायिक विचार केला तर इथियोपियाला जाणं मुळीच फायद्याचं नव्हतं. एक तर आपला दवाखाना बंद राहणार ते नुकसान आणि तिकडे ज्या शस्त्रक्रिया करू त्या सगळ्या अर्थातच मोफत करणार. पण 'असले' व्यवहारी विचार म्हणजे माझ्या दृष्टीनं अविचार.

नवीन देश बघायला मिळणार. नवी माणसं, नवी संस्कृती. त्यात मला आयोजनाचे काही कष्ट नव्हते. कळपाबरोबर जायचं व कळपाबरोबर परत यायचं. मी 'होकार' कळवून टाकला. 'होकार' दिल्याबरोबर इमेलचे धबधबे सुरू झाले. डॉक्टर म्हणून जाणार होते, तिथे शस्त्रक्रिया करणार होते. मग मी नक्की डॉक्टर आहे का, शस्त्रक्रियेचा किती अनुभव आहे, तिथल्या सरकारचा परवाना मिळवावा लागेल, इथला परवाना आहे ना अशी सर्व कागदपत्रं इकडून तिकडे पाठवणं सुरू झालं. 'कॉम्प्युटर' नावाचं यंत्र आणि इंटरनेट नावाची जादू हाताशी नसती तर हा द्राविडी प्राणायाम कसा केला असता असा विचारही करवत नाही.

चंदिगडमधून कुणीतरी मोहरे हलवत होतं. चंदिगडचे व त्याच्या आसपासचे काही डॉक्टर व काही पुण्याचे असे मिळून जवळजवळ २५ डॉक्टर व ५-६ स्वयंसेवक अशी ३०-३२ जणांची जंगी टीम होती. सरकारी पातळीवर बरीच वरच्या परवानग्यांची चक्रं फिरत होती.

मध्येच बातमी आली की कुठेतरी माशी शिंकली त्यामुळे तारखा पुढे गेल्या. असं दोन-तीन वेळा झाल्यावर मी डोक्यातून विचार काढून टाकला. जेव्हा खरी वेळ येईल तेव्हा बघू. माझ्या पुण्याच्या पेशंटच्या ऑपरेशनच्या तारखा त्याप्रमाणे सारख्या पुढेमागे करून मीही कंटाळले होते.

अजून एक तारीख आली, पण ती माझ्यापुढे धर्मसंकट घेऊन आली. त्या तारखा जर खऱ्या ठरल्या तर यामध्ये वडिलांच्या वर्षश्रद्धाची तारीख होती. कर्मकांडामध्ये अडकून पडण्याचा माझा स्वभाव नाही. पण बाबांच्या बाबतीत मनाचा सगळा हळवा कारभार. बाबा गेले हे अजूनही तसं मान्य केलं नव्हतं. त्यांच्यासाठी जे जे काही शक्य आहे ते करायची इच्छा होती. त्यात वर्षश्राद्धही धरलं होतं. माझ्या गोतावळ्याला मी बाबांच्या वर्षश्राद्धाला अनुपस्थिती राहणं काही रुचत नव्हतं. शेवटी मी, बाबा असते तर काम केलेलं त्यांना अधिक आवडलं असतं असा विचार केला.

मात्र या धर्मसंकटामध्ये माझे व माझ्या गोतावळ्याचे अनेक भावनिक चढउतार करून इथियोपियाची तारीख अजून पुढे गेली. मी निश्चिंत मनानं वर्षश्राद्धाला उपस्थित राहिले.

एकंदर नमनाला चांगला मोठा घडाभर तेल वाहून झालं. त्यानंतर आलेली तारीख मात्र खरी तारीख ठरली. कागदपत्रांची किचकट पूर्तता आधीच झाली होती.

पुण्याहून आम्ही आठ जण व चंदिगड आणि त्याच्या आसपास म्हणजे पानिपत, लुधियाना अशा ठिकाणांहून तब्बल २०-२५ जण या मोहिमेत सहभागी होतो. दिल्लीहून इथियोपिया एअरलाइन्सनं आदिस अबाबाला जाणार होतो. नवीन माणसांबरोबर, नवीन देशात, नवीन संस्कृतीमधल्या लोकांसाठी, नवीन वातावरणात काम करायचं होतं. तेही शस्त्रक्रियेसारखं नाजूक व जबाबदारीचं काम.

आमच्या जंगी चमूसाठी इथियोपिया एअरलाइन्सनं चक्क वेगळाच 'चेक इन' काउंटर उघडला होता. आमच्यामध्ये सर्व प्रकारचे सर्जन होते. नेत्रतज्ज्ञ, कान-नाक-घसा तज्ज्ञ, स्त्रीरोग तज्ज्ञ, मूत्ररोग तज्ज्ञ, प्लास्टिक सर्जन, डेन्टल सर्जन, जनरल



सर्जन, लेप्रोस्कोपिक वगैरे. या सर्वांच्या शस्त्रक्रियेला लागणारं सर्व सामान आम्हाला बरोबर न्यायचं होतं. इथियोपियामध्ये काही मिळणार नाही असं गृहीत धरलं होतं. त्यामुळे ३३ जणांच्या वैयक्तिक सामानाव्यतिरिक्त आमच्याकडे १६०० किलो वजनाची ११२ खोकी होती. इथियोपियन एअरलाइन्सनं आम्हाला हे महाप्रचंड सामान न्यायची परवानगी दिली, एवढंच नव्हे तर त्यासाठी काही पैसेही आकारले नाहीत. एवढं प्रचंड सामान व एवढी मोठी टीम अखेर इथियोपियाला रवाना झाली.

इथिओपिया ७००० फूट उंचीवर वसलेलं आहे. त्यामुळे तिथे वर्षभर छान थंड हवा असते. साधारण ५ ते २५ डिग्री सेल्सियस अशी. जीवघेणी बोचरी थंडी किंवा बर्फ हा प्रकार तिथे नाही. आपल्याकडे हिमालयाच्या आसपास कशी सूचिपर्णी वृक्षांची दाटी दिसते तशी तिथेही दिसते. 'आदिस अबाबा' ही इथियोपियाची राजधानी. 'अम्हारिक' (Amharic) ही तिथली भाषा. काही सुशिक्षित लोक सोडले तर बाकी जनता अम्हारिक भाषाच बोलत होती. जवळजवळ कुठल्याच पेशंटला इंग्रजीचा गंध नव्हता. अम्हारिक भाषेतील काही शब्द ओळखीचे वाटत होते. साबणाला 'साबुना', सूपसाठी 'शोरबा' असे. अम्हारिक भाषेतील 'आदिस अबाबा' शब्दाचा अर्थ होता- 'नुकतंच उमललेले फूल'.

आमची 'आदिस अबाबा'च्या एका छान हॉटेलमध्ये सोय करण्यात आली होती. विमानतळाहून हॉटेलपर्यंत दिसलेलं आदिस अबाबाचं चित्र भारतातील एखाद्या छोट्या शहरासारखं होतं. म्हणजे मुख्य दोन-तीन रस्ते चकाचक, इतरत्र मात्र बकालपणा. छोट्या टपऱ्या, जुनी बसकी घरं, झोपडपट्ट्यांसदृश वसाहती. आमच्या संपूर्ण मुक्कामात लक्षात आलं की इथियोपियात चक्क स्कूटर्स, मोटारसायकली अशी दुचाकी वाहनं दिसतच नाहीत. दुचाकीशिवाय रस्ते बघून गहिवरूनच आलं. चौकशी केल्यावर कळलं की दुचाकी इतक्या महाग आहेत की त्या विकत घेण्याचा विचार इथले लोक करू शकत नाहीत. सार्वजनिक बस होत्या. निळ्या रंगाच्या टॅक्सी होत्या. काही ठिकाणी चक्क बजाजच्या रिक्षा होत्या. त्याला तिथले लोक 'बजाज' म्हणायचे. टांगे पण दिसले.

आम्ही ज्या हॉटेलमध्ये उतरलो होतो ते भलंमोठं होतं. खूप जुनं होतं. तिथे नैसर्गिक गरम पाण्याचे झरे होते. तेच गरम पाणी वर्षानुवर्षं पूर्ण हॉटेलमध्ये खेळवण्यात आलं होतं, पण आंघोळ करताना मात्र कितीही घासलं, धुतलं तरी अंगाचा साबण गेल्यासारखं वाटेचना. तसंच बुळबुळीत अंग घेऊन बाहेर यायला लागत होतं.

आमची टीम आली त्याअगोदर दोन डॉक्टरांनी येऊन तिथली सगळी पाहणी केली होती. तिथल्या हॉस्पिटलमध्ये काय आहे, आम्हाला काय बरोबर घेऊन जायला लागेल याचा अंदाज घेतला होता. अगदी तिथल्या आरोग्य मंत्रालयाशीही बोलणं झालं होतं. आम्ही आलो त्यादिवशी संध्याकाळी आमच्या स्वागताप्रीत्यर्थ मेजवानी आयोजित केली होती. त्याला इथिओपियाच्या पंतप्रधानांची पत्नी, इथियोपियातील भारतीय राजदूत आणि इतर अनेक मान्यवर उपस्थित होते.

एवढं असूनही आम्हाला बाबूगिरीचा झटका बसला. विमानतळावरील कस्टम अधिकाऱ्यांनी आम्ही आणलेलं सामान सोडायला तीन दिवस लावले. त्यामुळे काम करण्याच्या अगदी सळसळत्या उत्साहानं आलेल्या आम्हा डॉक्टरमंडळींना हातावर हात ठेवून बसावं लागले.

सामान आल्यानंतरही आमच्या अडचणी संपल्या नव्हत्या. बाहेरचे डॉक्टर येऊन आम्हाला काहीतरी शिकवणार या विचारामुळे तिथल्या डॉक्टरांचा अहं दुखावला गेला होता. त्यामुळे ते लवकर सहकार्य करेनात. आम्ही त्यांच्याबरोबर काम करू, त्यांच्या मदतीनं करू असं सांगितल्यावर हळूहळू त्यांचा विरोध कमी झाला. मी विचार केला, की माझ्याही दवाखान्यात जर अचानक कुणी आलं आणि म्हणायला लागलं की आम्ही तुमच्या दवाखान्यात, तुमच्या पेशंटवर ऑपरेशन्स करतो तर माझी सुद्धा विरोधाचीच भावना होऊ शकेल.

आदिस अबाबामधील तीन वेगवेगळ्या हॉस्पिटलांमध्ये काम सुरू झालं. सकाळी हॉटेलमध्ये नाश्ता करून मंडळी आपापल्या हॉस्पिटलकडे रवाना व्हायची. दिवसभर काम करायची. संध्याकाळी परतल्यावर दिवसभराचा आढावा घेणारी एक एकत्र मीटिंग व्हायची. त्यात कुणाला काय अडचणी आल्या, त्या कशा सोडवायच्या याची चर्चा व्हायची. सर्जनच्या बरोबरीनं डॉक्टर नसलेले जे स्वयंसेवक होते त्यांनाही भरपूर काम करावं लागत होतं. आणलेल्या सामानाची वर्गवारी करणं, दिवसभरात लागेल तसं त्यातून काढून घेणं, डॉक्टरांच्या सुपूर्द करणे. डॉक्टरांना चहा, नाश्ता नीट मिळतोय का, जेवण मिळतंय का हे सगळं बघावं लागायचं. आदिस अबाबामध्ये एका भारतीय माणसाचं रेस्टॉरंट आहे. जेवण तिथून पॅक करून आणलं जायचं. स्थानिक स्वयंसेवकही आमच्याबरोबर असायचे. त्यांच्यासाठी व हॉस्पिटलमधल्या इतर स्थानिक लोकांसाठीही रोटरीतर्फे त्यांच्या पद्धतीचं जेवण पुरवलं जात होतं.

एका डोळ्याच्या हॉस्पिटलमध्ये मी आणि अजून एक भारतीय डॉक्टर असं दोघंच काम करायचो, तिथे जेवण मात्र १५ लोकांचं यायचं. म्हणजे तिथल्या नर्सेसपासून सफाई कामगारांपर्यंत सर्वांसाठी. रोटरीला कुठे कुठे पैसा खर्च करावा लागत होता हे बघून आश्चर्य वाटलं. मात्र त्या येणाऱ्या जेवणामुळे त्या लोकांचं सहकार्य चांगलं मिळत होतं.

रोटरॅक्ट क्लब म्हणजे रोटरी क्लबची तरुण मुलामुलींसाठी असलेली शाखा. आदिस अबाबाच्या रोटरॅक्ट क्लबचे सदस्य असलेली तरुणमंडळी स्वयंसेवक म्हणून आमच्या दिमतीला दिली होती. त्यांच्यात सळसळता उत्साह आणि काम करायची प्रचंड तळमळ होती. त्या तरुणमंडळींच्या सहकार्याशिवाय आमचं काम जवळजवळ अशक्य होतं. पेशंटशी बोलताना दुभाष्याचं काम तीच मंडळी करायची. सतत आमच्या अवतीभवती राहून काय हवं नको ते बघायची. त्यांच्याशी गप्पा मारताना खूप मजा यायची. त्यांनी सांगितलं की आफ्रिकेतील इतर लोकांपेक्षा इथियोपियाचे लोक दिसायला चांगले असतात, त्यांचा वर्ण एवढा काळा नसतो आणि ते जास्त बुद्धिमानही असतात. त्यांच्यातील बरेच लोक आपल्याकडच्या दाक्षिणात्य लोकांसारखे दिसत होते. काही मुली खरंच देखण्या होत्या. आमच्यातले जे रंगानं काळे होते त्यांच्याशी इथियोपियाच्या भाषेमध्ये तिथले लोक बोलायला लागायचे, अशी फसगत व्हायची!

ही तिथली सर्व तरुणमंडळी आपल्या बॉलिवूडच्या प्रचंड प्रेमात. आपले सर्व हिंदी मसाला सिनेमे तिथे आवडीनं बघितले जातात. ते त्यांच्या भाषेत डब केलेले असतात. त्या मुलांना आपली हिंदी सिनेमातली सर्व गाणी तोंडपाठ होती. त्यांनी 'कुछ कुछ होता है'ची गाणी आम्हाला म्हणून दाखवली. त्यांना अर्थातच त्याचा अर्थ काही कळत नव्हता. म्हणजे सिनेमे बघताना त्यातलं संभाषण त्यांच्या भाषेत पण गाणी मात्र हिंदीत, असं काहीतरी मजेदार प्रकरण होतं.

इथियोपियाचं कॅलेंडर ही आणखी एक मजेदार गोष्ट होती. तिथे जवळजवळ ६० ते ७० टक्के ख्रिश्चन, ३०-३५ टक्के मुस्लिम लोक आहेत. ऑर्थोडॉक्स चर्चचं वर्चस्व आहे. त्या चर्चनुसार त्यांच्या वर्षात ३० दिवसांचे १२ महिने व उरलेल्या ५-६ दिवसांचा तेरावा महिना असतो. सप्टेंबर ११ रोजी त्यांचं नवीन वर्ष सुरू होतं. आपल्या कॅलेंडरपेक्षा त्यांचं कॅलेंडर ७ वर्षे मागे आहे. म्हणजे आपल्या २०१३ मध्ये त्यांचं २००६ सुरू होतं.

त्यांच्या दिवसाचा शून्य तास सूर्योदयाला सुरू होतो. थोडक्यात काय, तर वेळ, तारीख, महिना, साल सगळंच वेगळं. त्यामुळे पेशंटला जर दोन दिवसांनंतरची ऑपरेशनसाठी वेळ द्यायची असेल तर ती त्यांच्या कॅलेंडरप्रमाणे समजावून द्यायला स्थानिक माणूस लागायचा.

आमची तिथे मीडियानं भरपूर दखल घेतली. टीव्ही, रेडिओवर




आमच्याबद्दल सतत माहिती सांगत होते. त्या बातम्या ऐकून पेशंटची झुंबड उडायला लागली. त्यांची व्यवस्था लावता लावता पुरेवाट झाली.

तिथल्या वैद्यकीय सुविधा फारच तोकड्या होत्या. आपल्याकडे मिळणारी साधी औषधंही तिथे मिळत नव्हती. जी मिळायची ती प्रचंड महाग. पेशंटच्या गराड्यात उभी असताना अनेकदा मला वैफल्यानं रडू कोसळायचं. ज्या पेशंटना आम्ही इर्मजन्सी उपचार करायला पाहिजे असे कित्येक पेशंट तिथे महिनोन्महिने उपचाराशिवाय आपल्या वेदना, दुखणी घेऊन तिथेच रेंगाळत होते. मी त्यांच्यासाठी काही करू शकत नव्हते. त्यांच्याकडे बघायला, बोलायला मला वेळ नव्हता. सामग्रीही नव्हती. त्यांच्याकडे बघितलं असतं तर ऑपरेशन करायला वेळ उरला नसता. कमीत कमी वेळात जास्तीत जास्त पेशंटचा फायदा करून द्यायचा होता. अशा वेळी कस्टम्समुळे वाया गेलेले तीन दिवस आठवून खूप राग यायचा. तेव्हा आपण भारतात राहतो हे सत्य मला फार दिलासा देणारं वाटत होतं.

इथियोपियाचं चलन म्हणजे Birr - बिर. इथियोपिया कृषिप्रधान देश आहे. भारतापेक्षा आर्थिक क्षेत्रात मागासलेला असूनही 'बिर' आपल्या रुपयापेक्षा तिपटीनं बलवान होता. म्हणजे १ डॉलरला २० बिर मिळायचे. परंतु तिथे महागाई प्रचंड होती. डोळ्यांचं ऑपरेशन झाल्यानंतरचा साधा काळा गॉगल आपल्याकडे २० ते ४० रुपयांना मिळतो. तो तिथे ८०० ते ९०० रुपयांना होता. त्यामुळे मोतीबिंदू ऑपरेशन झालेल्या कुठल्याही पेशंटला गॉगल नसायचा. तसाच डोळा उघडा ठेवून तो घरी जायचा. 'God is great' असं म्हणून आम्ही धास्तावलेल्या मनानं पेशंटला तसंच घरी पाठवायचो.

तिथले लोक मांसाहारी. कच्चं मांस तिथं आवडीनं खाल्लं जातं. आमच्या हॉटेलमधील एका हॉलमध्ये नुकतीच एक लग्नाची पार्टी झाली होती. आम्ही त्या रिकाम्या हॉलमध्ये डोकावल्यावर

तिथे तीन जनावरांची कातडी लटकावलेली दिसली आणि खाली प्लॅस्टिकच्या बास्केटमध्ये वापरलेल्या असंख्य सुऱ्या पडलेल्या होत्या. म्हणजे प्रत्येकानं आपल्याजवळच्या सुऱ्यांनी हवा तो व हवा तेवढा तुकडा काढून खाल्लेला असावा. नुसत्या कल्पनेनं अंगावर शहारा आला.

आठवड्यातून दोन दिवस इथियोपियन लोक उपास करतात. म्हणजे मांसाहार करत नाहीत. त्यादिवशी दूध, चीज असे इतर प्राणीजन्य पदार्थही खात नाहीत. त्या दिवशी शाकाहार केला जातो. 'Teff' या नावाचं नाचणीसारखं दिसणारे बारीक धान्य असतं त्याचं पीठ ३-४ दिवस आंबवून त्याचा मऊसर आणि आंबट लागणारा जवळजवळ २० इंच व्यासाचा मोठा डोसासारखा पदार्थ करतात. त्याला इन्जेरा म्हणतात. मोठ्या ताटात तो पसरतात. त्यावर मध्ये डाळ, भाज्या असे पदार्थ ठेवतात. सगळे त्याभोवती बसून चक्क आपण पोळीचा तुकडा तोडून भाजीला लावून खातो तसा खातात. त्यांच्यात मैत्रीचं प्रतीक म्हणून एकमेकांना घास भरवण्याचीही पद्धत आहे.

त्यांच्याकडे पारंपरिक गोड पदार्थ नाही. लहान मुलांना देण्यासाठी केक असतो. एवढ्या मांसाहारी वातावरणात काही तरुण मात्र पूर्ण शाकाहारी होते. हा चमत्कार कसा काय असा प्रश्न विचारला असता ते म्हणाले, आम्ही प्रजापिता ब्रह्मकुमारीच्या केंद्रात योगा करतो. तेव्हापासून मांसाहार बंद केला. अर्थातच तेव्हा भारतीय असण्याचा अभिमान वाटला.

बाबूंपासून विविध वस्तू, लाकडाचे मुखवटे या वस्तूंबरोबर तिथलं मऊसूत सुती कापड प्रसिद्ध आहे. त्यांची पारंपरिक वेशभूषा त्याच मऊसूत पांढऱ्या कपड्यापासून शिवलेली असते. ब्लाऊज, गुडघ्याच्या खाली येणारा घेरदार झगा व त्यावर तसाच स्कार्फ. त्याच्या कडेला त्यांचा पारंपरिक रंगीत काठ असतो. अनेकांची केशरचना आफ्रिकन छोट्या छोट्या वेण्यांची होती. त्याच्यावर बरीच मेहनत आणि वेळ ते खर्च करतात असं जाणवलं. तिथली चामड्याची जाकिटं व चांदी पण प्रसिद्ध आहे.

मुलामुलींमध्ये मोकळेपणा होता. पण आमच्याबरोबर लांब फिरायला येताना जर मुलं बरोबर असतील तर पालक परवानगी देणार नाही असं मुली म्हणाल्या. पाश्चात्य देशांसारखी त्यांच्या शारीरिक जवळीक दिसत नव्हती.

आमच्या हॉटेलसमोर भलीमोठी हिरवळ होती. त्यावर त्यांची लग्नं लागायची. वरातीसारखी मिरवणूक दिसायची. एकाच वेळी २-३ वराती असायच्या. लोकांना संगीतात खूप रस आहे. पारंपरिक वाद्यं आहेत. खांदे हलवत करायचं नृत्यही फार सुंदर असतं. आपल्या पारंपरिक नृत्य व संगीताचा त्यांना अभिमान आहे.

इथियोपियाच्या इतिहासात त्यांच्यावर कुणी कधी राज्य केलं नाही असंही ते अभिमानानं सांगतात. इटलीचे लोक त्यांच्या काही भूभागावर राहत होते. त्यांच्या इतिहासातील एकमेव युद्ध इटलीबरोबर झालं ज्यात त्यांनी पारंपरिक शस्त्रं वापरली होती. त्यात इथियोपियाचा विजय झाला होता. ते अजूनही तो विजय अंगाखांद्यावर मिरवतात.

मानवाच्या उत्क्रांतीच्या ज्या अवस्था आहेत त्या सगळ्या अवस्थांचे जीवाश्म इथियोपियात सापडले आहेत. पृथ्वीवरील पहिली मानव जिला त्यांनी 'ल्युसी' नाव दिलं आहे तिचा सांगाडा तिथे बघायला मिळतो.

आमच्या कामाच्या रामरगाड्यात आम्ही जशी जमेल तशी इथियोपियाची माहिती जाणून घेत होतो. मी काही दिवस 'देब्रेब्रेहन' या आदिस अबाबापासून १५० कि.मी. लांब खेड्यात काम केलं. तिथे अगदीच गरिबी पदोपदी जाणवत होती. गरिबी असली तरी कचऱ्याचे ढीग कुठे दिसले नाहीत. संडास आपल्यासारखे अगदी लहान जागेत, पण विलक्षण स्वच्छ असायचे.

इथोपियात बरेच भारतीय शिक्षक आहेत. तसेच तिथल्या अनेकांची मुलं भारतात शिकतात. तिथल्या नर्सेसनी आम्हाला फार मदत केली, रोटरॅक्टर्सनी मदतही केली आणि जीवही लावला. सगळ्या मिळून १०००च्या वर शस्त्रक्रिया झाल्या. हा सगळा खर्च रोटरी इंटरनॅशनलनं केला. तिथल्या गरजेच्या समुद्रात आमची मदत काही थेंबाइतकी असावी.

आमचं काम संपवून आमची निघण्याची वेळ झाली तेव्हा एका हृद्य सोहळ्यानं आम्हाला आश्चर्यचकित केलं. इथियोपिया कॉफीसाठी प्रसिद्ध आहे. कॉफीचा शोध इथियोपियात लागला असं सांगतात. सन्माननीय पाहुण्यांना निरोप देताना 'कॉफी सेरेमनी' आयोजित केली जाते. जमिनीवर त्यांच्याकडचं पवित्र गवत अंथरलं जातं. त्यावर फळाफुलांची सजावट करतात. कॉफीच्या बिया आपल्यासमोर निखाऱ्यांवर भाजतात. त्याआधी धुपासारखा सुगंधी पदार्थ निखाऱ्यांवर ठेवतात. त्यामुळे सगळीकडे सुगंध दरवळत असतो. हॉस्पिटलमध्ये काम करणारी एक नर्स कॉफीच्या बिया आमच्यासमोर भाजून कुटत होती. एकीकडे तिथल्या डॉक्टर्सनी आमच्यामुळे कशी मदत झाली हे सांगणारं छोटं भाषण केलं. मग सजवलेल्या ट्रेमधून, नक्षीदार कपांमधून आम्हाला कॉफी देण्यात आली. आम्हाला जीव लावलेले रोटरॅक्टर तरुण मुलं रडायला लागली. आमचंही मन भरून आलं. इतके दिवस सतत ज्यांच्याबरोबर काम केलं, ज्यांच्याशी एका वेगळ्या प्रकारचे अनोखे मैत्रीबंध निर्माण झाले, ते लोक आता आम्हाला कधीच भेटणार नव्हते.

जड अंतकरणानं त्यांच्या कॉफीचा व प्रेमाचा दरवळ मनात ठेवून आम्ही आदिस अबाबा सोडलं.

**– डॉ. माधवी मेहेंदळे**
प्रकाश डोळ्यांचे हॉस्पिटल,
डेक्कन जिमखाना, पुणे
भ्रमणध्वनी : ९८९०९०४१२३

# माध्यमांतर : एक दृष्टिक्षेप

## रविराज गंधे

८७व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं सूप सासवड इथं स्थानिक मंडळी आणि राजकारणी ह्यांच्या उपस्थितीमध्ये थाटामाटात वाजलं. अलीकडे लेखक-साहित्यिकांपेक्षा स्थानिक-पंचक्रोशीतील लोक संमेलनांना प्रचंड गर्दी करताना दिसतात. कवीसंमेलन-परिसंवाद-मुलाखतींच्या कार्यक्रमांचं त्यांना खूप अप्रूप असतं. मराठी साहित्यक्षेत्रात सध्या आवर्जून उल्लेख करावा असं फार काही लिहिलं जात नसलं तरी संमेलनाच्या निमित्तानं सर्वसामान्यांच्या नजरेखालून नव्या-जुन्या लेखकांची पुस्तकं जातात. त्यांची बऱ्यापैकी विक्री होते. चर्चा-मुलाखती-भाषणांमधून मराठी साहित्यिकांचं योगदान कानावर पडतं, हेही नसे थोडके! उदाहरणार्थ, प्र.के. अत्रे यांचा जन्म सासवडचा, 'घन:श्याम सुंदरा' ही भूपाळी लिहिणारे होनाजी बाळा सासवडचे किंवा ह्याच भूमीत संभाजीराजांनी अनेक संस्कृत ग्रंथ लिहिले अशी माहिती मिळते. संमेलन झालं नसतं तर सर्वसामान्यांना ही माहिती कशी मिळाली असती? बाकी सारं स्नेहसंमेलन!

ह्या संमेलनात 'माध्यमांतर' ह्या विषयावरील एका परिसंवादाचं आयोजन करण्यात आलं होतं. ह्यात सुप्रसिद्ध दिग्दर्शिका-लेखिका सुमित्रा भावे, निर्माती-अभिनेत्री स्मिता तळवलकर, ज्येष्ठ साहित्यिक-समीक्षक रा.रं. बोराडे यांनी भाग घेतला होता. मलाही विचार व्यक्त करण्याची संधी मिळाली होती. सर्व वक्त्यांनी आपापल्या भाषणांमधून माध्यमांतर ह्या विषयाचे अनेक पैलू उलगडून सांगितले.

'माध्यमांतर' ह्या विषयाचा जेव्हा आपण विचार करायला लागतो तेव्हा सर्वसाधारणपणे चटकन आपल्या डोळ्यांसमोर कथा-कादंबरीचं-सिनेमात किंवा नाटकात होणारं रूपांतर असं सीमित स्वरूप येतं. वास्तविक पाहता, माध्यमांतर हा विषय सिनेमा-नाटकापुरता मर्यादित नाही. एखाद्या कवितेचं अथवा कथेचं चित्रलिपीमध्ये होणारं सादरीकरण, एखाद्या सांगीतिकेतून नृत्य-गायनाद्वारे सादर केलेली कथा-कविता, साहित्याची मौखिक स्वरूपातील अभिव्यक्ती, संगणकीय स्वरूपातील इ-बुक्स किंवा मल्टीमीडियाचा वापर करून सादर केलेला आविष्कार ही सारी माध्यमांतरंच आहेत. लिखित स्वरूपातील साहित्यात फक्त शब्दांचंच वर्चस्व अन् महत्त्व असतं, तर हे साहित्य दृश्य माध्यमांत आविष्कृत होताना शब्द आणि दृश्य यांचा अपूर्व संगम होतो. त्याला सूर, ताल, संगीत, अभिनय आदीची जोड मिळाली की त्याच्या आशयाची उंची वाढते. जे शब्दांत जाणवत नाही ते दृश्यात साकार होतं. परंतु प्रत्येक शब्दातलं आशय-सौंदर्य दृश्यात पकडता येतंच असं नाही. म्हणून माध्यमांतर हे नेहमी एक आव्हान राहिलं आहे. जेव्हा साहित्यकृतीचं शब्दश: माध्यमांतर होतं तेव्हा ते फसतं. उदाहरणार्थ, मिलिंद बोकील ह्यांच्या 'शाळा' या नितांत सुंदर कादंबरीचा, कादंबरीबरहुकूम केलेला सिनेमा 'शाळा'! दृश्य माध्यमात आणताना त्यात आशय-विषयांशी प्रामाणिक राहून बरेच बदल करावे लागतात, तर माध्यमांतर प्रभावी होतं.

एखाद्या साहित्यकृतीचं माध्यमांतर करण्यासाठी मुळात त्या कृतीमध्ये एक नाट्य-सिनेमा दडलेला असावा लागतो. ती साहित्यकृती वाचल्यावर दिग्दर्शकाच्या डोळ्यांसमोर त्याचं नाटक-सिनेमा दृश्यमान व्हायला लागतो. त्यासाठी कथानकामध्ये नाट्याबरोबरच दृश्यात्मक परिणाम साधण्याचे गुण असणं गरजेचं असतं. उदाहरणार्थ, 'कोसला' किंवा 'लव्हाळी' ह्यांसारख्या आत्मकथनपर कादंबऱ्यांचं सिनेमा-नाटकात रूपांतर करणं हे आव्हान आहे. ह्या मुळात वाचायच्या कादंबऱ्या आहेत. तेच त्यांचं सौंदर्य आणि सामर्थ्य आहे. कोसलामधल्या उंचच उंच उशा डोक्याखाली घेऊन तासन्‌तास आढ्याकडे पाहत बसणाऱ्या पांडुरंग सांगवीकराची मनोवस्था दृश्यात कशी दाखवणार? किंवा 'ही सांज सुखाने सजलेली अन् दरवळणारा श्वास तुझा' ह्या चंद्रशेखर सानेकर यांच्या गीतातील 'दरवळणारा श्वास' कसा दाखवणार? अथवा 'काढ सखे गळ्यातील तुझे चांदण्यांचे हात' ह्या कवितेतील 'चांदण्यांचे हात' हे वाचायचे आहेत, दाखवायचे नाही. सबब सर्वच कथा-कविता-कादंबऱ्यांचं दृश्य स्वरूपातील माध्यमांतर होईलच असं नाही. निर्माता-दिग्दर्शक मंडळींना हे न उमगल्याने फसलेल्या प्रयोगांची यादी मोठी आहे.

साहित्यकृतींवरील आधारीत माध्यमांतराच्या काही मोजक्या सर्वोत्कृष्ट उदाहरणांपैकी बंगालीतील 'पथेर-पांचाली' मराठीतील 'श्यामची आई', हिंदीतील 'गाईड' अशा काही नावांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. मराठीपेक्षा बंगाली, तामीळ, तेलुगू, मल्याळम भाषेतील साहित्यकृतीवर आधारीत माध्यमांतरीत कलाकृती अधिक सकस अन् प्रगल्भ असल्याचं जाणवतं. मराठीत वि.स. खांडेकर, गो.नी. दांडेकर इत्यादींपासून जी.ए. कुलकर्णी, खानोलकर यांच्या

'सिंहासन'मधील दृश्य








'प्रपंच'मधील दृश्य

कथा-कादंबऱ्यांसहित सुहास शिरवळकरांच्या 'दुनियादारी' ह्या चित्रपटांपर्यंत अनेक उदाहरणं देता येतील. अरुण साधू यांच्या 'सिंहासन' ह्या कादंबरीवरील चित्रपट, जयवंत दळवींची 'महानंदा', व्यंकटेश माडगूळकरांची 'बनगरवाडी', 'जैत रे जैत' आदी साहित्यकृतींच्या सिनेमातील माध्यमांतराचं प्रेक्षकांनी स्वागत केलं. बऱ्याच वेळा एखाद्या सशक्त लोकप्रिय कलाकाराला नजरेसमोर ठेवून भूमिका-कथानक लिहिलं जातं. त्यात साहित्यकृतीचा मूळ हेतू - आशयविषय बाजूला पडलेला जाणवतो. उदाहरणार्थ, 'श्वास' ही माधवी घारपुरे यांची मूळ कथा ही आजोबा आणि अंधत्व येऊ पाहणारा त्याचा नातू यांच्या भावनिक नात्याभोवती विणली आहे. चित्रपटात मात्र सर्व कथानक हे डॉक्टर या व्यक्तिरेखेभोवती फिरताना दिसतं. सिनेमाचा फोकस चुकल्यासारखं वाटतं.

'काकस्पर्श'मध्ये अचानक वैध्यव्य आलेली वहिनी ही मूळ व्यक्तिरेखा. परंतु स्मरणात राहतो तो तत्त्वनिष्ठ, कर्तव्यदक्ष तिचा दीर-भावोजी. 'नटरंग', 'जोगवा' हे चित्रपट सामाजिक प्रश्न प्रखरतेनं मांडण्यापेक्षा लोकप्रिय करमणूकप्रधान गोष्टींना प्राधान्य देताना दिसतात. त्यामुळे विषयाचं गांभीर्य कमी झाल्याचं जाणवतं. आपल्याकडे स्वत: लेखक-साहित्यिक पटकथा लिहिताना फारसं आढळत नाही. मराठी सिनेमातील पटकथांवर नाटक-एकांकिकेचा मोठाच पगडा असल्याचं जाणवतं. त्या खूप वाचाळ आणि संभाषणप्रचुर असतात. दृश्यमाध्यमाची स्वत:ची एक भाषा असते.

विजय तेंडुलकरांनी पटकथा लेखनात उत्तम कामगिरी केली आहे. त्यांच्या 'सामना' आणि अन्य सिनेमांच्या पटकथा ह्या वस्तुपाठ ठराव्या. वि.स. खांडकेर, ग.दि. माडगूळकर आदी मंडळींचं पटकथा लेखनाचं कौशल्य वाखाणण्याजोगं होतं. खांडेकर म्हणत, सिनेमा बनवणारी मंडळी आणि लेखक यांच्यात समन्वय असणं आवश्यक आहे. दोघांच्या सहकार्यानंच चांगली चित्रपटनिर्मिती होऊ शकते. बऱ्याच वेळा लेखकमंडळी राईट्स देऊन मोकळी होतात आणि नंतर आपल्या साहित्यकृतीचं सिनेमातील कलेवर पाहून पश्चात्ताप करतात. लेखकांनी स्वत: पटकथा लेखनाचं तंत्र आत्मसात करणं आवश्यक आहे. सत्यजित रे, गुलजार आदी प्रतिभावान लेखक-दिग्दर्शक म्हणून नावाजले ते त्यांच्यातील लेखकामुळे.

मराठी साहित्यावर इंग्रजी साहित्याचा मोठाच प्रभाव आहे. गानारेल या नाटककाराच्या 'ऑल इज राँग' ह्या नाटकावर बेतलेल्या 'संशयकल्लोळ' ह्या नाटकापासून शिरवाडकर, पु.ल. देशपांडे यांच्या 'नटसम्राट', 'फुलराणी'पर्यंत अनेक दर्जेदार माध्यमांतरं आपल्याला पाहायला मिळतात. ६०-७०च्या दशकात मराठी लेखक इंग्लंडहून पुस्तकं घेऊन येणाऱ्या जहाजाची आतुरतेनं वाट पाहत असत! ह्या मानसिकतेमुळे सर्वात मोठं नुकसान मराठी साहित्य-नाटक-सिनेमांचं झालं. आपल्या मातीतील-संस्कृतीतील लोकांच्या कथा-व्यथा अभावानंच पडद्यावर आल्या. अन्य प्रादेशिक चित्रपटांमध्ये हे प्रमाण खूप लक्षणीय असल्याचं दिसतं. आपले हिंदी सिनेमावाले देखील हॉलिवूडकडे डोळे लावून बसलेले असतात अन् तिकडच्या गाजलेल्या चित्रपटांच्या भ्रष्ट नकला करण्यात धन्यता मानतात. परकीय कथा-कल्पना आपल्या मातीतील जनजीवनात बेमालूमपणे रुजवण्याचे खूप थोडे प्रयत्न यशस्वी झाले आहेत.

'माध्यमांतराचे' यशस्वी, प्रभावी प्रयोग करण्यासाठी सर्वसामान्य वाचक-प्रेक्षकवर्ग आणि सिनेमा-नाट्यकर्मी यांच्यात दृश्य माध्यमातील साक्षरता आणि वाचनसंस्कृती रुजणं गरजेचे आहे. अभिजात

साहित्याची ज्यांना ओळख आहे ती मंडळी माध्यमांतराच्या प्रयत्नांना चांगला प्रतिसाद देतील. उत्तमरीत्या रसग्रहण करू शकतील. परिसंवादादरम्यान सुमित्रा भावे यांनी सुधा मूर्ती ह्या लेखिकेच्या कथेवर आधारीत एका चित्रपटाची कथा वाचून दाखवली. उपस्थित प्रेक्षकांपैकी सुधा मूर्तींचं नाव कुणालाही माहीत नव्हतं. 'कोसला' कादंबरी कुणी वाचली आहे असं विचारल्यावर ३००-४०० प्रेक्षकांपैकी फक्त दोन हात वर आले. माध्यमांतराचे प्रयोग यशस्वी होण्यासाठी पोषक वातावरणाची गरज असल्याचं जाणवतं.

दुसरी एक गोष्ट मला जाणवते ती अशी, की आपल्याकडे नाटक-सिनेमांच्या कथा-पटकथांची पुस्तकं फारशी प्रकाशित होताना दिसत नाहीत. काही नाटकांची पुस्तकं उपलब्ध आहेत. परंतु गाजलेल्या लोकप्रिय सिनेमांची पुस्तकं निघाल्याचं दिसत नाही. हॉलिवूडमध्ये मात्र सिनेमांवरील पुस्तकनिर्मितीचं प्रमाण लक्षणीय आहे. त्याचा खप देखील प्रचंड आहे. गॉडफादर, टायटॅनिक वगैरे असंख्य उदाहरणं आहेत. पुस्तकावरून सिनेमा आणि सिनेमावरून पुन्हा पुस्तक असा प्रवास अपेक्षित आहे.

ह्या परिसंवादादरम्यान सुमित्रा भावे आणि स्मिता तळवलकर यांनी एका महत्त्वाच्या गोष्टीकडे उपस्थितांचं लक्ष वेधलं. ''माध्यमांतरीत सिनेमांना प्रेक्षकांचा अपेक्षित असा प्रतिसाद मिळत नाही. त्यामुळे बऱ्याच वेळा सिनेमाचा खर्च देखील भरून येत नाही'' असं तळवलकर म्हणाल्या. सुमित्रा भावे यांनी, आपल्या सिनेमांना महाराष्ट्रात मराठी प्रेक्षक नसल्याची खंत व्यक्त केली. आपल्या चित्रपटाला मराठीत नसला तरी बंगाल, तामिळनाडू, केरळमध्ये एक विशिष्ट प्रेक्षकवर्ग असल्याचं आवर्जून सांगितलं. आपण प्रेक्षकांसाठी सिनेमा बनवत नसून आपल्या आनंदासाठी-समाधानासाठी आपल्याला आवडलेल्या स्क्रीप्टवर आपण सिनेमा बनवतो असं प्रतिपादन त्यांनी केलं. माझे सिनेमे लोकांना आवडलेच पाहिजे असा माझा आग्रह नाही, असंही सांगितलं.

सुमित्रा भावे यांचे विचार जरी कलावादी आणि व्यक्तिगत असले तरी अनेक लेखक-दिग्दर्शक-निर्माते-कलाकार मंडळी प्रचंड मेहनत घेऊन, आर्थिक नुकसान सोसून, प्रेक्षकांना माध्यमांतरीत सिनेमाद्वारे काहीतरी वेगळं देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत असतात. त्यांना प्रतिसाद देणं, त्याची दखल घेणं ही आपली सांस्कृतिक जबाबदारी आहे. कारण ही मंडळी १०० कोटींच्या क्लब वर्गातील 'दबंग' किंवा 'चेन्नई एक्स्प्रेस'सारखे सिनेमे बनवत नाहीत तर एक अभिजात, कलापूर्ण, आशयघन सिनेमा बनवत असतात. त्यांना प्रेक्षकांनी प्रतिसाद दिला नाही तर ही मंडळी आणि त्यांचे सिनेमे हे फक्त समीक्षकांच्या कौतुकाचे, विविध पुरस्कारांचे आणि देश-विदेशातील फिल्म फेस्टिव्हलमधील प्रदर्शनाचे धनी होतील. विविध कलाप्रकारातील 'माध्यमांतरीत' आदानप्रदान आणि त्याची प्रयोगशीलता जपणं, तिचा प्रसार करणं हे आपल्या रसिकतेचे आणि सुसंस्कृतपणाचं लक्षणं असणं आवश्यक आहे.


**– रविराज गंधे**
५८/८ वसंतस्मृती, पांडुरंगवाडी, २री गल्ली,
गोरेगाव (पूर्व), मुंबई-४०००६३
भ्रमणध्वनी : ९८२०३७८४४८
ravirajgandhe@gmail.com



## नुकतीच प्रसिद्ध झालेली बेधडक कांदबरी...




चॅनल 24 Live

समीरण वाळवेकर

गेल्या पंचवीस वर्षांत जी माध्यमक्रांती झाली तिनं घराघराला कह्यात घेतलं. इतके चॅनल आले की, पाहणाऱ्यांची मती कुंठित झाली. त्यातून वाढली स्पर्धा, आपल्याकडे लक्ष वेधण्याची. हे चॅनल मग विविध 'लक्ष्य' शोधू लागले. राजकारणी हे महत्त्वाचं लक्ष्य झालं. समाजाची जीवनशैलीही याच काळात आमूलाग्र बदलली. साहजिकच राजकारण-समाजकारण बदललं. चॅनेलवाले खेळ करू लागले. त्यांच्याकडे डोळे वर करून पाहील त्याची टोपी पडू लागली, इतकी दहशत निर्माण केली. त्यातून या माध्यमातही स्पर्धा आणि पिळवणुकीचं सत्र सुरू झालं.
आजच्या काळातलं हे चौथं सिंहासन, त्याचा रुबाब आणि सभोवतालातलं राजकारण-समाजकारण यांचा वास्तवदर्शी, भेदक वेध घेणारी ही बेधडक कादंबरी...

**मूल्य ४०० रु.**
**सवलतीत २५० रु.**

# सर्वगुणसंपन्न पद्मश्री व्यंगचित्रकार बापू

व्यंगचित्रकार - **प्रभाकर वाईरकर**



जगामध्ये अनेक असामी 'सर्वगुणसंपन्न' होऊन गेल्या वा आजही कार्यरत आहेत. व्यंगचित्रकला क्षेत्रामध्ये असाच एक कलंदर माणूस आहे- चित्रकार, व्यंगचित्रकार, चित्रपट दिग्दर्शक, पेंटर, संगीतकार, ग्राफिक आर्टिस्ट, जाहिरात संस्थेमध्ये आर्ट डायरेक्टर... त्या सुप्रसिद्ध व्यक्तिमत्त्वाचे नाव - व्यंगचित्रकार 'बापू' - सत्तीराजू लक्ष्मी नारायणा.

१५ डिसेंबर १९३३ रोजी आंध्रप्रदेशातल्या पश्चिम गोदावरी विभागातल्या 'नरसापूर' या खेड्यात सकाळ झाली ती, सोनेरी सूर्यकिरणांनी न्हाऊन घातलेल्या 'बापू' या वल्लीच्या जन्माच्या बातमीने. सर्वसाधारण तेलगू परिवाराप्रमाणेच बापू यांच्या आई-वडिलांचे संसारगाडे मार्गक्रमण करत होते. वडिलांचे नाव वेणू गोपाल राव व आईचे नाव श्रीमती सूर्यकांथम्.

लहानपणापासूनच बापू समोर दिसेल त्या चित्राचा वा वस्तूचा आकार पेन्सिलने वा पेनने पेपरवर साकारण्याचा प्रयत्न करू लागले. हळूहळू ओळखीचे 'आकार' आकार घेऊ लागले. विशेषत: व्यंगचित्रकलेच्या आकार वा रचनेच्या प्रमाणे चित्रे तयार होऊ लागली. मुलाच्या या खेळाकडे वडिलांचे बारीक लक्ष होते. हळूहळू त्याच्या व्यक्त वा अव्यक्त आकाराकडे वडीलही आकर्षित व्हायला लागले.

आपला मुलगा चित्रकलेचा पाईक व्हायला पाहतोय याची त्यांना जाणीव होऊ लागली. ते त्याला वेगवेगळी नियतकालिके- चित्ररूपी - आणून देऊ लागले. त्याच्या चित्रामधील बऱ्या-वाईट गोष्टींची त्याच्याशी चर्चा करू लागले, सूचना करू लागले. या काळात बापूंचे प्राथमिक शिक्षण सुरू होते. चित्रकलेत बरीच प्रगती होत होती. सुरुवातीचे प्राथमिक शिक्षण पी.एस. हायस्कूल, मद्रास येथे तर नंतरचे शिक्षण केसरी हायस्कूल, मद्रास या ठिकाणी झाले. याचवेळी त्याच शाळेत शिकणाऱ्या मल्लापूडी वेंकटा रामण्णा या विद्यार्थ्याशी त्यांची ओळख झाली. रामण्णा याला गोष्टी लिहिण्याचा छंद होता.

त्यांची पहिली गोष्ट १९४५ साली लहान मुलांचे मॅगेझिन 'बाला' यामध्ये प्रसिद्ध झाली व त्याला चित्रांची सांगड घातली ती बापू या त्यांच्या मित्राने. हेच बापूंचे पहिले चित्र. ते प्रसिद्ध झाले वयाच्या १२ व्या वर्षी.

चित्रकार, व्यंगचित्रकार, चित्रपट दिग्दर्शक बापू तर लेखक, स्क्रीन प्ले, डायलॉग लिहिणारे रामण्णा यांची 'झळाळती जोडी' विधात्याने तेलगू साहित्य, कला, चित्रपट या क्षेत्रांच्या झोळीत टाकली ती 'बाला' या मुलांच्या मॅगझिनने. नंतरच्या काळात ह्या यशस्वी जोडीने तेलगू साहित्य व चित्रपट-दूरदर्शन या माध्यमांमध्ये अनेक मानांकने-आदर्श प्रस्थापित केले.

बापू म्हणतात, बाला मॅगझिनने मला चित्रकार-व्यंगचित्रकार म्हणून घडवले. त्या ठिकाणी कार्यरत असणाऱ्या संपादकीय मित्रांनी चित्रकलेमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणले. वास्तववादी, स्टाईलाईज्ड चित्रे आणि व्यंगचित्रात्मक पद्धतीने असंख्य चित्रे चितारता आली आणि ती रेखाटता-रेखाटता आपोआपच चित्रकलेची सर्व दारे माझ्यासाठी उघडी झाली. पेन आणि ब्रश यांचा वापर कसा करावा, जाड-बारीक रेषा ब्रशवर विशिष्ट प्रकारे दाब देऊन कसे काढावे, रचना-त्यांचे विविध प्रकार कसे हाताळावे हे 'बाला'ने शिकवले. अशा प्रकारे सतत काम करत असताना चित्रांची वा पेंटिंग्जची विशिष्ट अशी 'बापू' स्टाईल निर्माण करता आली.''

चित्रकलेची अशा प्रकारे आराधना सुरू असताना १९५५ साली मद्रास युनिव्हर्सिटीमधून कायद्याची पदवी त्यांनी प्राप्त केली. त्यानंतर ते 'आंध्रपत्रिका' वर्तमानपत्रामध्ये राजकीय व्यंगचित्रकार म्हणून रुजू झाले.

व्यंगचित्रकलेकडेच ते का वळले, हे विचारताच ते एकच वाक्य उद्गारले, ''व्यंगचित्रकलेबद्दलचे माझे प्रेम!''

त्यांनी असंख्य व्यंगचित्रे विशेषत: सामाजिक विषयाचे भान ठेवून काढलेली असून त्यावर परकीय व्यंगचित्रकाराच्या शैलीचा मागमूसही सापडत नाही. प्रत्येक व्यक्तिचित्र हे भारतीयच वाटते. त्याची देहयष्टी, भारतीय पद्धतीचे नाक-डोळे, पेहराव, त्याची

नेसण्याची पद्धती, हावभाव, व्यक्ती वा वनस्पती-प्राण्यांचे रेखाटन हे केवळ भारतीय धाटणीचेच!

असे असले तरीही आपल्या गुरुस्थानी असलेले तामिळनाडूचे सुप्रसिद्ध श्री. गोपुलू यांच्यामुळे त्यांना व्यंगचित्रकलेमध्ये सुखनैव प्रवास करण्यासाठी प्रोत्साहन आणि ऊर्जा मिळाली, हे सांगताना त्यांच्या मुखातून कृतज्ञतेचे भाव उत्स्फूर्तपणे बाहेर पडतात.

कोणा भारतीय वा परदेशी व्यंगचित्रकारांचा पगडा होता का असे विचारताच ते म्हणतात, ''व्यंगचित्रकार श्री. गोपुलू यांच्या नेतृत्वाखाली हजारो उत्कृष्ट व्यंगचित्रकार.''

बापू यांनी व्यंगचित्रकलेसाठी सामाजिक विषय निवडले. जसे- माणसातील नातेसंबंध, चित्रपट व्यवसाय, सामाजिक रूढी, समाजाची आर्थिक परिस्थिती, सरकारी दुर्लक्ष वगैरे. बापू यांच्या शैलीचा विचार करताना त्यांनी चितारलेल्या सर्व व्यक्तिरेखा अस्सल भारतीय - तेलगू वाटतात. शब्दविरहित व्यंगचित्र जरी डोळ्यांसमोर आणले तर त्यातील व्यक्तिरेखा या तेलगूच वाटतात.

उदाहरणार्थ- एका व्यंगचित्रामध्ये - आपला नवरा किती स्त्रीलंपट आहे दर्शवण्यासाठी त्याची बायको त्या सुंदर तरुणीला म्हणते, ''तू त्याला एक स्माईल दे, त्याशिवाय तो बसस्टॉपवरून हलणार नाही. जाडजूड तेलगू स्त्री. तिच्या कपाळावरील दोन गंधाच्या पट्ट्या, केसामध्ये वेणी, साडी नेसण्याची व उभे राहण्याची पद्धत यामुळे ती अगदी तेलगू स्त्री वाटते. पुरुषांचे वय व शरीराचा डौल उतरणीला लागला तरीही सुंदर स्त्रीच्या मागे भुंग्यासारखे फिरत राहतात. हे 'पुरुषदर्शन' त्यांना दाखवायचे आहे.

दुसऱ्या व्यंगचित्रामध्ये डॉक्टरांवर होणारे हल्ले व त्यामुळे डॉक्टर पेशंटला मनातून किती घाबरलेले असतात, हे दाखवण्यासाठी पेशंटच्या शिरेमध्ये इंजेक्शन देण्यासाठी एका जाड बाईने आपली मूठ घट्ट आवळली आहे. परंतु डॉक्टरला वाटते ती आपल्याला मारेल की काय म्हणून डॉक्टर तिला सांगतात, ''बाई, तुमची मूठ सैल सोडा.''

या चित्रातही डॉक्टरचे घाबरलेपण दाखवण्यासाठी डॉक्टरांनी घाबरून उडी मारली आहे व त्यांचे केस ताठ, तोंडाचा जबडा उघडा, स्टेथोस्कोप मागच्या बाजूला उडालेला व तेलगू स्त्री दाखवण्यासाठी दाक्षिणात्य साडीचे 'टिपीकल' डिझाईन व स्थूल देहयष्टी.

बापूंची चित्रांमध्ये बारकावे कमी असतात. सहजसुंदर, लयदार, वक्रकार रेषा, जाड-बारीक रेषांमुळे अवकाश वा परस्पेक्टिव्हचे अभ्याससूचक बारकावे. आवश्यकतेनुसार जाड रेषा, संपूर्ण व्यंगचित्रामध्ये एक प्रकारची हालचाल. प्रसंगानुसार देहबोली चितारणे हे बापूंचे वैशिष्ट्य. चेहऱ्यावरचे भाव अतिशय परिणामकारक-बोलके. व्यंगचित्र पाहिल्यावर तोंडाच्या रेषा रुंदावणारच एवढा बोलका विनोद. ॲनॉटॉमीचा अतिशय योग्य वापर, सगळ्या व्यक्तिरेखा त्यांनी ठरवलेल्या ॲनॉटॉमीप्रमाणेच








असणार. कुठेही कंटाळून चित्र काढल्याचा प्रत्यय येणार नाही. सुबकता, नयनरम्य चित्रांची रचना हे त्यांचे वैशिष्ट्य.

त्यांची 'बुडूगू' ही व्यंगचित्रमालिका अतिशय गाजली. त्यांचा

लहानपणीचा मित्र मल्लापुडी वेंकटरामण्णा व त्याचे कुटुंब यांच्यावर आधारीत ही मालिका. लोकांनी ती अक्षरश: डोक्यावर घेतली.

बापूंनी रामायण, महाभारतावर केलेली पेंटिंग-इलेस्ट्रेशन्स उत्कृष्ट चित्रकारिकेचा अनुभव आहे. लयदार आणि बोलक्या रेषा, स्त्रियांचा डौल, सुंदरता, मासोळी डोळे, डाळिंबाच्या दाण्यासारखे नितळ-पारदर्शक ओठ, केसांची लांबलचक वेणी व त्यावर अलंकारिक फुले. टपोऱ्या वक्षस्थळावरून सळसळत्या नागिणीसारखी भासमान होणारी काळीकुट्ट वेणी, कमनीय, लांबसडक देहयष्टी... कपड्यांचे आणि दागिन्यांचे बारकावे म्हणजे दाक्षिणात्य चित्रकलेचा नमुनाच. प्रत्येक व्यक्तिरेखा दृष्ट लागण्याजोगी... व्यंगचित्रकारी व चित्रकारी कलेचे रंग, बापू तेलगू जगात उधळत तर होते, त्याचबरोबर ते जाहिरात संस्थेमध्ये ग्राफिक डिझायनर व ज्येष्ठ आर्ट डायरेक्टर म्हणून आपल्या बुद्धिचातुर्याचा ठसा उमटवत होते. हे सर्व करत असतानाही त्यांनी तेलगू अद्याक्षरांचा स्वत: 'कर्सिव्ह' फॉन्ट तयार केला. तोही नीबने! तो फॉन्ट आजही तेलगू साहित्यामध्ये तेवढाच वापरला जातो.

सतत नाविन्याचा ध्यास घेतलेले बापू एकाच क्षेत्रामध्ये ठाण मांडून बसले नाहीत. त्यांनी १९६७ साली चित्रपटक्षेत्रामध्ये दिग्दर्शक म्हणून प्रवेश केला आणि त्यांचे परममित्र रामण्णा हेही त्यांच्याबरोबर सहनिर्माते बनले. जसे स्व. बाळासाहेब ठाकरे यांनी व्यंगचित्रकारीतेतून शिवसेनेला जन्म दिला. तसाच प्रकार बापू यांच्या कारकिर्दीवर व्यंगचित्रकलेने केला.

बापू यांनी ४९ तेलगू आणि हिंदी चित्रपट तयार केले. त्यांच्या दिग्दर्शनाची धाटणी म्हणजे संपूर्ण चित्रपट शास्त्रशुद्ध व काव्यात्मकतेची छाप असणारा आणि याच गुणांसाठी बापूंचे चित्रपट प्रेक्षकांच्या हृदयावर कायमचे विराजमान झाले.

त्यांनी दिग्दर्शित केलेला पहिलाच चित्रपट 'साक्षी' ताश्कंद चित्रपट महोत्सवामध्ये १९६८ साली स्वत:चा ठसा उमटवून गेला. बापूंच्या पेंटिंगमध्ये जो जिवंतपणा असतो तोच गुण चित्रपटाच्या प्रत्येक फ्रेममध्ये, असा ठाम विश्वास प्रेक्षक आणि चित्रपट निरीक्षकांचा आहे. बॉलिवूड जगतात त्यांनी ७ हिंदी चित्रपटांचे योगदान दिले. हम पाँच, दिलजला, प्यार का सिंदूर, मेरा धरम, मोहब्बत, प्यारी बहना आणि वो सात दिन.

बापूंनी जे चित्रपट दिग्दर्शित केले त्यामध्ये सामाजिक व्यवस्थेचे भान व पौराणिक कथांवर दैवी अनुभवांचा साक्षात्कार देणारे विषय हाताळले. छोट्या पडद्यासाठीही बापू-रामण्णा (दिग्दर्शन व लेखन संवाद) या जोडीने तेलगूजनांसाठी 'भाग्यवथम्' ही मेगा सिरीयल प्रदर्शित करून लोकप्रियतेचे उच्चांक गाठले.

संगीत क्षेत्रामध्येही बापूंचा दबदबा राहिलेला आहे. बापूंनी ज्या ज्या ठिकाणी पाय ठेवला त्या त्या ठिकाणी त्यांनी त्यांचा कायमचा ठसा उमटवला. म्हणूनच जनता जनार्दन व सरकारकडून त्यांना अनेक सन्मानांनी गौरवण्यात आले.

सन्मान

१) अस्थाना विद्वान तिरूपती देवस्थानम्, १९७९
२) आंध्रप्रदेश सरकार - रघुपती वेंकय्या अॅवॉर्ड, १९८७
३) कलापुरनम् - ऑनररी डॉक्टरेट, आंध्र विद्यापीठ, १९९१
४) विशिष्ट पुरस्कारम् - पोट्टी श्रीरामालू तेलगू विद्यापीठ, २००३
५) ऑनररी डॉक्टरेट - श्री वेंकटेश्वरा विद्यापीठ
६) प्रेसिडेंट ऑफ इंडिया अॅवॉर्ड - अॅकॅडेमी ऑफ फाईन आर्ट
७) पद्मश्री पुरस्कार - भारत सरकार, २०१३

जीवनगौरव पुरस्कार

१) इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ कार्टूनिस्ट, २००१
२) आंध्रप्रदेश प्रेस अॅकडेमी, २००२
३) आंध्रप्रदेश सरकार व क्रोकवील अॅकडेमी, २००२
४) वर्ल्ड तेलगू फेडरेशन, २००४

'बापू बोम्माला कोल्लवू' ही बापूंच्या चित्रांची आर्ट गॅलरी हैदराबादमध्ये स्थापन करण्यात येत आहे. त्यांनी दिग्दर्शित केलेल्या ३३ तेलगू फिल्म्सपैकी तीन चित्रपटांना राष्ट्रीय पुरस्कार व तिघांना राज्य पुरस्कार मिळाले.

'सीता कल्यानम्' तेलगू हा चित्रपट १९७८ साली लंडन व शिकागो फिल्म फेस्टिव्हलमध्ये निवडला गेला.

चित्रकलेच्या क्षेत्रात त्यांचे मानाचे योगदान म्हणजे 'रामायण' या चित्रमालिकेचे लहान मुलांसाठी पुस्तक. त्यामधील चित्रांचे प्रदर्शन संपूर्ण आंध्रप्रदेश, लंडन आणि अमेरिकेत केले गेले.

ते म्हणतात, ''कलाकार म्हणून मी घराघरात पोचलो तोच माझा मानसन्मान वा माझ्यावर पडलेली थाप-शाबासकी.'' कटू अनुभवाबद्दल म्हणतात, ''ते सर्व माझ्यावर प्रेक्षकांनी/बालकांनी केलेल्या प्रेमसागरात विरघळून गेले...''

एक फ्री लान्सर आर्टिस्ट म्हणून बापू कथाचित्रे, मुखपृष्ठे, व्यंगचित्रे, व्यंगचित्रमालिका- तेलगू, तामिळ आणि इंग्लिश, ग्रीटिंग कार्डस्, चित्रपटाची जाहिरात असे सारे १९४५ पासून आजतागायत करत आहेत. या सर्व वाटचालीमध्ये बापूंच्या पत्नीने नेहमीच साथ दिली, प्रोत्साहन दिले. त्यांना एक मुलगी व दोन पुत्र आहेत. या सर्वांच्या सहकार्यानेच त्यांनी आजची उंची गाठली आहे.

भविष्याकडे पाहणाऱ्या चित्रकारांसाठी त्यांचा एकच संदेश- ''सतत स्केच बुक सोबत ठेवा. जे काही आपल्याला आवडेल त्याचे स्केच करा - मग वर्तमानपत्रातील फोटो असू दे की शेतात वावरणारा शेतकरी... कलाकारांचा मंत्र एकच- सराव, सराव आणि सराव!!''

**- प्रभाकर वाईरकर**
कावेरी, बी-४०५, वाकोला ब्रीज,
सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०० ०५५
भ्रमणध्वनी : ९८२०५४३०८९
prabhakarwairkar@rediffmail.com

॥ग्रंथाली॥

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**
**संपर्क : ९८६९२०७४०३**

## तांडव हरवताना... रवी परांजपे

'चीनवर एकही सैनिक न पाठवता सलग दोन हजार वर्ष सांस्कृतिक अधिराज्य गाजवलेला देश भारत होता.' चीनचे अमेरिकेतील राजदूत हू शीह यांनी काढलेले हे उद्गार आहेत. यावरून भारतीय सांस्कृतिक वारशाची कल्पना यायला हरकत नाही. अर्थात तो काळ इ.स.पूर्वचा होता. तो काळ म्हणजे सर्व कला आणि शास्त्र यांच्या विकासाचा वैभवाचा काळ होता. तो संस्कृतीच्या उत्कर्षाचा काळ होता. हा विकास शिवतत्त्वातून झाला होता. त्यात शिवसापेक्ष चैतन्य होते. शिवचैतन्यातून निर्माण होणारी ऊर्जा ही सज्जनशक्तिकारक, दुर्जनशक्तिमारक होती. ती सर्जनशील भारतीय पुरुषार्थाची ऊर्जा होती. ती शाबूत होती तोपर्यंत भारताचा हजारो वर्षांचा सांस्कृतिक वारसा शाबूत होता. त्याचा सर्जनशील आंतरिक जोम आटू लागला तो इ.स.१ पासून. जणू ही लक्षणे होती तांडव हरवू लागल्याची. पुढे ते हरवतच गेली उताराला लागल्यासारखी. परंतु अजूनही सावरण्याची संधी आहे. दृक्-श्राव्य चैतन्य-सौंदर्यभक्तीचे भान ठेवले तर महाराष्ट्र-भारताचे अनेक प्रश्न सुटू शकतील. ही निरीक्षणे आणि आशावाद आहेत रवी परांजपे यांची.

तांडव हरवताना... या पुस्तकाचे रवी परांजपे हे लेखक आहेत. सुप्रसिद्ध चित्रकार म्हणून त्यांचा लौकिक सर्वमान्य आहेच. तसे लेखक म्हणूनही त्यांचे स्वतंत्र स्थान यापूर्वीच 'शिखरे रंग-रेषांची', 'ब्रश मायलेज' आणि 'नीलधवल ध्वजाखाली ' या त्यांच्या पुस्तकांतून अधोरेखित झालेले आहे. त्यांना मिळालेल्या अनेक पुरस्कारांच्या सन्मानांनी त्याची पोच आधीच दिली आहे.

'तांडव हरवताना' हे पुस्तक म्हणजे एका शोधकाची वैचारिक आत्मकथा आहे. असा शोधक जो स्वतः उत्तम चित्रकार आहे. सुबोध-सुंदर-भावदर्शी असा आदर्श सिद्धांत ज्यांनी जपलेला आहे. तो चित्रातून आहे तसा लेखणीतूनही साकारलेला आहे. सर्जनशील तरल मन आणि स्वच्छ नजरेला जे भावले त्याचे चिंतन हिंदवी स्वराज्यसापेक्ष प्रगत उत्पादक भारत या कॅनव्हासवर साकारले आहे. हा शोध आहे तशी त्यावर आधारित निरीक्षणे आहेत. हा प्रवास दृश्यकलासापेक्ष नजरेतून, सौंदर्यभक्तीतून झालेला आहे. त्यामुळे सौंदर्याच्या छटा आणि तपशील अनेक अंगांनी व्यक्त झाला आहे.

तांडव हरवताना या विषयाची दोन भागांत विभागणी लेखकाने केलेली आहे- पाश्चिमात्य आरंभ आणि भारतीय सांगता. प्रगत जगाची सार्वजनिक, सामाजिक, राजकीय आणि राष्ट्रीय जडणघडण झाली ती दृश्यकलांना केंद्रस्थानी ठेवल्यामुळे. त्यांची दृश्यसौंदर्य आसक्ती ही त्यांच्या आरंभामागे आहे.त्याच्या तुलनेत भारताकडे पाहिले तर तो या आसक्तीपेक्षा भक्तीप्रिय असल्याचा दिसतो. राष्ट्रस्वार्थ आणि वैयक्तिक स्वार्थ एकत्र ठेवता आले नाहीत. धर्म आणि रिलिजन यातला फरक लक्षात न घेता सेक्युलरचा अर्थ धर्मनिरपेक्ष ही संकल्पना स्वीकारली. डिझाईन-ऑर्डर-सिस्टिम या त्रिशूळ आग्रांच्या राष्ट्रीय बांधिलकीकडे दुर्लक्ष केले. तांडव हरवत चालल्याची जी अनेक कारणे दिसतात त्यातील ही प्रमुख कारणे होत. आपल्या मताला पुष्टी देणारी दुसरीही अनेक उदाहरणे लेखकाने यात दिली आहेत, अगदी कारगील युद्ध, बाबरी मशीद, २६/११ हल्ला इथपर्यंत. आपल्या निरीक्षणात त्यानी सर डॉ. अरनॉल्ड टॉयबी यांसारख्या अनेक थोरामोठ्यांची वचने उद्धृत केली आहेत. चित्रकार बर्नी फुक्स, जे पॉल गेटी, सर अल्मा टाडेमा यांसारख्या थोर चित्रकारांची अनेक दृष्य सौंदयाची उदाहरणे दिली आहेत. त्यांचे वाचन करताना आपल्या भोवतीच्या प्रखर वास्तवाची जाणीव नव्याने होत जाते.याला अपवाद छत्रपती शिवाजी महाराजांचा काळ.

शिव तांडवाची चैतन्यऊर्जा म्हणून नटराजाची आकर्षक मुद्रा, आणि हरवत चाललेल्याचे प्रतीक म्हणून कृष्णछायेत गेलेली त्याची प्रतिमा असे स्वतः लेखकाच्या कल्पकतेतून साकारलेले असल्याने मुखपृष्ठ परिणाम स्वरूपात वेधक झाले आहे. आतील फोटो आणि चित्रे, रंगीत आणि कृष्णधवल, पुस्तकाच्या सौंदर्यात व संदर्भात भर घालतात. ही चित्रे जशी पाश्चात्यांची आहेत तशी स्वतः लेखकाच्या कुंचल्यातून अवतरलेली आहेत. त्यामुळे लेखकाच्या लेखणीबरोबर कुंचल्याद्वारे वैचारिक सफर केल्याचा आनंद पुस्तक वाचताना मिळत राहतो. त्यांची राष्ट्रबांधणीसाठी अमेरिकेच्या टॉवरला मारलेली गोंडेदार दोरीवरची खूणगाठ ही तर कल्पनेची उत्तम झेप म्हणायला हवी!




**तांडव हरवताना... रवी परांजपे**
**पृष्ठसंख्या २१४, किंमत रु. २५० ● सवलतीत रु. १५०**

ग्रंथाली



# ग्रंथपान

## सारांश शून्य – संजय कळमकर

शिक्षक प्रामाणिक म्हणून निवडणुकीची कामे! कामसू म्हणून जनगणना! स्वच्छताप्रिय म्हणून हागणदारीमुक्तीचा प्रचारक! कनवाळू म्हणून खिचडीला हातभार! सत्यप्रिय. बाणेदार. स्वच्छ प्रतिमेचा. व्यावहारिक. कष्टाळू. म्हणून त्याच्याकडे बांधकाम..! ही आहे शिक्षकांची व्यथा. विशेषतः ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांची. इतके सगळे कमी म्हणून की काय,वर अपेक्षा, शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिकवले पाहिजे, त्यांना घडवले पाहिजे. परंतु सरकार योजना जाहीर करते, अनेक उपक्रम राबवते, त्यात शिकवण्याचीच योजनाच निसटलेली असते त्याचे काय? ही आहे एका शिक्षकाची डोळस कैफियत. नारायण शंकर जगदाळे या शिक्षकाची. तिचे नाव आहे 'सारांश शून्य' आणि त्याचे लेखक आहेत संजय कळमकर.

संजय कळमकर हे सिद्धहस्त लेखक आहेत. त्यांच्या भग्न, कल्लोळ, उद्ध्वस्त गाभारे, अंतहीन या कादंबऱ्या आणि चिंब, चीअर्स हे कथासंग्रह यापूर्वी प्रकाशित झालेले आहेत. शिवाय अनेक पुरस्कारांनी त्यांच्या साहित्याचा सन्मान झालेला आहे. सदरची कादंबरी ही त्याच परंपरेला पुढे घेऊन जाणारी आहे.

सदर कादंबरीचा नायक नारायण जगदाळे, शिक्षक म्हणून मंगळापूर या खेड्याच्या गावी हजर होतो. त्या शाळेचे वातावरण, जो रनही काढीत नाही आणि आऊटही होत नाही असा गायकवाड मुख्याापक, तिरपागडा घालमोडे, संघटनेत काम करणारा सायंबर, पाट्या टाकणाऱ्या सानपबाई, आपल्याच पुरतं मग्न असलेल्या कास्तुके मॅडम आणि शिक्षणसेविका कु. शिल्पा गद्रे हे सहकारी. सरपंच, संघटनावाले, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी, गटशिक्षण अधिकारी, शिक्षण अधिकारीपासून थेट जिल्हा परिषद अध्यक्षापर्यंत या साखळीतील अनेक संस्थाने भेटत जातात. त्यांचे स्वभाव, वागणे, कामाची पद्धत याचे अनेक नमुने त्याच्या अनुभवला येतात. यातून मुलांना शिक्षण किती आणि वैयक्तिक स्वार्थ, हेवेदावे किती याची स्पर्धा तो जवळून पाहत राहतो. शाळा आणि विद्यार्थी यांना केंद्रस्थानी ठेवून शिक्षणक्षेत्रात किती उलाढाली चालतात हे पाहून थक्क होतो. हेरंब सानेसारखी दिलासा देणारी काही ध्येयावादी माणसेही भेटतात. संघटनेच्या नावाखाली आपले शिकवण्याचे कर्तव्य न करणारे, वरच्याच्या आशीर्वादाने त्यांच्याभोवती फिरणारे महाभाग भेटतात. आदर्श शिक्षक पुरस्कारासाठीची धडपड हा वेळाच हौसेचा प्रकार अनुभवाला येतो. शाळा तपासणीचे नाटक तर मजेशीरच. तांदूळ, दूध, खिचडी या पोषक आहार योजनांचा होणारा मारा आणि त्यांच्या अंमलबजावणीत निर्माण होणारा गोंधळ, शाळेचे बांधकाम, शिक्षण साहित्य यासाठी मुख्याध्यापक आणि सरपंचाच्या नावे बँकेच्या खात्यात जमा होणारी शासन रक्कम,आणि तिच्यासाठीची धडपड हा प्रकार ही गमतीशीर. लेखक नारायणच्या निमित्ताने शाळा, शिक्षण आणि शिक्षक यांच्याभोवती गुंफलेले वातावरण अतिशय तपशिलाने रंगवून सांगत जातात. त्याचवेळी नारायणचे घर, त्याची गरिबी, आई व बहिणीविषयी वाटणारी तळमळ, स्वतः काटकसरीने वागून बहिणीच्या आजारावर उपचारासाठी पैसे जमवण्याची केविलवाणी धडपड, ही बाजूही तितक्याच समर्थपणे उभी केली आहे.नारायणचे साधेपण, वाचनाची आवड, शिक्षणाविषयी वाटणारी आस्था, चिंतन यातून नारायणचे व्यक्तिमत्त्व ठळकपणे नजरेसमोर उभे राहते.

कादंबरी ही ग्रामीण भागाचे वातावरण घेऊन येत असल्याने तिथल्या मातीचा, बोलीचा, वागण्याचा संस्कार तपशिलाने येत राहतो. बोलण्यात येणारा स्पष्टपणा, त्यातून निर्माण होणारे विनोद आणि सहजपणे येणाऱ्या म्हणी, वाक्प्रचार यामुळे भाषेचा गोडवा मातीचा गंध आल्यासारखा जाणवत राहतो.

'.. मोक्कार बेडकावाणी फुगलंय ते. लई तरास देतं. रात्री–बेरात्री नदीत येऊन धडकतं. टिटवीचे अंडे खाल्ल्यावाणी झोपच नाई तेला.'

'..बाहेरचा पाऊस थांबला तरी घरात रात्रभर झिरपून गरिबीला भिजवणाऱ्या पाण्यानं मला हे सारं शिकविलंय..'

हा गोडवा भाषेतला ओघ आणि लाघव वाचताना आनंद देत राहतो. लेखकाने संयमाने आणि तितक्याच मनोरंजकतेने हा विषय हाताळला आहे. चित्रकार सतीश भावसार यांनीही मुखपृष्ठ विषयाला साजेसे चितारले आहे. शाळेच्या घंटेवर आदळणारा हातोडा हा घंटेसोबतच शिक्षक आणि शिक्षणावरही आदळत आहे की काय असाच प्रश्न जणू ते वाचकाला विचारीत आहेत असे वाटते.




**सारांश शून्य – संजय कळमकर**
**पृष्ठसंख्या ३३१, किंमत रु. ३०० ● सवलतीत रु. १८०**

ग्रंथाली



# ग्रंथपान

## मे आय कम इन...? – कु. तन्वी दिनेश डोके

'शिक्षकांना माझ्याबद्दल कधी विश्वास वाटत नसावा. मला कधी संधी दिली गेलीच नाही. सगळे प्रॅक्टिसला जायचे, चर्चा करायचे. मी तासन्‌तास एकटी वर्गात बसायचे. माझ्या मनात कायम खंत राहील की मला कधीच गॅदरिंगमध्ये संधी दिली गेली नाही. माझा विचार कधी कुणी केलाच नाही.त्यामुळे एक झाले, एकटी बसून मी लिहू लागले. मी मला सुचलेल्या गोष्टी मोठ्या अक्षरात लिहून काढायचे.' लेखनप्रवासाला सुरुवात झाली ती अशी. तो प्रवास होता दवाने गवताच्या पात्यावर खेळण्याचा. किलकिल्या नजरेने आसपास पाहण्याचा. आपल्याच पंखाचे रंग न्याहाळण्याचा, कौतुकाने. स्वतःच्या मनाला रिझविण्याचा. त्यातून उभारी मिळाली. पंखांना बळाची जाणीव होऊ लागली. आणि एक दिवस घेतली भरारी. आपल्याच कोशातल्या दिवसांना टिपण्याची. ओंजळीत जमा झालेल्या मोत्यांना सूर्यकिरणांत पेरण्याची. त्याचे हे लहानसे झाड. गोंडस, लोभस, कोवळ्या वल्लभानी डवरलेले झाड– 'मे आय कम इन...?'

कु. तन्वी दिनेश डोके ही लेखिका आहे 'मे आय कम इन...?' या पुस्तकाची. नावावरून लक्षात आले असेलच की विषय शाळेशी संबंधित असावा. ही एका शालेय प्रवासाची कथा आहे. म्हटले तर इवलीशी, म्हटले तर खूप मोठी. लाजाळूच्या झाडासारखी. लेखिकेच्या नावारूनही अंदाज आला असेलच वयाचा. तर तोही बरोबर आहे. लेखिका आहे एक विद्यार्थिनी. अवघी दहावीची परीक्षा उत्तीर्ण झालेली. मग तिच्याकडे सांगण्यासारखे काय असेल, असे कुतूहल वाटणे अगदी स्वाभाविक आहे. म्हणजे जे काही सांगायचे ते मोठ्यानीच सांगावे असा काही नियम नाही. लहानांनाही त्यांचे विश्व असते. त्यांनाही भोवताली घडणारे दिसत असते त्यांच्या बाळ नजरेतून. तशा त्यांनाही भावभावना असतातच की. त्याचा प्रत्यय म्हणजे 'मे आय कम इन...?'

पुस्तकाचे निवेदन हे प्रथमपुरुषी असल्याने स्वाभाविक आहे की, तन्वी तिची कहाणी सांगते आहे. ज्युनिअर केजीपासून ती दहावीपर्यंतची. वडिलांच्या बदलीमुळे बदलाव्या लागलेल्या जवळपास आठ शाळा. त्या शाळांचे नियम, शिस्त, गुरुजन, विद्यार्थी, खेळ, खेळाचे मैदान, प्रयोगशाळा, स्पर्धा, गॅदरिंग... हे सारे वरवर दिसणारे घटक.परंतु हेच घटक या वयात जे संस्कार करतात ते कुणीही विसरू शकत नाही, कधीही. किंबहुना त्या आठवणी प्रत्येकाने जपून ठेवलेल्या असतात मनाच्या मखमली कप्प्यात. म्हटले तर तन्वी या साऱ्या घटकांविषयीच बोलते या पुस्तकातून, परंतु तेवढेच नाही. सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या वाट्याला येणारे हे अनुभव नाहीत. हे असामान्य विद्यार्थिनीच्या वाट्याला आलेले अनुभव आहेत. जिच्याकडे बौद्धिक पातळीचा स्तर वरच्या क्रमांकाचा आहे,स्मरणशक्तीचा स्तर उत्तम आहे. अडचण आहे ती काही शारीरिक हालचालीच्या संदर्भात. त्यामुळे आलेले काहीसे परावलंबित्व. तिचे हे अनुभव आहेत. दैनंदिन अनुभवास आलेले. ज्यांना सामोरे जाताना स्वतःच प्रगल्भ करीत जाणारे. समाजात व्यक्ती तितक्या विकृती, शाळेत मात्र सगळेच विद्यार्थी हा समज दृढ करणारे.

पुस्तकाचे निवेदन सरळ,सोप्या पद्धतीने झालेले आहे. पहिलेच आणि अनाघ्रात वयातले असूनही अनुभवात कुठे उणेपणा जाणवत नाही. तसेच आपल्या अबनॉर्मलपणाचा कुठे बाऊ नाही. कुणाविषयी आकस नाही. उलट अतिशय तरल मनाने घेतलेला उत्कट अनुभव असेच वाचताना जाणवत राहते. मुखपृष्ठ पुस्तकाला साजेसे आहे. शाळा आणि विद्यार्थी पाहून आपली शाळा आठवावी असे.

**मे आय कम इन...? कु. तन्वी दिनेश डोके**
**पृष्ठसंख्या ७४, किंमत रु.१२५ ● सवलतीत रु. ८०**



ग्रंथाली



# ग्रंथपान

## संवाद-डॉ. नीना सावंत

ग्रंथालीच्या परंपरेतील आणखी एक पुस्तक 'संवाद.' लेखिका आहेत डॉ. नीना सावंत, मानसोपचार तज्ज्ञ आणि केईम व ग्लोबल हॉपिस्टलमधील प्राध्यापक. सहजसोप्या भाषेत आणि प्रत्येकाला विनासायास आकलन होईल अशा पद्धतीने लिहिलेले हे पुस्तक आहे. आधुनिक धावपळीत हरवत चाललेल्या संवादाची अचूक नस पकडून त्याचे होणारे दुष्परिणाम आणि वेळीच सावरण्याचे उपाय यावर केलेले समुपदेशन म्हणजे 'संवाद'.

संवाद स्वतःशीही करता येतो, पण खरा संवाद व्हायचा तर किमान दोन माणसांची आवश्यकता असते; नात्यातल्या, आपली वाटणाऱ्या माणसांची.त्यांच्यातल्या संवादावर आधारित विषयाची एकूण चौदा प्रकरणांत विभागणी केलेली आहे. विषयाचा आवाका मोठा असूनही अत्यंत सुटसुटीत व समर्पक पद्धतीने त्याची उकल केलेली आहे. संवादाची सुरुवात ही घरापासून केलेली आहे. संवाद असेल तर घरात निरोगी वातावरण खेळत राहील. यासाठी आपली पूर्वीची संयुक्त कुटुंब पद्धती आदर्श का होती, तिची आठवण मुद्दाम करून देण्यात आली आहे.

बालक-पालक यांच्यातील सुसंवादाची मूळ तत्त्वे आणि पद्धती यांची सविस्तर माहिती दिली आहे. पालकांनी आचरणात आणावी अशी ही माहिती आहे. मात्र तसे करताना मुलांच्याच पायाच्या मापाचे बूट घाला असा आवर्जून सल्ला देतात. लैंगिक शिक्षणाबाबत पालकांनी मुलांशी मनमोकळेपणाने बोलायला हवे. त्याचबरोबर नैतिकताही शिकवायला हवी, याचे भानही स्पष्ट केले आहे. शरीर व मनाच्या बदलाच्या वळणावर मुलांसाठी पालकाच मोठा मार्गदर्शक ठरू शकतो.

सासू-सुनेच्या नात्यातही सुसंवादाची आवश्यकता मोठी आहे. सुनेने काय करावे आणि काय टाळावे, आणि उत्तम सासू कशी असावी व ती कशी असू नये याचेही विवेचन रंजक पद्धतीने केलेले आहे. मी पाट्यावर वाटून स्वयंपाक केला म्हणून तू मिक्सर न वापरता स्वयंपाक कर हा आडमुठेपणा ठेवू नये, उलट मला तू हवी आहेस ही भावना दोघींच्या निकोप नात्याची बांधणी असावी असे सांगतात. पती-पत्नीच्या सुसंवादी रेशीमगाठीविषयी तर फार काळजी घेण्याची आवश्यकता आहे. त्यांच्या समस्यांवर समुपदेशन करताना बँकेच्या खात्याशी नात्याची तुलना केली आहे. तुमचे पैसे काढण्याच्या प्रमाणापेक्षा बचतीचे प्रमाण अधिक असेल तर असे खाते सुरळीत चालू राहते. मात्र बचतीपेक्षा पैसे काढण्याचे प्रमाण अधिक असेल तर असे खाते बंदच होऊ शकते. म्हणून नकारात्मक व अवास्तव अपेक्षा ठेवण्यापेक्षा आनंदाच्या क्षणांची पुंजी संसारात वाढवत ठेवा. तू-तू मी-मी करण्यापेक्षा एकमेकाला समजून घ्या असा सल्ला देतात. तीच तऱ्हा कामाच्या ठिकाणची. तुम्ही बॉस असाल वा कर्मचारी, प्रत्येकाने भान कसे ठेवायला हवे याचा आलेख आखून दिला आहे.

लेखिका संवादातल्या एका जबरदस्त शब्दाकडे लक्ष वेधतात.तो शब्द म्हणजे 'नाही.' याची ताकद फार मोठी आहे. हा शब्द स्वतःतला कमकुवतपणा नाहीतर ठामपणा व्यक्त करतो. भावना, भीती, भिडस्तपणा हे सारे गृहीत धरून या शब्दाबाबत कसे जागरूक असावे याचे महत्त्व त्या स्पष्ट करतात.

संवादात मन, भावभावना, मृदूपणा, स्पष्टपणा, आपलेपणा यांना असलेले महत्त्वही या पुस्तकात अधोरेखित करण्यात आले आहे. त्याच्याविना संवाद हा सुसंवाद होऊ शकत नाही. तेव्हा संवाद साधला पाहिजे पण त्यासाठी या गुणांची जपणूक करायला हवी हे आपोआपच आले.

असे हे संवादावरील पुस्तक म्हणजे घरच्याघरी आपले समुपदेशन म्हणायला हरकत नाही.

मुखपृष्ठही छान झाले आहे. चक्रव्यूहाची योजना आणि त्याला हिरव्या रंगाची झळाळी देऊन मध्येच काळ्या रेषांची पडछाया दिलेली आहे. संवादाअभावी जीवन हेच असे चक्रव्यूह ठरेल आणि आनंदाचे ताटवे झाकोळले जातील हेच यातून व्यक्त झालेले दिसते. विषयाशी जुळलेले असे हे मुखपृष्ठ आहे.




**संवाद-डॉ. नीना सावंत**
**पृष्ठसंख्या ८६, किंमत रु. १०० ● सवलतीत रु. ६०**

# ''रेडिओ हेच मी माझं साम्राज्य मानत आलो'' – बाळ कुडतरकर

**आशुतोष गोडबोले**

मी रेडिओ हेच माझे साम्राज्य मानत आलो. त्यामुळे सांस्कृतिक क्षेत्रातील इतर आकर्षणे समोर आल्या नंतरही मी रेडिओची साथ सोडली नाही.'' या शब्दांत आकाशवाणीवरील आवाजाचे जादूगार म्हणून ओळखले जाणारे बाळ कुडतरकर यांनी त्यांच्या जीवनप्रवासाचे सूत्र स्पष्ट केले. 'व्हिजन महाराष्ट्र फाऊंडेशन', 'सानेकेअर ट्रस्ट' आणि 'ग्रंथाली' यांच्या विद्यमाने आयोजित माधवबाग कृतार्थ मुलाखतमाले'त दादर – माटुंगा सांस्कृतिक केंद्राच्या सभागृहात बाळ कुडतरकर यांची मुलाखत झाली. ज्योत्स्ना आपटे यांनी घेतलेली त्यांची मुलाखत आकाशवाणीच्या सुवर्णकाळाचा मागोवाच ठरली.

ज्योस्त्ना आपटे यांच्याा प्रश्नांना उत्तरं देताना बाळ कुडतरकरांनी त्यांचा रेडिओ क्षेत्रातील प्रवास कसा सुरू झाला त्याची कहाणी कथन केली. ते म्हणाले, ''१९३० च्या दशकात रेडिओ नवखा होता. हे काहीतरी नवलाईचं घडत असल्याचा भाव समाजात होता. घरात रेडिओ असणे हे श्रीमंतीचं लक्षण समजलं जात असे. त्या काळी भारतात केवळ पाच रेडिओ केंद्रं होती. अशावेळी मला रेडिओत नोकरी मिळेल असं स्वप्नातही वाटले नव्हते. मी तेव्हा गिरगावातील राममोहन इंग्लिश स्कूल'मध्ये शिकत होतो. त्यावेळच्या एका प्रदशर्नात मी काढलेल्या चित्रास प्रथम क्रमांकाचं पारितोषिक मिळाले. त्यामुळे माझ्या चित्रकलेच्या शिक्षकांनी मला जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्‌समध्ये जाण्याचा सल्ला दिला. मी १९३९ साली मॅट्रिक पास झाल्यानंतर जे.जे.त प्रवेश घेतला. मी एक दिवस जे.जे.तून परतताना माझे शाळेतील शिक्षक मोहन नगरकर यांना आकाशवाणीत भेटायला गेलो. मी शाळेत असताना नाटकं-एकांकिका करत असे याची नगरकर यांना आठवण होती. त्यांनी मला ऑल इंडिया रेडिओच्या स्टुडिओत नेलं. तो स्टुडिओ पाहून स्वर्ग कसा असतो याची मला कल्पना आली. त्यानंतर नगरकर यांनी मला श्रुतिकांच्या तालमींना येण्यास सांगितले. मग मला 'सभापती' नावाच्या श्रुतिकेत काम करण्याची संधी मिळाली. त्यांच्यासोबत विमल घैसास, नारायण देसाई अशी मंडळी होती. त्या श्रुतिकेसाठी मला दहा रुपये मानधन मिळाले.''

बाळ कुडतरकर पुढे म्हणाले, की ''मला ऑल इंडिया रेडिओत झेड.ए. बुखारी हे केंद्र संचालक भेटले. त्यांनी मला ऑल इंडिया रेडिओत महिना पंचेचाळीस रुपयांवर नोकरीवर ठेवलं. बुखारी म्हणत, की मला उत्तम वादक, लेखक, कलाकार, रेडिओत नकोत. या सर्वांना इथे आणून त्यांच्याकडून कार्यक्रम करून घेऊ शकेल अशी व्यक्ती मला पाहिजे. मला फॅक्टरी नको, सेल्समन हवा. ते मला पटलं. मग माझ्याकडे नाट्यविभाग देण्यात आला. मी तिथे राहून रेडिओचा सर्व कारभार जाणून घेतला. ही नोकरी म्हणजे आयती चालून आलेली संधी होती. तिचं सोनं करायचं आणि इथे काहीतरी करून दाखवायचं असा मी मनाशी पक्का निश्चय केला.'' त्यानंतर बाळ कुडतरकरांनी आकाशवाणीवर अनेक उत्तमोत्तम लेखक-कलावंत आणून चांगल्या. प्रतीचे कार्यक्रम निर्माण केले. त्यांनी त्या आठवणी अभिमानानं सांगितल्या.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात युद्धविषयक माहितीपट तयार होत होते. त्यांना बाळ कुडतरकर आवाज देत. त्यावेळी खांडेकर नावाच्या गृहस्थानं त्यांना जयवंत दळवी यांची 'सारे प्रवासी घडीचे' ही कादंबरी आणून दिली. कुडतरकर म्हणतात, की कोकणाच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली ती कादंबरी वाचून मी गलबलून गेलो. ही कादंबरी म्हणजे 'मी' आहे अशी मला जाणीव झाली. त्यानंतर मी ती कादंबरी क्रमशः आकाशवाणीवरून ध्वनिक्षेपित केली. त्यानंतर जयवंत दळवी यांनी कुडतरकरांची भेट घेतली. ते म्हणाले, की माझी ही कादंबरी आतापर्यंत इतरांना ठाऊक नव्हती. आकाशवाणीवरील प्रसारणानंतर त्या कादंबरीच्या पाच आवृत्या निघाल्या आहेत. आता माझ्या 'महानंदा'कडेही थोडं लक्ष ठेव ना! त्यानंतर मी महानंदा वाचली. महानंदा म्हणजे दुसरं कोकण! मी त्याही कादंबरीच्या प्रेमात पडलो. मी शं.ना. नवरे यांच्याकडून पाच भागांत त्या कादंबरीच्या श्रुतिका लिहून घेतल्या आणि आकाशवाणीवरून प्रसारित केल्या. त्यानंतर त्या कादंबरीवर हिंदी-मराठी भाषांत चित्रपट तयार झाले. तसंच 'गुंतता हृदय हे' नावाचं नाटक रंगभूमीवर आलं.'' विशेष म्हाणजे, कुडतरकर 'महानंदा'ची आठवण सांगत असताना 'महानंदा' या मराठी चित्रपटात महानंदाची भूमिका करणाऱ्या आशालता प्रेक्षकांत बसलेल्या होत्या. कुडतरकर यांनी त्या दोन कादंबऱ्यांसोबत हरी नारायण आपटे यांची 'पण




लक्षात कोण घेतो?' तसंच मामा वरेरकर यांची 'विधवा कुमारी' इत्यादी कादंबऱ्या आकाशवाणीवरून ध्वनिक्षेपित केल्या असल्याचं सांगितलं.

कुडतरकर यांनी रेडिओच्या आठवणी सांगताना म्हटले, की ''त्या काळी आजच्यासारखे मुद्रित कार्यक्रम होत नसत. सर्व कार्यक्रम थेट प्रसारित होत. त्यामुळे त्या कार्यकमांची वेळ तंतोतंत पाळावी लागत असे.'' कुडतकर रेडिओत असलेल्या वक्तशीरपणाचं उदाहरण देताना म्हणाले, की ''आताही तुम्ही मला सव्वापाच वाजता इथे बोलावलंत आणि मी सव्वा पाच वाजता इथे हजर. कारण ही रेडिओची सवय.'' त्यांच्या या वाक्यांवर उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

रेडिओवरून प्रसारित होणाऱ्या शब्दांतून श्रोत्यांच्या डोळ्यांसमोर चित्र उभं करण्यासाठी शब्दांना साऊंड इफेक्टची तेवढीच महत्त्वांची जोड लागत असे. बाळ कुडतरकर यांनी ते साऊंड इफेक्ट स्वतःच्या कल्पतनाशक्तीनं अधिक इफेक्टिव्ह कसे केले याचे काही किस्से सांगितले. ते सांगताना रेडिओमध्ये त्यांनी दिलेल्या योगदानाचा अभिमान त्यांच्या बोलण्यातून जाणवत होता.

कुडतरकरांच्या बोलण्यात विविध संदर्भ येत गेले. ते त्यावेळचे रेडिओचे अधिकारी, मंत्री, पु.ल. देशपांडे, शं.ना. नवरे यांच्यासारखे साहित्यिक, करुणा देव यांच्यासारखे सहकर्मचारी, काशिनाथ घाणेकरांसारखे कलाकार अशा बऱ्याच व्यक्तींबद्दल बोलत होते. त्यातून एकाचवेळी रेडिओचा आणि बाळ कुडतरकरांचा प्रवास समजत होता. कुडतकरांनी सादर केलेल्या कार्यक्रमांमध्ये कल्पकता होती. मग त्या श्रुतिका असोत, त्यांचे साऊंड इफेक्ट असोत वा इतर कार्यक्रम. कुडतरकरांच्या कल्पकतेमुळे त्या कार्यक्रमांनी अफाट प्रसिद्धी मिळवली. त्यांनी 'गंमत-जंमत' या कार्यक्रमात लहान मुलांचा सक्रिय सहभाग वाढवत तो कार्यक्रम राणीची बाग, गिरगाव चौपाटी यांसारख्या जागांवरून थेट प्रक्षेपित केला. कुडतरकरांकडे 'कामगार सभा' हा कार्यक्रम देण्यात आला; त्याच दिवशी त्यांनी मुंबईतील अठ्ठावीस कामगार कल्याण केंद्रांना भेटी दिल्या. ''तिथल्या कामगारांशी संवाद साधून त्यांना रेडिओवर कार्यक्रम करण्यास उद्युक्त केलं आणि ती सगळी कामगार कल्याण केंद्रं मी आकाशवाणीवर आणली'' असं त्यांनी अभिमानानं म्हटलं. 'पुन्हा प्रपंच' या कार्यक्रमासाठी त्यांनी शं.ना. नवरे यांना गाठून त्यांच्याकडून त्यांना डोंबिवली ते मंत्रालय अशा रोजच्या प्रवासात लोकांच्या बोलण्यातील विषय, शब्द हेरून त्याचवर लेखन करण्यास सांगितलं. ते लेखन, त्यातील विषय लोकांच्या रोजच्या जीवनाशी निगडीत असावे, त्यातील संवाद लोकांना जवळचे वाटावेत याकडे कुडतरकरांचा कटाक्ष होता. शंन्नांनी तसं लेखन केलं. कुडतरकरांनी 'पुन्हा प्रपंच'साठी प्रभाकरपंत, टेकाडेभाऊजी आणि मीना वहिनी अशी तीन पात्रं तयार केली. त्या कार्यक्रमाला मोठं यश मिळालं. शंन्नांकडून आलेली कार्यक्रमाची संहिता त्याच दिवशी विनातालीम सादर होत असे. ती सादर करताना अनेक चुका होत, मात्र थेट प्रक्षेपणात इतर पात्रं ते सावरून घेत असत. त्यामुळे कार्यक्रमाला अनौपचारिक रूप प्राप्त झालं.

कुडतरकरांनी 'पुन्हा प्रपंच' कार्यक्रमाचा एक किस्सा सांगितला. ते म्हणाले, 'पुन्हा प्रपंच' या कार्यक्रमाचे मूळ नाव 'प्रपंच' असं होतं. मात्र त्यास प्रसिद्धी मिळू लागल्यानंतर आमच्या कानेटकर नावाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडून तो कार्यक्रम बंद करण्याचा आदेश देण्यात आला. कार्यक्रम बंद झाल्यानंतर लोकांची विचारणा करणारी पत्रं येऊ लागली. मग केंद्र संचालकांनी तो कार्यक्रम पुन्हा सुरू करण्याचा आदेश दिला. त्यावेळी मी त्या कार्यक्रमाचं नाव 'पुन्हा प्रपंच' असं ठेवलं.''

कुडतरकर आकाशवाणीत काम करत असताना माहितीपटांना आवाज देत असत. त्यांनी आतापर्यंत सुमारे साडेतीनशे माहितीपटांना आणि दीड हजार जाहिरातींना आवाज दिला आहे. तसेच इतर भाषांतील अनेक चित्रपटांचं डबिंगही केलं असल्याचं त्यांनी सांगितले.

बाळ कुडतरकरांकडे किस्से-कहाण्यांचा खजिनाच होता. सुशीलकुमार शिंदे हे कुडतरकरांचे घनिष्ट मित्र. त्यांचा किस्सा सांगताना कुडतरकर म्हणाले, एकदा सुशीलकुमार शिंदे यांनी मला महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक खात्याचं संचालकपद देऊ केलं.

मात्र मी त्यांना स्पष्ट नकार देत, मी ऑल इंडिया रेडिओ सोडणार नाही असं निक्षून सांगितलं.'' अशाचप्रकारे आचार्य अत्र्यांनी कुडतरकरांना बोलावल्यानंतर त्यांनी दिलेला नकार आणि अत्र्यांचा ओढावून घेतलेला रोष हा किस्साही मनोरंजक होता. अशा अनेक प्रस्तावांना नकार देण्याबद्दल कुडतरकर म्हणाले, की ''मला हे ठाऊक होतं, की ती सर्व मंडळी मी रेडिओमध्ये आहे म्हणून मला बोलावत आहेत. एकदा का हा मायक्रोफोन माझ्या हातून गेला, की मी कुणीच नाही. आणि इथे माझं साम्राज्य आहे. ते सोडून मी का जाऊ?''

कुडतरकरांनी त्यांच्याण यशात त्याोचे गुरू पार्श्वनाथ आळतेकर यांचा सर्वात मोठा वाटा असल्याचं सांगितलं. त्यांनी त्यांच्या नावाने 'पार्श्वनाथ आळतेकर' एकांकिका स्पर्धा अकरा वर्षं आयोजित केली होती. त्यांनी 'अभिनय' ही नाट्यसंस्था सुरू करून नाट्यस्पर्धाही आयोजित केल्या. सोबत अनेक नाटकंही निर्माण केली. त्या नाटकांचं बरेचसं लेखन आपणच करत असू असं कुडतरकरांनी सांगितलं. त्यापैकी 'अमृत मोहिनी' या तेव्हाच्या 'बिग बजेट' नाटकाला घवघवीत यश मिळालं. त्या नाटकाला जितेंद्र अभिषेकी यांनी संगीत दिलं होतं.

बाळ कुडतरकरांनी १९३९ ते १९७० या काळात आकाशवाणीवर काम केले. त्यांच्या मुलाखतीतून आकाशवाणीच्या सिग्नेचर ट्युनपासून तिथे काम करणाऱ्या व्यक्तींपर्यंत सगळ्यांशी त्यांचे जोडले गेलेले बंध जाणून घेता आले. बाळ कुडतरकर स्वतःच्या कुटुंबाविषयीही भरभरून बोलले. त्यांच्या पत्नी माणक या लग्नातूर्वी बाळ कुडतरकरांसोबत आकाशवाणीच्या श्रुतिकांमध्ये सहभागी होत असत. त्या शास्त्रीय गायिका आणि भरतनाट्यम नृत्यांगना होत्या. मात्र लग्नानंतर त्यांनी श्रुतिका किंवा इतर कार्यक्रम केले नाहीत. कुडतरकरांनी माणक यांच्याबद्दल बोलताना प्रत्येक पुरुषाला माझ्या पत्नीसारखी पत्नी मिळो'' अशी इच्छा व्यक्त केली. कुडतरकर यांची दोन्ही मुलं अमेरिकेत स्थायिक आहेत. त्यापैकी चेतन कुडतरकर हे एक्स ओ टेलिकम्युनिकेशनमध्ये मोठ्या पदावर कार्यरत आहेत. तर कार्तिक कुडतरकर हे एच. एल. इलेक्ट्रॉनिक्समध्ये कामाला आहेत. बाळ कुडतरकर यांची नात अनिशा ही भरतनाट्यम करते. तसंच ती ब्रॉडवेला नाट्यदिग्दर्शिका म्हणून काम करते.

बाळ कुडतरकर यांच्या मुलाखतीतून त्यांच्या स्वतःच्या जीवनप्रवासासोबत आकाशवाणीचा सुवर्णकाळ उपस्थितांसमोर उभा राहिला. त्यावेळी ग्रंथालीकडून प्रकाशित करण्यात आलेल्या राजीव जोशी लिखित 'जीवनदान' या पुस्तकाचं प्रकाशन बाळ कुडतरकर यांच्या हस्ते करण्यात आलं.

**– आशुतोष गोडबोले**
thinkm2010gmail.com

**प्रसिद्ध झाले!**




**प्रज्ञासूर्य डॉ. आंबेडकर**

**समग्र वैचारिक चरित्र**

**डॉ. नरेंद्र जाधव**

**मूळ किंमत ७५० रु.**

**सवलतीत ६०० रु.**

''केवळ राजकीय लोकशाहीवर आपण समाधान मानता कामा नये. आपल्या राजकीय लोकशाहीचे आपण एका सामाजिक लोकशाहीत परिवर्तन करायलाच हवे. राजकीय लोकशाहीच्या मुळाशी सामाजिक लोकशाहीचा आधार नसेल तर ती अधिक काळ टिकू शकणार नाही. सामाजिक लोकशाही म्हणजे एक जीवनमार्ग आहे जो स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांना जीवनतत्त्वे म्हणून मान्यता देतो...

२६ जानेवारी १९५० ला आपण एका विसंगतीयुक्त जीवनात प्रवेश करणार आहोत. राजकारणात आपल्याकडे समता असेल परंतु सामाजिक आणि आर्थिक जीवनात विषमता राहील. राजकारणात प्रत्येकाला एकमत आणि प्रत्येक मताचे समान मूल्य या तत्त्वाला आपण मान्यता देणार आहोत. आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात मात्र, सामाजिक आणि आर्थिक संरचनेमुळे, प्रत्येक माणसाला समान मूल्य हे तत्त्व आपण नाकारीत राहाणार आहोत.

आणखी किती काळ अशा परस्पर विरोधी जीवनात राहाणार आहोत? आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात आपण आणखी किती काळ समता नाकारणार आहोत? आपण जर ती यापुढे अधिक काळपर्यंत नाकारत राहिलो, तर आपली राजकीय लोकशाही धोक्यात आल्याशिवाय राहाणार नाही. ही विसंगती शक्य होईल तेवढ्या लवकर आपण दूर केली पाहिजे. अन्यथा ज्यांना विषमतेचे दुष्परिणाम भोगावे लागत आहेत ते या संविधान सभेने अतिशय परिश्रमाने निर्माण केलेली राजकीय लोकशाहीची संरचना उद्ध्वस्त केल्याशिवाय राहाणार नाहीत.''

B. R. Ambedkar

वृत्तांत

# ‘संवाद’ हरवलाय– एक समाजउपयोगी पुस्तक

**प्रतिनिधी**

‘ग्रंथाली’ तर्फे नुकतेच डॉ. नीना सावंत लिखित ‘संवाद’ हे पुस्तक प्रकाशित झाले. या पुस्तकाचे प्रकाशन न्यायमूर्ती विजया ताहिलरामाणी (मुंबई उच्च न्यायालय) यांच्या हस्ते रवींद्र नाट्यमंदिरात झाले.

या प्रकाशन समारंभाला मोजकीच पण समाजकार्यात रस असणारे रसिक श्रोते उपस्थित होते.

‘ग्रंथाली’च्या प्रभाकर भिडे यांनी प्रास्ताविकात ग्रंथालीला अशी समाजोपयोगी पुस्तके प्रकाशित करण्यात रस असून ग्रंथालीने गेल्या चाळीस वर्षांत सातशेच्यावर पुस्तके प्रकाशित केली आहेत असे नमूद केले. डॉ. नीना सावंत या मुंबई महापालिकेच्या हॉस्पिटलमध्ये मानसोपचारतज्ज्ञ असून त्यांच्या या विषयावरील अनुभवांवर आधारीत हे पुस्तक आहे. यापूर्वी त्यांची ‘एका तळ्यात होती’ आणि ‘चाहुल तारुण्याची’ ही दोन पुस्तके प्रकाशित झाली आहेत. हल्ली तंत्रज्ञानात प्रचंड प्रगती झाली आहे. परंतु माणसांमधील संपर्क/सहवास कमी झाल्याने संवाद/आपुलकी कमी होत आहे. भिडे यांनी उदाहरणादाखल न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांचा किस्सा सांगितला. न्यायमूर्ती सचिवालयाच्या समोरील सरकारी निवासात राहत असत. परंतु तेथे कोणाचे निधन झाल्याची बातमी दुसऱ्या दिवशीच्या वृत्तपत्रांमधून कळत असे. इतका समाजातील संवाद तुटत चालला असल्याचे सांगितले.

पुस्तकाच्या लेखिका डॉ. नीना सावंत यांनी आपल्या मनोगतात मुले आईवडिलांशी कशी बोलतात, मुलांची (नवीन पिढीची) बोलण्याची भाषा वेगळी असून ती आईवडिलांना समजत नाही त्यामुळे संवाद होत नाही असे सांगताना आईवडिलांना नोकरीउद्योगामुळे मुलांशी बोलण्याला वेळ फार कमी मिळतो हे संवाद तुटण्याचे आणखी कारण आहे – तरी आईवडिलांनी मुद्दाम वेळ काढून बोलले पाहिजे अशी अनेक उदाहरणे देत त्यांनी रुग्णालयांतील अनेक अनुभव सांगितले. यावर त्यांच्या दृष्टीने काय उपाय आहेत ते या पुस्तकात सांगितले आहेत. एकप्रकारे समाजाची गरज भागविली आहे.

त्यानंतर ‘संवाद’ या पुस्तकाचे प्रकाशन न्या. विजया ताहिलरामाणी यांच्या हस्ते झाले, तसेच डॉ. नीना सावंत यांच्या 'Being Parent' या इंग्रजी ‘इ’बुकचेही प्रकाशन न्यायमूर्तींनी बटन दाबून केले व लगेच स्क्रिनवर या पुस्तकाचे मुखपृष्ठ झळकले.

त्यानंतर न्यायमूर्तींनी पुस्तकातील प्रत्येक प्रकरणावर मग तो मुलांशी संवाद असो की, तारुण्याची चाहुल असो, तसेच दत्तक मूल असो की पती–पत्नीशी संवाद असो, कायद्याच्या दृष्टीने तसेच संवादरूपाने कसा साधता येईल याचे इंग्रजीमध्ये सुरेख निवेदन केले.

गोपी कुकडे यांनी पुस्तकाचे मुखपृष्ठ करताना पुस्तकातील (व पूर्वीच्या पुस्तकातील) भावना, विचार, आपली श्रवणशक्ती यांचा संवाद साधत कसे केले ते थोडक्यात व मोजक्या भाषेत सांगितले. त्यावरून मुखपृष्ठ ही कला कशी आहे व त्यावेळी चित्रकार काय विचार करतो याचा अंदाज रसिकांना आला.

या प्रकाशन समारंभाचे सूत्रसंचालन विनोद पवार यांनी अतिशय खुसखुशीतपणे कवितेच्या माध्यमांतून केले. आपल्या गतिमान जीवनामुळे माणसा–माणसामधील संवाद कसा तुटला आहे हे सांगितले.

शेवटी आभार मानण्याऐवजी विनोद पवार यांनी सोलापूरचे प्रसिद्ध कवी दत्ता हलसगीकर यांची या विषयावरील सुयोग्य कविता वाचून दाखवली.

‘ग्रंथाली’च्या सुदेश हिंगलासपूरकर आणि अरुण जोशी यांनी पुस्तकासाठी मदत करणाऱ्या तसेच ग्रंथालीसंबंधीत रसिकजनांचा फुलांची परडी देऊन सत्कार केला.

**– प्रभाकर भिडे**
२०२ राधाश्री सोसायटी, सावरकर रोड,
डोंबिवली (पूर्व), ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९८९२५६३१५४

वृत्तांत

### इंदिरा संत जन्मशताब्दी वर्ष

# 'ग्रंथाली' ठाणे वाचकदिन

### रमा नेने

''मी माझे सगळे आयुष्यात कवितेला दिले आहे'' असे म्हणत, उत्कटपणे जगणाऱ्या, कवितेतील स्वत्व, स्त्रीत्व मन:पूर्वक जपणाऱ्या ज्येष्ठ नि श्रेष्ठ कवयित्री इंदिरा संत, बेळगावकर नि जवळच्यांच्या 'इंदिरा आक्का'. आपल्या सर्वांना कधी ना कधी पाठ्यपुस्तकात भेटलेल्या इंदिरा संत यांचे हे जन्मशताब्दी वर्ष (जन्म ४ जानेवारी १९१४, मृत्यू १३ जुलै २०००). त्यानिमित्त 'ग्रंथाली'च्या ठाणे केंद्राचा वाचकदिन त्यांच्या कविता, कथा, आत्मपर लेख यावर आधारलेला होता. जोडीला आणखी एखाद्या कवयित्रीची कविता विद्यार्थ्यांनी निवडायची होती. ह्या दोनपैकी एक साहित्यकृती नृत्य-नाट्य-मूकाभिनय-गायन याद्वारे सादर करायची होती तर दुसरी काव्यवाचन पद्धतीने.

ग्रंथाली, ठाणे केंद्र नि 'हितवर्धिनी सभा' यांचे 'स्वा. सावरकर वाचनालय' नौपाडा, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने, सलग तेरावा वाचकदिन त्यांच्या मैदानावर उमा-नीळकंठ व्यायामशाळा येथे ११ व १२ जानेवारी २०१४ रोजी साजरा झाला.

ठाण्यातील २५-३० शाळांनी यात भाग घेतला. सातवी-आठवीतील अंदाजे २२५ विद्यार्थ्यांनी (क्वचित अपवाद इ. सहावी ते नववी) यात उत्साहाने भाग घेतला नि ते उपस्थित सर्वांच्याच कौतुकाचे विषय झाले.

एकच गोष्ट सातत्याने करणे, याचेच नाव तप असते काय? कारण खऱ्या अर्थाने 'ग्रंथाली'चे 'वाचक चळवळ' ब्रीदवाक्य घेऊन ठाणे केंद्रानेही एक तप पूर्ण करून, आपली वाटचाल, अधिक जोमाने सुरू ठेवली आहे. ज्यांच्या अथक प्रयत्नांनी ही 'तपश्चर्या' पूर्ण झाली, ते तीन तपाचरणी आहेत- ठाण्यातील कल्पक, अखंड उत्साही नि अथक प्रयत्नवादी अविनाश बर्वे सर (वय ६९) त्यांना तितकीच कणखर नि मनस्वी साथ देणारी त्यांची खऱ्या अर्थाने 'अर्धांगिनी' नंदिनी बर्वे (वय ६४) नि ठाणे केंद्रचालक श्रीधर गांगल (वय ७१)!

स्त्री मनाचा अतिशय तरल, कोमल नि भावगर्भ आविष्कार म्हणजे इंदिरा संत यांची कविता. पतीच्या अकाली निधनाने एकाकी/एकटेपणाचे दु:ख त्यात जाणवते. पण त्यांच्या ठायी असलेली निसर्गओढ, प्रेमाची आस, मायेचा ओलावा नि त्याला संवेदनशील मनाची जोड; यामुळे रसिकांना ती भावली, आवडली. ती गंभीर वाटली तरी सौजन्य हा तिचा स्थायीभाव आहे नि रसिकपणा, आनंद घेण्याची सहजवृत्ती, ह्यामुळे आजही ती आकर्षून घेते. अशा श्रेष्ठ कवयित्रीची विद्यार्थ्यांना ओळख व्हावी नि पुढील काळात त्यांनी ती आवर्जून वाचावी, ही माफक अपेक्षा ठेवून, इयत्ता ७वी-८वीच्या विद्यार्थ्यांना भावतील, आवडतील, पचतील अशाच कविता निवडलेल्या होत्या.

'शार्दुलविक्रीडित वृत्त' हे त्या काळातील अनेक कवींचे एक आवडते वृत्त. (उदा. आचार्य अत्रे ऊर्फ केशवकुमार लिखित 'आजीच्या जवळी घड्याळ कसले...) इंदिराजींची 'पूर्वस्मृती' ही चार कडव्यांची कविता त्या वृत्तात आहे. जुन्या ओसाड, भयाण नि निर्मनुष्य घराला बऱ्याच वर्षांनी भेट दिल्यावर भयचकित झालेली ती म्हणते-

''आता आठवते तदा मधुरसा वाडा किती हासला  
आहे शून्य अतां कसा चहुंकडे अंधार हा माजला  
खुंट्यांना वटवाघळे लटकली भेडावती अंतरा  
पाहोनी असले भयाण घर हे तें चित्ती भरें कापरा.''

कवयित्रीचे हे शब्दचित्र आपल्यासमोर ते घर उभे करते नि 'मनीषा विद्यालया'च्या विद्यार्थ्यांनी ती धीरगंभीर स्वरात म्हटल्याने, अंगावर काटा उभा राहिला, व्याकुळ केले.

तर ''त्याच वाटेवरूनी आला  
